# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०-०४-२०१६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक २० एप्रिल २०१६ रोजी (का.प.क्र.१६) मा.महापौर श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११-०५ वा वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.ओम प्रकाश बकोरिया,आयएएस नगर सचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री.खान जहाँगीर मुलानी
५. स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
६. स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
७. स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
८. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
९. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
१०. स.स. सौ.रोजतकर पुष्पा उत्तमराव
११. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
१२. स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१३. स.स. सौ.स्वाती किशोर नागरे
१४. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१५. स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान
१६. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१७. स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी
१८. स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
१९. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
२०. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
२१. स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ
२२. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
२३. स.स. श्री.सय्यद मतीन रशीद
२४. स.स. श्रीमती शकीला बेगम फैयाजोद्दीन
२५. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२६. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२७. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२८. स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

२९. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
३०. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
३१. स.स. सौ.शोभा नारायणराव वळसे
३२. स.स. सौ.ज्योती सुभाष पिंजरकर
३३. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
३४. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
३५. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
३६. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
३७. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३८. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
३९. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
४०. स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
४१. स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम
४२. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
४३. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
४४. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
४५. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
४६. स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज
४७. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
४८. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
४९. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
५०. स.स. श्री.एडके विकास प्रकाश
५१. स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव
५२. स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम
५३. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
५४. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
५५. स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
५६. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
५७. स.स. श्री.शेख जफर अखतर
५८. स.स. श्री.जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी
५९. स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
६०. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
६१. स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
६२. स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत
६३. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
६४. स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत
६५. स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
६६. स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन

६७. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
६८. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
६९. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
७०. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
७१. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
७२. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
७३. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
७४. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
७५. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
७६. स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
७७. स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव
७८. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
७९. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
८०. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
८१. स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे
८२. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
८३. स.स. श्री.सोहेल शकील शेख
८४. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
८५. स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन
८६. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
८७. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
८८. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
८९. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
९०. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
९१. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
९२. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
९३. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
९४. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
९५. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
९६. स.स. श्री.विकास रतनलाल जैन
९७. स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट
९८. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
९९. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
१००. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
१०१. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
१०२. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
१०३. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
१०४. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी

१०५. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
१०६. स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे
१०७. स.स.कु.जमादार सायली भागवत

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन
५. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

श्री.भाऊसाहेब जगताप :जालना जिल्हयाचे माजी खासदार श्री.अंकुशरावजी टोपे यांचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांनी सहकार व शैक्षणिक क्षेत्रात भरीव काम केले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :अनुमोदन आहे.

श्री.दिलीप थोरात :अनुमोदन आहे.

श्री.कैलास गायकवाड :मराठवाडयाच्या विकासासाठी मोठे काम श्री.टोपे यांनी केलेले आहे श्रध्दांजली अर्पण करण्यास अनुमोदन आहे.

श्रीमती अंकिता विधाते :अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी उभे रहावे.

या वेळी स्व.अंकुशराव टोपे यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री.राजगौरव वानखेडे :पोटनिवडणुकीत दोन नवनियुक्त सदस्य निवडुन आले. त्यांचा सत्कार करावा.

श्री.भाऊसाहेब जगताप :अभिनंदनाचा ठराव घ्यावा.

मा.महापौर :नवनियुक्त वार्ड क्र.११४ चे सदस्य श्री.अप्पासाहेब हिवाळे तसेच वार्ड क्र.११५ चे स.सदस्या कुमारी सायली जमादार यांनी स्टेजवर यावे त्याचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात येते.

या वेळी मा.महापौर यांचे हस्ते नवनियुक्त दोन्ही सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

प्रश्न क्रमांक ४२६ :स.श्री.राजगौरव वानखेडे

श्री.राजगौरव वानखेडे :मालमत्ता कराच्या संदर्भात किती प्रकरणे प्रलंबीत आहे असा प्रश्न होता. माहिती द्यावी.

श्रीमती संगिता वाघुले :मागच्या सभेत मोबाईल टॉवर्स संदर्भात प्रश्न होता उत्तर मिळाले नाही. माहिती द्यावी तसेच माईक नेहमीच बंद का असतात.

श्री.अब्दुल नाईकवाडी :माईक खराब आहे आवाज येत नाही नवीन माईक लावणार होते.

यावेळी माईक बंद आहे ते चालू करावे अशी सदस्यांची मागणी असते.

श्री.अफसर खान :एजन्सीला माईक सिस्टमचे किती भाडे दिले? तेवढ्या पैशामध्ये संपुर्ण सिस्टीम कार्यान्वित झाली असती. दिलेले भाडे योग्य होते का? कुणाच्या आदेशानुसार दिले. सर्व माहिती द्यावी.

मा.महापौर :प्रशासनाने खुलासा करावा.

शहर अभियंता :दिनांक २६-४-२०१६ रोजी नवीन सिस्टम साठी टेंडर काढणार आहोत. तीन वेळेस ६० हजार व एक वेळेस १५ हजार असे एकूण १.९५ लक्ष भाडे दिले.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी डायस समोर बोलत असतात.

श्री.अब्दुल नाईकवाडी :१.९५ लक्ष भाडे दिले. माईक सिस्टमसाठी २.४० चे अंदाजपत्रक होत आहे. जे भाडे दिले ते संबंधीत अधिकारी यांचेकडून वसुल करावे.

श्री.जहागीर खान :माईक चांगले असावे तेंव्हाच सभा घ्यावी.

मा.महापौर :माईकची व्यवस्था पुढील बैठकीपर्यत केली जाईल.

श्री.राजगौरव वानखेडे :२१ शैक्षणिक संस्था कराच्या बाबतीत न्यायालयात गेलेले आहे. कशामूळे न्यायालयात प्रकरण गेले माहिती द्यावी.

उपआयुक्त(मालमत्ता) :जो निवासेत्तर दर ३७.५% दर लावलेला आहे त्या ऐवजी निवासी दर लावावा असे म्हणणे आहे. पुर्वी कमर्शियल दराने लावलेले होते. महासभेने मधला मार्ग काढून वरील प्रमाणे दर लावतो.

श्री.राजगौरव वानखेडे :शैक्षणिक संस्थेकडे १४.७१ कोटी थकीत रक्कम आहे. यामध्ये अनुदानित व विना अनुदानित शाळा असतील. अनुदानित शाळा कोणतीही फिस घेत नाही. लावलेला कर संस्था चालकांना भरावा लागतो. त्यांचे म्हणणे आहे की, निवासी दर लावावा. इतर महापालिकेत अशा संस्थांना किती दर लावलेला आहे?

उपआयुक्त(मालमता) :इतर महापालिकेची माहिती घेवून हा दर लावलेला आहे. ज्या संस्था शासनाचे अनुदान घेत नाही फिस घेतात त्यांना कमर्शियल दराने लावलेला आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :जेव्हा संस्थेचे धर्मादाय कार्यालयास रजिस्ट्रेशन होते तेंव्हा कोणताही टॅक्स लागणार नाही असे नमूद असते. त्याचा विचार करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :कोणती संस्था अनुदान घेणे किंवा घेत नाही. सर्वे करण्यास तेवढा वेळ नाही. दोन तीन खोल्यामध्ये शाळा सुरू केली जाते. १०-१० हजार डोनेशन घेतले जाते. अशा संस्थांना कमर्शियल टॅक्स लावावा. सभेने ठराव मंजूर केला की मध्य मार्ग काढून ३७.५ टक्के प्रमाणे टॅक्स लावतो. ज्या शाळांना अनुदान नाही, शासन मान्यता नाही, कमर्शियल युज होतो. अशांना कमर्शियल लावावा. जी प्रकरणे न्यालयात आहे त्यांचे बाबतीत कुठेही जैसेथे आदेश असेल वाटत नाही. यावर अभ्यास करून टॅक्स वसुल करू शकतो. १४ कोटी थकीत कर संस्थाकडे ते वसुल करावे.

श्री.शिवाजी दांडगे **:शहरात ६००-७०० खाजगी शाळा चालू आहे. विद्यार्थ्यांकडून २०-२० हजार फिस घेतात. कमर्शियल टॅक्स लावावा.**

श्री.नंदकुमार घोडेले :शै.सस्थांना टॅक्स कसा लावावा? समिती गठीत केली होती. निवासी वापराच्या इमारतीमध्ये शाळा सुरू आहे. यावर प्रशासनाचा अंकूश नाही. त्या संस्था चालकांनी मनपाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतले नाही. मनपाच्या दप्तरी नोंद नाही व निवासी टॅक्सच वसुल होतो. जाहिर प्रगटन देऊन अशा शाळांची माहिती मागवावी. योग्य कार्यवाही करावी. जसा युज तसा टॅक्स लावावा.

श्री.राजू शिंदे :१४ कोटी या संस्थाकडे कमर्शियल की निवासी रेटने बाकी आहे, सभेने ठराव घेतला. मधला मार्ग म्हणून संस्था चालकाशी चर्चा करून ३७.५ टक्के प्रमाणे टॅक्स आकारतो. तरीही भरणा करीत नाही. लाईट बील कमर्शियल रेटने या

संस्था भरतात. तेथे त्यांना सवलत मिळत नाही. पुर्ण १४ कोटी थकीत रक्कम वसुल करावे. ९० टक्के संस्था कमर्शियल प्रमाणे युज करतात.

श्री.राजगौरव वानखेडे :शै.संस्थांना सामान्य कर निवासेत्तर आहे. बाकी सर्व कमर्शियल लावला जातो. अनुदानित शाळा फिस घेत नाही. विना अनुदानित शाळा फिस घेतात. जेथे कोचींग क्लास चालतात कमर्शियल आहे. त्यांना निवासी दर लावतो. कोचिंग क्लासेस व इंग्रजी माध्यमाच्या शाळा असतील, त्यांना कमर्शिलय कर लावावे, जे अनुदानित शाळा असेल, त्यांना फिस घेता येत नाही. नियम आहे. अशा जुन्या शाळा आहे. त्यांना निवासी दर प्रमाणे लावावे असे म्हणणे आहे. अशा संस्थांना बोलावून चर्चा करावी. योग्य मार्ग काढावा.

श्री.राजू शिंदे :अशा संस्थांना शासनाकडून इमारतीचे भाडे मिळते. त्यांना सुट देऊ नये. फुकट सेवा अशा संस्थांची करू नये.

श्री.अफसर खान :संस्थेने रजिस्ट्रेशन केल्यानंतरच शाळा सुरू करता येते. परंतु शहरात अनेक शाळा विना रजिस्ट्रेशन, विना परवानगी चालू आहे. निवासी कर लावला जातो. त्या शाळा ५-१० हजार डोनेशन घेत आहे. कमर्शियल टॅक्स लावावा. थकबाकी वसुल करावे. अनेक इंग्रजी शाळांना अनुदान मिळत नाही. परंतु फिस घेतात. त्यांना कमर्शियल कर लावावे.

श्री.वानखेडे राजगौरव :धर्मादाय संस्थांकडून मान्यता मिळते. अल्पसंख्याक व अनुदानित व विना अनुदानित संस्थेला वेगवेगळे न्याय आहे. संबंधीत विभागाकडून गाईड लाईन्स मागवून घ्यावे. योग्य मार्ग काढावा. ही वसुली करावी. सर्व स.पदाधिकारी व मा.आयुक्त एकत्रित बसून चर्चा करून मार्ग काढावा.

श्री.मनोज गांगवे :खाजगी ट्युशन चालू आहे. कमर्शियल लावावे. ऑडीट करावे. एन-१ मध्ये नर्सरीज् स्कूल ५०-५० हजार रूपये फिस घेतात. इमारतीचे कम्प्लीशन व फायर एनओसी आहे का तपासावे. कमर्शियल कर लावावा.

श्री.अब्दुल नाइकवाडी :अनुदानित शाळेवरील शिपाई संस्था चालकांच्या घरी काम करतात. अशा शाळांना ग्रॅण्ड मिळतो डोनेशन घेतात.कमर्शियल लावावे.

श्री.अफसर खान :१९८५ दरम्यान टुव्हिलरवर फिरणारे संस्था चालक चारचाकी वाहनामध्ये फिरतात. मोठी फिस वसुल करतात. जे गरीब आहे, त्यांचेवर कार्यवाही होते. संस्था चालकांवर कार्यवाही करावी. कमर्शियल प्रमाणे टॅक्स वसुल करावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :अनुदानित असेल विना अनुदानित असेल सर्वच विद्यार्थ्यांकडून भरमसाठ पैसे वसुल या शाळा करतात. कोणती संस्था रजिस्ट्रेशन आहे किंवा नाही ते बघणे महापालिकेवर बंधनकारक नाही. ज्या काही सुविधा पुरविल्या जातात त्यांचा मोबदला म्हणून कर वसुल करतो. ३७.५ टक्के प्रमाणे टॅक्स आकारणे व वसुल करावा. जी संस्था मा.कोर्टात गेल्या त्याची बैठक बोलवून निर्णय घ्यावा.

उपआयुक्त(मालमत्ता) :मार्च अखेर चार शाळा व दोन कॉलेजला सील लावले. सन-२००६ ते सन-२०१३ पर्यंतच्या डिमांडला स्टे होता. सन १४-१५,१५-१६ ची डीमांड दिली मुदत दिली पैसे भरले नाही. एक शाळेचे पैसे भरण्याचे मा.न्यायालयाचे आदेश झाले. नंतर सुनावणी होऊन मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहे. आता वसुल केले जाईल.

श्री.राजेंद्र जंजाळ :शाळा, खाजगी क्लासेस चालविण्यासाठी त्या इमारतीला मनपाने परवानगी दिली का? शैक्षणिक संस्था क्लासेस चालवितात. त्यांचेकडून टॅक्स वसुल झाला पाहिजे. फायर एनओसी, इमारत परवानगी आहे का? मंगलकार्यालयामध्ये खाजगी क्लासेस चालतात. १२ वीची, सीईटीची एका वर्षाची फिस एका विद्यार्थ्यांकडून ५० हजार वसुल होते. त्याप्रमाणेच टॅक्स वसुल करावा. पार्कींगची व्यवस्था नाही. खाजगी संस्था, क्लास असतील त्यांचे ऑडीट करावे. सर्व माहिती घेऊन ३७.५० प्रमाणेच सक्तीने वसुल करावा.

श्री.अय्युब जहागीरदार :अनेक खाजगी शैक्षणिक संस्था डोनेशन घेतात. कमर्शीयल प्रमाणे वसुल करावे शादीखाना, मंगल कार्यालय यांना कमर्शियल कर लावावा. जे धार्मीक स्कूल लोकांच्या वर्गणीतून चालते. त्यांना निवासी कर लावावा.

श्री.भगवान घडमोडे :१४ कोटी वसुल करू नये. असे मा.न्यायालयाने म्हटले का? विकास कामासाठी पैसे नाही. मधला मार्ग म्हणून टॅक्स लावला होता. संस्था चालकाशी चर्चा केली होती. मा.कोर्टात जाण्याचा प्रश्नच नव्हता. अनुदानित शाळा असेल. फिस घेत नाही, शिक्षणाचे अनुदान मिळत नसेल तर त्यांचाच विचार करावा परंतु ९० टक्के संस्था फिस वसुल करतात. सक्तीने वसुली करावी. ही स्थानिक संस्था चालवित असतांना उत्पन्नाची गरज आहे. जे कमर्शियल पध्दतीने पैसे कमवितात. त्यांचेकडून कमर्शियलच कर वसूल करावे.

श्रीमती सायरा बानो खान:अनुदानित, विना अनुदानीत व कायम विना अनुदानित शाळा आहे. कायम विना अनुदानित शाळा फिस घेतात. डोनेशनही घेते. त्यांना परवानगी कोणती असते? काही शाळा निवासी इमारतीमध्ये आहे ज्या शाळा राज्य व केंद्र शासनाचे कोर्सेस घेतात ते फिस वसुल करतात. शासनाचे अनुदानही घेतात मात्र कर भरणा करीत नाही. सर्व तपासणी केली पाहिजे. कमर्शिलय कर लावावे.

श्री.अब्दुल ताहेर शेख :काही शै.संस्थाच्या बाबतीत स्टे असेल, तर स्टे काय दिला? असेल तर महापालिकेच्या वकीलाने स्टे उठविणेकरीता काय कार्यवाही केली? पाठपुरावा केला पाहिजे. वसुली करणेसाठी कमेटी स्थापन करावी. अभ्यास करून निष्कर्ष काढावे.

श्रीमती किर्ती शिंदे :मालमत्ता कराचे खाजगीकरण होणार काय ?

मा.उपमहापौर :३७.५० प्रमाणे टॅक्स लावतो. अनेक खाजगी शाळा निवासी इमारतीत आहेत. निवासी कर लावला आहे. अनेक क्लासेस व शाळा असेल, विना अनुदानित शाळेने टॅक्स लावून घेतला नाही. ठराविक शाळांना टॅक्स लागला जातो. अनेक लोक मा.कोर्टात दावा दाखल करतात. त्यासाठी वेगळे पॅनल करावे अशा केसेसच्या बाबतीत त्या पॅनलने काम करावे. कोर्ट प्रकरणामुळे अनेक वसुली येणे थांबले आहे. कोचींग क्लासेस यांना ३७.५० प्रमाणे टॅक्स लावावा.

श्री.जहांगीर खान :खाजगी शाळा २०-२५ हजार फिस घेत आहे. सक्तीने टॅक्स वसुली करावे कोणत्याही माध्यमाच्या शाळेला कमर्शियल टॅक्सच लावावा.

मा.आयुक्त :जेथे खाजगी क्लासेस चालतात. कमर्शियल पध्दतीने वापर होतो. काही शाळांचा मुळ उद्देश शिक्षण आहे. इतर वापरासाठी यूज करीत नाही. फिस कमी

आहे. प्राधान्य शिक्षणास आहे. त्याची माहिती घेता येईल. परंतु ज्यांचा कमर्शियल पध्दतीने उद्देश आहे. त्यांना नक्कीच कमर्शियल टॅक्स लावला पाहिजे. महापालिका जो निर्णय घेईल त्याप्रमाणे कर लावला जाईल.

श्री.नंदकुमार घोडेले :काही शाळांची महापालिकेकडे नोंदच नाही. निवासी वापराच्या इमारतीमध्ये अनधिकृत वस्तीमध्ये शाळा सुरू आहे. त्यास परवानगी नाही. फायर एनओसी नाही. तेथे मैदान नाही. अशा शाळांच्या बाबतीत प्रशासनाचे धोरण काय असणार आह?

श्री.राजगौरव वानखेडे :नर्सरी,ज्यु.,सिनियर के.जी असेल नव्याने शाळा सुरू करायची असेल, तर मनपाची परवानगी घेणे आवश्यक आहे. असा ठरावही घेतला आहे. त्यानुसार कार्यवाही होते का?

मा.महापौर :महापालिकचे उत्पन्न कसे वाढेल विचार करावा. शैक्षणिक संस्था क्लासेस चालतात. हॉटेल,इलॉन्स,मंगल कार्यालय आहे तेथे मोठमोठे लग्न लागतात, कार्यक्रम होतात. कुणाला कुठला टॅक्स लावावा, निर्णय घेतलेला आहे. त्यांना सुध्दा योग्य तो टॅक्स लागला पाहिजे. खाजगी संस्थांचा विषय समोर येतो काही कोर्टात गेले. त्यांना बोलावून चर्चा करून मार्ग काढावा. नवीन शाळा ओपन होतांना त्यांनी महापालिकेची परवानगी घेतली पाहिजे. सर्वे करावा कराची वसुली करीत असतांना तडजोड करू नये. सर्व शहरातील विचार करून हॉटेल मालक, शै.संस्था चालक, मगंल कार्यालय मालक असतील, क्लासेस चालविणारे असतील, तेथे पार्कींग नाही, यावर योग्य निर्णय घेणेसाठी कमेटी करावी निर्णय घ्यावा.

श्री.नासेर सिद्दीकी :परवानगी देतांना महापालिकेच्या शाळेच्याच बाजूला खाजगी शाळेला परवानगी देऊ नये.

मा.महापौर :मनपाच्या शाळेच्या बाजूला खाजगी शाळेला परवानगी देऊ नये. नियमानुसार परवानगी द्यावी. जे की, मनपाच्या शाळेची विद्यार्थी संख्या कमी होऊ नये.

श्रीमती समीना शेख :ज्या इमारतीवर टॉवर्स लावले त्यांना व्यावसायिक कर आकारावा. तसेच शाळा व हॉस्पीटलवर टॉवर्स असू नये ते काढावे.

मा.महापौर :नियमानुसार कार्यवाही करावी. हॉस्पीटल व शाळांवरील टॉवर्स काढावे. सर्वे केला का? खुलासा करावा

प्रशासकीय अधिकारी :शाळा हॉस्पीटल वरील टॉवर्स सर्वे केला. आयकॉन शाळेवरील टॉवर्स सील केले. सर्वे केलेला आहे प्रत दाखविण्यात येईल.

श्रीमती संगीता वाघुले :अनधिकृत टॉवर्स किती काढले आहे?

प्रशासकीय अधिकारी :मा.उच्च न्यायालयाचे आदेश आहे. कुठल्याही टॉवर्सवर कार्यवाही करू नये.

श्रीमती समीना शेख :एका टॉवर्सवर स्टे आहे. इतर टॉवर्सवर कार्यवाही करू नये. असे म्हटले नाही. वाळूज एमआयडीसी भागातील टॉवर्सवर कार्यवाही होते येथे का नाही?

मा.आयुक्त :हॉस्पीटल व शाळांवर असलेल्या टॉवर्स बाबत कार्यवाही होईल. मा.न्यायालयाच्या आदेशानंतर टॉवर्स झाले असेल व परवानगी घेतली नसेल तर कार्यवाही होईल.

श्रीमती समीना शेख :एक महिन्यात टॉवर्स रेग्युलाईज न केल्यास आपोआपच ते टॉवर्स रेग्यूलर होते एक महिन्याच्या आतच कार्यवाही का होत नाही?

श्री.अयुब जहागीरदार :एका टॉवर्सवर अनेक कंपनीचे कनेक्शन असते. त्यानुसार वसुली केली पाहिजे.

श्री.राजू शिंदे :लिगल इनलिगल टॉवर्स संदर्भात मोठा विषय आहे. प्रशासनाने योग्य कार्यवाही करावी. शैक्षणीक संस्था चालकास आपल्या दालनात बोलवावे. निर्णय घ्यावा.

मा.महापौर :१ महिन्याच्या आत प्रशासनाने टॉवर्स व अतिक्रमण बाबत प्रश्न मार्गी लावावा.

श्रीमती माधुरी देशमुख :पारीजातनगर मध्ये २००९ पासून अनधिकृत टॉवर्स परवानगी वेगळ्या प्लॉटवर टॉवर्स उभा दुसऱ्या प्लॉटवर आहे. निवासी क्षेत्रात कुठलेही व्यापारी धोरण अवलंबावयाचे नाही. असे मा.न्यायालयाचे निर्देश आहे त्याचे पालन व्हावे.

प्रश्न क्रमांक ४२७ :स.श्रीमती शोभा बुरांडे

शहर अभियंता :या संदर्भात उत्तर दिलेले आहे. सदर पुल हस्तांतर करण्याबाबत पत्र होते. एकतर्फी हस्तांतर करता येत नाही. सर्व कागदपत्र घेऊन ती कार्यवाही करावी लागेल.

श्री.राजेंद जंजाळ :सर्व उड्डाणपुल हस्तांतर झालेले नाही. त्या बाबत तसेच शिवाजीनगर रेल्वे क्रॉसींगच्या संदर्भातही प्रश्न आहे. एमएसआरडीसी कडे असे जे जे प्रश्न प्रलंबीत आहेत, त्या संदर्भात जॉईन्ट बैठक आयोजित करावी. नियमानुसार कार्यवाही करावी.

शहर अभियंता :संग्राम उड्डाणपुलाचे लाईट बील थकीत आहे. त्यांनी भरलेले नाही. ते कुणी भरायचे प्रश्न आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :हस्तांतर करून घ्यावे. सुशोभीकरण करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :जालना रोड उड्डाणपुलाखाली भिकारी आश्रय घेतात. कार्यवाही नियमीत करणे आवश्यक आहे.

मा.महापौर :पुलाखालील जागा विकसीत कशी करता येईल, त्यासाठी कार्यवाही करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :शिवाजीनगर रेल्वे क्रॉसींग वर भुयारी मार्ग मंजूर आहे. मा.आयुक्तांनी पाहणी केली. हे काम झाल्यास नागरीकांचा प्रश्न सुटेल, संबंधीत विभागाचे अधिकारी व महापालिकेने एकत्रित बैठक घ्यावी योग्य निर्णय घ्यावा.

या वेळी माईक बंद असतात.काही ही ऐकू येत नाही.

मा.महापौर :सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ १२-३० वा.पुन्हा सभा २-१५ वाजता सुरू)

मा.महापौर :पुढील सभेच्या पुर्वी माईकची चांगली व्यवस्था करण्यात यावी.

प्रश्न क्रमांक ४३० :स.श्रीमती सरवत बेगम

श्रीमती सरवत बेगम :वार्ड २४ मध्ये आजपर्यत या ठिकाणचे काम सुरू झाले नाह पावसाळ्यापूर्वी काम सुरू करावे.

कार्य.अभियंता (श्री.कोल्हे):वर्क ऑर्डर केली आहे. काम सुरू होईल. साफसफाईचे काम चालू आहे.

श्री.फेरोज खान :अतिक्रमणाचे मटेरियल उचलले नाही. साफसफाई कुठे होत आहे?

मा.महापौर :या बाबत तातडीने कार्यवाही करावी.

प्रश्न क्रमांक ४३१ :

श्रीमती सरवत बेगम :पार्कींगच्या जागेवर घरे दुकाने झाली आहे. नकाशाप्रमाणे काम होत नाही. ते काढावे. शादीखाना, मंगल कार्यालयासाठी पार्कींग नाही. नागरीकांना त्रास होत आहे.

प्रशासकीय अधिकारी :संबंधीतांनी खुलासा केलेला आहे. पार्कींगच्या जागेवरील अतिक्रमणे काढणे बाबत कार्यवाही केली जाईल.

श्री.अजीम अहेमद :कटकटगेटच्या बाजूला शादीखाना आहे तेथे पार्कींग नाही.

मा.अति.आयुक्त :पार्कींगच्या जागेवर पार्कींग असायला पाहिजे. अशा सर्व ठिकाणच्या प्रकरणात कार्यवाही सुरू केली जाईल. तशा सुचना दिल्या आहेत

श्री.जहागीर खान :नवीन परवानगी देतांना पार्कींग असावी अशी सक्ती करावी. पार्कींगच्या जागेवर दुकाने थाटली आहे. याकडे दुर्लक्ष होते.

मा.आयुक्त :परवानगी घेतली त्यानुसार बांधकाम करायला पाहिजे. तसे नसेल तर कार्यवाही होईल.

श्री.फेरोज खान :बिल्डरांनी पार्कींगच्या जागेवर दुकाने केली. ती विक्री ही केली. कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. चर्चा होते कार्यवाही होत नाही.

मा.आयुक्त :याबाबत सर्वे करण्याची मोहिम राबविणार आहोत. पार्कींगच्या जागेवर अतिक्रमण झाले असेल किंवा त्यांचा वापर इतर ॲक्टीव्हिटीज साठी होत असेल तर कार्यवाही होईल.

श्री.नंदकुमार घोडेले :परवानगी नसते. बांधकाम होते. प्रशासकीय विभाग सुट्टीच्या दिवशी चालू ठेवण्याचे आदेशीत केले होते. बांधकाम होते. भोगवटा प्रमाणपत्र घेत नाही. शहराची वाढती लोकसंख्या, क्षेत्र यानुसार इमारत निरीक्षकांची संख्या किती असावी? होणारे अतिक्रमण अनधिकृत बांधकामे यावर नियत्रंणासाठी नियोजन करायला पाहिजे इमारत निरीक्षक सांगितले तेथे जात नाही. दुसरीकडे न सांगता कार्यवाही होत. मी आठ पत्र दिले कार्यवाही केली नाही.

श्री.गजानन बारवाल :अनेक पार्कींग कॉन्ट्रक्ट पध्दतीने दिल्या. त्याचा दुरूपयोग होत आहे. जालना रोड वर अनधिकृत पार्कीगचे पैसे वसुल करीत आहे. पार्कींगच्या दिलेल्या जागा बाबत आढावा घ्यावा योग्य कार्यवाही करावी.

मा.महापौर :पार्कींगच्या जागेवर इतर वापर होत असेल तर कार्यवाही करावी. पार्कींगच्या जागा खुल्या असाव्यात. प्रशासनाने मोहिम राबवावी कार्यवाही करावी.

प्रश्न क्रमांक ४३७ :श्री.जमीर अहेमद कादरी

श्री.जमीर कादरी :उत्तर मिळाले परंतु स्टॉक रजिस्टर नाही. एक महिन्यात माहिती देऊ असे दिले. जुने किती पोल जमा आहे? नवीन फिटींग होते तर जुने फिटींगचा कुठे वापर होतो?

श्री.राजेंद्र जंजाळ :क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यातील जुने पोल व लाईट फिटींग किती व कुठे आहे? पत्र दिल्यानंतरही माहिती मिळत नाही.

उपअभियंता-श्री.देशमुख:पोल व लाईट फिटींगची माहिती संकलीत करणे चालू आहे. १५-२० दिवसात तयार होईल

श्री.राजेंद्र जंजाळ :इनवर्ड नंबर रजिस्टर जे की स्टॉक रजिस्टर असेल, त्यानुसार माहिती देता येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :जुने पोल व लाईट फिटींग कुठे आहे? वापरात आणल्या जातात का? विक्री करतात. १० वर्षात असे किती साहित्य जमा आहे. यासाठी सक्षम अधिकारी यांचेकडून ऑडीट करून घ्यावे. जुनेच पोल फिटींग दुसरीकडे वापरणे व त्याचे बील काढले जाते काय? सर्व माहिती घ्यावी.

श्री.नासेर सिद्दीकी :विद्युत विभागाचे अधिकारी फोन उचलत नाही. कार्यवाही करावी.

श्री.मनोज गांगवे :जुने पोल आहे. आमच्या वार्डात मागणी करूनही देत नाही.

मा.महापौर :जुने पोल व लाईट फिटींग काढल्यानंतर ते साहित्याचे स्टॉक रजिस्टरला नोंद होते किंवा कसे? नवीन कामात वापरले जाते का? या बाबत मा.आयुक्तांनी चौकशी करावी. क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यातील किती पोल व फिटींग होते. चौकशी करावी. अहवाल सादर करावा.

मा.उपमहापौर :जयभवानीनगर गजानन मंदीर रोडवर गुढी पाडव्याच्या दिवशी पुर्ण लाईट बंद होते. सार्वजनिक कार्यक्रमाच्या वेळी लाईट बंद असायला नको, सभागृहातील माईक व्यवस्था बरोबर नाही. पोल व फिटींग बाबत स्टॉक रजिस्टर ठेवत नाही हे योग्य आहे का?

श्री.भगवान घडमोडे :प्रत्येक वार्डात ५० टक्के लाईट बंद आहे. परंतु लाईटची ए-१ ची कामे चालू असल्याचे सांगतात. आजही माझ्या वार्डात ३२ लाईट बंद आहे. फोन केला असता गाडी नाही. अशी उत्तरे मिळतात. आम्हाला कॉन्ट्रॅक्टरकडून काम करून घ्यावे लागते. अधिकारी यांना माहित नसते किती काम झाले? चौकशी करावी अधिकारी ठेकेदारावर कार्यवाही करावी.

श्री.मनोज गांगवे :काम घेणारी एजन्सी एक व दुसरीच एजन्सी काम करते याची चौकशी करावी.

श्रीमती सीमा खरात :वार्डात लाईटची किती कामे केली व करणार आहे सदस्यांना विश्वासात घेतले जावे.

श्रीमती संगीता वाघुले :वार्ड ३४ मध्ये दिवसा लाईट चालू व रात्री बंद असतात.

श्रीमती समीना शेख :विद्युत विभागामध्ये झालेल्या बोगस कामाची चौकशी करण्याची मागणी करते अहवाल अद्याप दिला नाही. या विभागात नेहमीच घोटाळा होतो. संबंधीतांवर कार्यवाही करावी. चौकशी चालू असतांना सुध्दा त्यांचे पेन्शन चालू आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सिडको बसस्टॅण्ड ते जळगाव टी पॉईन्ट-१८०, क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन या रस्त्यातील-२५०, दिल्लीगेट-३०, चंपाचौक-३५, रोषणगेट-२७, पैठण रोड-२४ औरंगपूरा-२५० फिटींग काढून ९० लाईट फिटींग बसविली. जुने सर्व फिटींग कुठे आहे? चौकशी नेमावी. याचा अहवाल घ्यावा. आमच्या वार्डातील छोटी छोटी कामे होत नाही.

श्रीमती समीना शेख :लाईटच्या संदर्भात झालेल्या कामाची चौकशी लावली होती. अहवाल का दिला नाही?

श्रीमती मनीषा मुंडे :जयभवानी नगर, गजानन नगर या भागात पुर्ण लाईट बंद आहे. फोन केला असता, कुणीही स्थळ पाहणीसाठी येत नाही.

श्री.गोकुळसींग मलके :माझ्या वार्डात लाईटची कामे करणारे ठेकेदार कोण? माहिती देत नाही. ३ पत्र दिले. लाईट बंद आहे. ठेकेदार भेटत नाही.

श्रीमती संगिता वाघुले :श्री.देशमुख कोणतेही काम करीत नाही.

उपअभियंता(श्री.देशमुख):इरा इलेक्ट्रीक एजन्सी काम करीत आहे.

श्री.रामेश्वर भादवे :लाईट फिटींगची संचिका गहाळ झाली. किती दिवसात मिळणार आह? शोध घेत आहे का ?

उपअभियंता (विद्युत) :लेखा विभागात संचिका आहे.

मा.आयुक्त :हा गंभीर विषय आहे. या बाबत चौकशी सुरू केली आहे. रिपोर्ट घेऊ. वेळ लागणार आहे. माहिती दिली जाईल. जुने काढलेले पोल व लाईट फिटींग बाबत माहिती घेऊ ते कुठे वापरले जाते, काय जर यात ठेकेदार किंवा अधिकारी दोषी असेल तर कार्यवाही होईल. साऊंड सिस्टम व इतर विषय गंभीरतेने विचारात घेऊन संबंधीत श्री.बनसोडे यांना कामावरून कमी करण्यात येते.

श्रीमती समीना शेख :चौकशी अहवाल येत नाही. तोपर्यत श्री. बनकर यांचे पेन्शन बंद करावे.

प्रश्न क्रमांक ४३८ :श्री.जमीर अहेमद कादरी

श्री.जमीर कादरी :जुनी वाहने किती माहिती विचारली होती. त्यातील पार्ट इकडे तिकडे जात आहे. त्यातील इंजन गायब आहे. नवीन पार्ट टाकले जाते. परंतु त्याची बाजारातील किंमत कमी असते यात मनपाचे नुकसान होत आहे ४ रू. ऐवजी १० रूपये रेट दाखवितात.

कार्य.अभियंता-श्री कोल्हे:माहितीचा तक्ता दिला आहे. १४ वाहने आहे. १० वाहनाचे सामान पुर्ण आहे.

प्रश्न क्रमांक ४३९ :श्री.जमीर अहेमद कादरी

श्री.जमीर कादरी :लहान रस्ते चांगले नाही मशीन का घेत आहोत?

मा.महापौर :घ्यायचे की नाही विचार करण्यात येईल.

श्री.नासेर सिद्यीकी :साफसफाई कर्मचारी संख्या कमी आहे भरती करावी.

मा.महापौर :चार दिवसानंतर आकृतीबंद या विषयावर बैठक घेणार आहोत.

प्रश्न क्रमांक ४४२ :स.श्री.जहागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी

श्री. अय्युब जहागीरदार:सन-२०१५ मध्ये महापालिकेची निवडणुक झाली. ८ महिन्यापासून एम ॲण्ड आरची कामाचे टेंडर वगैरे करण्यासाठी उशीर झाला. ११३ स.सदस्य निवडून आले. सर्वच वार्डात अर्धवट कामे राहिली होती. मोठया समस्या निर्माण झाल्या. जेथे स्लम भाग आहे, जेटींग मशीन जात नाही. अशा भागातील कामे करण्यास अनुमती दिली गेली व ए-१ ची कामे करण्यात आली. आठ महिने हे काम होत राहिले. स.सदस्य व अधिकारी यांचे सांगण्यावरून ठेकेदार काम करीत राहिले. त्यानंतर मा.आयुक्त श्री.केंद्रेकर साहेबांनी अशी कामे थांबविली. एम ॲण्ड आरची टेंडर वेळेवर झाले असते, तर ए-१ ची कामे करण्याची गरज नव्हती. परंतु वेळेवर एम ॲण्ड आर च्या कामाचे टेंडर निघाले नाही. टेंडर उशीरा काढल्यामूळे ए-१ व रेटलिस्टची कामे तातडीच्या वेळी अशी कामे करावी लागत असे. ती करण्यात आली. एम ॲण्ड आरच्या टेंडर निघाले, त्यापुर्वी ए-१ व रेटलिस्टची कामे केली. छोटे-मोठे ठेकेदार परेशान आहे. ही कामे झाली आहे

की नाही? चौकशी करावी त्या कामाचे फोटो पाहावे. जेथे काम झाले त्या स.सदस्यांना विचारपूस करून अधिकारी व संबंधीत जे कुणी असेल त्यांनी जॉईन्ट सर्वे करून संबंधीत ठेकेदारास त्यांनी केलेल्या कामाचे बील अदा करावे.

श्री.राजगौरव वानखेडे :निवडणूक झाली बजेट अंतिम झाले नव्हते. लाईट किंवा ड्रेनेजचे तातडीचे काम असेल, अशी तातडीची कामे अधिकारी यांना सुचीत केली व करून घेतली. त्यानंतर श्री.केंद्रेकर साहेबांनी ए-१ ची कामे थांबविली. बंद केली. दुमत नाही. परंतु त्यापुर्वी तातडीची कामे बरीच कामे करून घेतली आहे. कामे केल्या बाबतचे फोटो काढलेले असतील, त्यानुसार काम झाले की नाही तपासावे. लहान लहान रक्कमेची कामे केली आहे त्या ठेकेदारांनी आंदोलन सुध्दा केले ज्यांनी कामे केली तपासणी करावी कमेटी नेमावी माहिती घ्यावी संबधीत ठेकेदारांना बील द्यावे.

मा.महापौर :प्रशासनाने या बाबत माहिती घ्यावी. चौकशी करून प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

प्रश्न क्रमांक ४४६ :स.श्रीमती शबनम बेगम

श्री.भाऊसाहेब जगताप :धनादेश का दिला नाही?

कार्य.अभियंता(स्लम ) :धनादेश तयार आहे दिला जाईल.

प्रश्न क्रमांक ४४७ :स.श्रीमती शबनम बेगम

श्रीमती समीना शेख :महापालिकेच्या मालकीचे भुखंड किती? मनपाचे नाव का लावले नाही? व सद्यस्थिती काय? असा प्रश्न होता. १४११ भुंखड असल्याची लिस्ट दिली वापर काय होतो? माहिती दिली नाही.

श्री.गजानन बारवाल :सील्पनगर भागातील जागेवर तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाजूला महापालिकेची जागा आहे. अतिक्रमण झाले. ताब्यात घ्यावी.

श्रीमती समीना शेख :मालमत्ता विभागाचे लेखा परीक्षण केंव्हा केले? जागा आहे. परंतु. प्रत्यक्षात अतिक्रमण असून जागा दिसून येत नाही. आरक्षीत जागा गिळंकृत होत आहे बातमी आली खुलासा करावा.

श्री.रामेश्वर भादवे :लक्ष्मण चावडी ते सिल्लेखाना रस्त्यावर संतोषी माता मंदीर होते. ती जागा मनपाने दिली होती. त्यावर अतिक्रमण झाले. आनंद अपार्टमेन्टच्या बाजूला २४००० स्क्वे.मी.ओपनस्पेस तेथे अतिक्रमण केले. या दोन्ही जागा ताब्यात घ्याव्यात.

श्री.जहागीर खान :कटकट गेटच्या बाजूला जागेवर अतिक्रमण केलेले आहे.तसेच मौलाना आझाद रिसर्च सेंटरच्या बाजूला असलेल्या महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण होत आहे.

श्रीमती समीना शेख :६ एप्रिल १६ रोजी बातमी आली की, महापालिकेच्या कोटीच्या मालमत्ता दोन मजूरांच्या हाती. हे सत्य आहे काय? या जागेची देवाणघेवाण व इतर सर्व कामे हे कर्मचारी करतात का?

श्री.अय्युब खान :कटकट गेट येथील टीडीआरचे प्रकरण आहे. या संदर्भात मी दिनांक २२-१२-२०१५ ला पत्र दिले सन-१९८५ ला पंचनामा करून जमिन रेकॉर्ड घेऊन मास्टर

प्लॅन केलेला होता. परंतु पुन्हा सन-२०१२ मध्ये टीडीआर प्रकरण करून त्याबाबत मोबदला देण्यात आला. याबाबत चौकशी करण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :जुना वार्ड क्रांतीचौक आठ ओपन स्पेस बाबतीत २२ पत्र मी दिले. कार्यवाही केली नाही. वर्षानुवर्षे एक व्यक्ती दीड एकर जागेचा उपभोग घेतो. विकास ॲग्रीमेन्ट करणेसाठी त्यांचे प्रयत्न चालू आहे. ही जागा मनपाची आहे. तसेच यश मंगल कार्यालय समोरही जागा आहे. विद्यानगर भागातील रोषण हौ.सोसायटी तेथे मनपाची खुली जागा होती. तेथे अपार्टमेंन्ट बांधले. रिवाईज ले-आऊट करून नाल्यामध्ये दाखवली. जी जागा आहे तेथे अवैध गार्डनची पार्कींग केली जाते. विशालनगर भागात अर्धा एकर जागा खुली आहे. मोजमाप करीत नाही तार फिन्सींग नाही. याकडे लक्ष देत नाही. अधिकारी तेथे जात नाही. नगररचना अधिकारी कार्यवाही करीत नाही. मनपाच्या सर्वच जागे बाबत तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. तसे आदेशीत करावे.

श्रीमती शिल्पा वाडकर :माझ्या वार्डात गजानननगर भागात महापालिकेची जागा आहे. पीआर कार्डवर नाव लावून घेणेसाठी पत्र दिले. कार्यवाही होत नाही.

श्रीमती समीना शेख :नेहरूभवन महापालिकेची मालमत्ता आहे पीआर कार्डवर नाव आहे काय ?

मा.महापौर :महापालिकेच्या जागा मालमत्ता यांचे महापालिकेच्या नावाचे पीआर कार्ड असावे. पीआर कार्डवर महापालिकेचे नाव लावण्यासाठी निवृत्त तज्ञ अधिकाऱ्याची नियुक्ती करून कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :गजानन कॉलनीच्या जागेचा निर्णय मनपाच्या बाजूने लागला. जैसे थे चे आदेश होते. ते काढून टाकले व महापालिकेने नाव लावून घ्यावे. असे कळविले कार्यवाही केली नाही.

श्रीमती समीना शेख :किती भुंखड आहे? किती जागेवर अतिक्रमण आहे? यासाठी चौकशी समिती नियुक्त करावी.

श्रीमती ज्योती मोरे :वार्ड ९५ स.नं.५१ मध्ये फुलपगर यांनी अतिक्रमण केले मागे हा प्रश्न उपस्थित केला होता. कार्यवाही होत नाही.

श्री.नंदकुमार घोडेले :महापालिकेचे भुखंड व जागा ले-आऊट मंजूर करतांना खुल्या जागा जे १०,१५ टक्के असतील. आरक्षीत जागा आपण टीडीआर एफएसआय किंवा रोख रक्क्म देऊन घेतलेल्या असतात. अशा जागाही मुळ मालकाच्या नावावर आहे. उदा. नाथ प्रांगणची जागा खरेदी केली होती. मोबदला दिला, असे असतांना त्यांनी अर्ज दिला की, ही जागा माझ्या वारसाच्या नावाने करून द्या वी .पुष्पनगरी मधील जागा मुळ मालकांने त्यांचे नावावर करून घेतली. अशा अनेक जागा आहेत. ज्या वारसदार स्वत:च्या नावाने करून घेण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. म.जि.प्राधीकरणाकडून मनपाकडे जागा हस्तांतरीत झाल्या. अद्याप ताब्यात घेतल्या नाही. तेथे त्यांचेच लोक राहतात. कोट्यावधी रूपयाची जागा आहे. डीपी रोडच्या जागा सुध्दा मोबदला दिला. त्याच मालकाच्या नावावर आहे. या साठी डेप्युटेशनवर अधिकारी नेमून कार्यवाही करावयाचा ठराव घेतला. कार्यवाही होत नाही. ह्या जागा ताब्यात का घेतल्या नाहीत?

उपआयुक्त(मालमत्ता) :जीवन प्राधिकरणास जागा दिली आहे. मालमत्ता विभागाकडून कार्यवाही झाली नाही. स्वतंत्र संचिका चालू आहे. जो करारनामा झाला, त्याची प्रत मागितली आहे ती प्रत दिली नाही. आता कार्यवाही करायची असेल, तर तेथे सील करावे लागेल. महापालिकेच्या एकूण जागा १४११ आहे. यादी सदस्यांना दिली आहे. त्याचा वापर काय? असा प्रश्न होता. ५११ कमानी आहे. ४११ दुकाने आहे. १४६ समाज मंदीर ओपनस्पेस १४११ आहे. या विभागात चार लिपीक व सर्बोशर आहे. मालमत्ता अधिकारी यांना तीन चार्ज आहे. माझे कडे चार्ज आल्यानंतर प्रत्येक मालमत्ताची माहिती जाणून नोंद करून घेतली. रजिस्टर मेंन्टन केले. प्रत्येक मालमत्तावर वॉच ठेवायचे असेल तर वार्डवाईज माहिती घेऊन कार्यवाही करता येईल. ज्या ज्या तक्रारी येतील कार्यवाही केली जाईल.

श्री.जहागीर खान :मी पत्र दिले. ते अतिक्रमण काढले नाही.

श्री.फेरोज खान :शहागंज चमन अनधिकृत पार्कींग झाली. परवानगी दिली काय ?

उपआयुक्त(मालमत्ता) :परवानगी दिली नाही.

मा.महापौर :कार्यवाही करावी.

श्रीमती समीना शेख :सर्व जागा ताब्यात घेण्यासाठी कार्यवाही व्हावी समिती नेमावी जागा ताब्यात घ्याव्यात.

कार्य.अभियंता(श्री.कोल्हे):एमजीपीला दिलेली जागे बाबत मालमत्ता विभागाकडून पत्र दिले आहे. मालमत्ता विभागाकडे खुलासा आला आहे व त्यांना हेच सांगावे लागणार की, ऑफिसची जागा सुध्दा मनपाकडे हस्तांतरीत केली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :निराला बाजार येथे अनधिकृत पार्कींग चालू आहे. तसेच शहानुरमिया दर्गा जवळ श्रीहरी मैदान येथेही गाडया उभ्या राहतात.

श्रीमती समीना शेख :संजयनगर येथे सन-१९७२ मध्ये एमजीपीने पाण्याची टाकी बांधली होती. ती जागा व टाकी मनपास हॅण्डवर्क झाली आहे. पीआर कार्डवर नाव नसल्याने एका व्यक्तीने ताबा केला आहे.

मा.महापौर :संबंधीताने ज्या सुचना केल्या, त्यानुसार संबंधीत अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

प्रश्न क्रमांक ४४८ : श्रीमती शेख समिना शेख इलियास

श्रीमती समीना शेख :डांबर प्लॅन्ट मंजूर केला तरतूद ठेवली काय ?

कार्य.अभियंता(श्री कोल्हे):लेखा विभागास तसे कळविण्यात आले आहे.

प्रश्न क्रमांक ४४९ :श्रीमती शेख समिना शेख इलियास

श्रीमती समीना शेख :महापालिकेच्या हद्दीत मंगल कार्यालय किती माहिती दिली नाही.१५ दिवस पत्र देऊन झाले माहिती दिली नाही.

उपआयुक्त(मालमत्ता) :१६ तारखेला प्रश्न प्राप्त झाला वार्ड कार्यालयास कळविले माहिती आल्यानंतर दिली जाईल.

प्रश्न क्रमांक ४५१ :श्रीमती शेख समिना शेख इलियास

श्रीमती समीना शेख :समांतर बाबत प्रश्न दिला होता माहिती दिली नाही

मा.महापौर :सर्व माहिती सदस्यांना देण्यात यावी.

प्रश्न क्रमांक ४५२ :स.श्री अजीम अहेमद रफीक

श्री.अजीम अहेमद :वार्ड ४३ मध्ये ड्रेनेज पाणी मिश्रीत होत आहे. झालेले कामा बाबत माहिती दिली. १३० मीटर पाईप टाकला. असे दाखविले कोठून आणला व कोठे टाकण्यात आला माहिती द्यावी. खोटी माहिती दिली आहे.

कार्य.अभियंता(श्री.कोल्हे):जो प्रश्न उपस्थित केला, कंपनीने माहिती दिली. उद्याच सदर ठिकाणी जाऊन पाहणी केली जाईल. स.सदस्यांना बोलविण्यात येईल. योग्य ती कार्यवाही केली जाईल.

प्रश्न क्रमांक ४५३ :स.श्री अजीम अहेमद रफीक

श्री.अजीम अहेमद :डीपीडीसी मधून मंजूर निधीतून कटकटगेटच्या बाजुच्या दोन्ही रस्त्याचे काम करण्याचे काम मा.पालक मंत्री साहेब यांनी सुचविले होते. काम सुरू केले नाही. भुसंपादनासाठी नोटीस दिल्या नाही. अनेक लोक टीडीआर घेण्यास तयार आहे.

कार्य.अभि.(श्री.सिकंदर अली):या संदर्भात दोन्ही साईडने ५०-५० फुट नॉन डीपी रस्ता आहे. नगररचना विभागाशी चर्चा केली. यात काही लोक टीडीआर घेण्यात तयार आहे. काहींना मोबदला पाहिजे. १.२८ लक्ष द्यावे लागणार आहे. तीन दिवस दिले आहे. कोणती बाजू घ्यायची आहे. १३ प्रॉपर्टीज आहे. ती बाजू घ्यायची आहे की, दुसरी बाजू निर्णय घेणार आहोत.

श्री.अजीम अहेमद :स्टे वगैरे येणार नाही. त्यासाठी कॅव्हेट अगोदर दाखल करावे. या रस्त्यावर जागा उपलब्ध होईल. रस्त्याचे काम तातडीने करावे.

श्रीमती ज्योती अभंग :दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ७.५० कोटी निधी वाटप केला. त्यात दुजाभाव झाला. एकाच वार्डास ३ कोटी निधी दिला. माझ्या वार्डात पाण्याची लाईन होत नाही. फुलेनगर, जयभिमनगर, उस्मानपूरा या भागातील लोकांची रस्ता रूंदीकरणात घरे गेली. त्यांना स.नं. २१६ मध्ये प्लॉट दिले. तेथे पाण्याची, लाईटची व्यवस्था नाही. एकाच वार्डासाठी ३ कोटी कसे दिले गेले?

कार्य.अभियंता-स्लम :७-८ वर्षापासून या योजने अंर्तगत ५० लक्ष येत होते. सर्वे केला. अंदाजपत्रक केले. मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवितो. ते मान्यता देतात. २४ कोटीचे अंदाजपत्रक करून पाठविले होते. त्यांनी प्राधान्य क्रम देऊन हा निधी मंजूर केला असेल.

श्री.अफसर खान :माझ्या वार्डासाठीही प्रस्ताव मंजूर केला होता. माझ्या वार्डात दलित वस्ती आहे. सर्वांना निधी मिळायला पाहिजे. जेथे जरूरी आहे, त्या भागात मिळावा. असे अधिकारी यांनी शासनाकडे सुचवायला पाहिजे होते.

मा.उपमहापौर :कोणत्या वार्डात किती निधी असावा, हे महापालिकेने ठरावायला पाहिजे. किती प्रस्ताव दिले होते? प्रत्येक वार्डात समान निधी मिळायला पाहिजे.

कार्य.अभियंता-स्लम :मा.जिल्हाधिकारी यांना अधिकार दिले आहे. ते प्रशासकीय मान्यता देतात. किती निधी मिळावा? यात मनपाचा रोल नाही.

श्री.राजू शिंदे :एका वार्डासाठी ३ कोटी व इतर वार्डासाठी उर्वरीत असे नसावे. मा.पालकमंत्री यांचेशी आपण चर्चा करून शहराच्या विकासासाठी जो फंड येईल, तो सर्व वार्डात समान वाटप झाला पाहिजे. अशी कार्यवाही करावी.

श्री.चेतन कांबळे :हा निधी शासनाचा आहे. समान वाटप करावे. असे नियमात नाही. भिमनगर भावसिंगपूरा भागात २० वर्षापासून एकही रूपया खर्च केला नाही. ५ हजार लोक विकत पाणी घेतात. वार्ड १३ च्या विकासासाठी मागीतले. दलित महिला उघड्यावर शौचालयास बसतात. २० वर्षात कामे झाली नाही. समांतर एजन्सीनेही पाण्याची लाईन टाकली नाही. मा.जिल्हाधिकारी या समितीचे अध्यक्ष आहे. मुलभूत सुविधासाठीच हा निधी मिळाला. आतापर्यंत या भागात काम केले नाही.

श्री.राजू शिंदे :सर्व वार्डात हा निधी खर्च व्हावा.

श्रीमती ज्योती अभंग :समान निधी वाटप व्हावा. चौकशी समिती नेमावी. माझ्या वार्डातही अनेक कामे आहे. जसे वार्ड १३ चा विचार केला. इतरही वार्डात कामे करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :मा.जिल्हाधिकारी यांचेशी चर्चा करून जास्तीत जास्त निधी मिळण्याचा प्रयत्न करावा.

श्री.भगवान घडमोडे :अनेक वार्डात या निधीतून कामे व्हावीत. प्रस्ताव करून पाठविले. समान निधी मिळावा. प्रशासनाने यात चूक केली. सर्वच वार्डात कामे करण्यासाठी हा निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करायला पाहिजे होता. समान निधी वाटप बाबत मा.जिल्हाधिकारी यांना कळवावे.

श्री.गंगाधर ढगे :उस्मानपुरा, प्रबुध्दनगर, मिसरवाडी अशा इतर अनेक भागात दलित वस्ती आहे तेथेही हा निधी मिळावा.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रस्ताव दाखल केला जातो. प्राधान्य क्रमाने मंजूर होतो. तीन महिला नाल्यात वाहून गेल्या होत्या. शपथपत्र दाखल केले होते. त्यामूळे या वार्डासाठी निधी देण्याचे नियोजन केले असावे. योग्य पध्दतीने प्रस्ताव दाखल केले जात नाही. जास्तीत जास्त निधी मिळण्यासाठी नियोजन करावे.

श्री.अफसर खान :किती प्रस्ताव पाठविले सर्व प्रपोजल सादर केले होते का?

श्री.आप्पासाहेब हिवाळे :सातारा-देवळाई नवीन प्रभाग झाले. येथे विकास कामासाठी अर्थसंकल्पात १० कोटीची तरतूद करावी. पाण्याचा प्रश्न सोडवावा.

कु.सायली जमादार :सातारा-देवळाई भागासाठी पाण्याचा प्रश्न सोडवावा. समांतर योजनेच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. इतरही विकास कामे करावी.

मा.महापौर :सातारा-देवळाई हा शहराचाच एक भाग आहे. हा भाग महापालिकेत समावेश करण्याची प्रोसेस सुरू केली तेंव्हा असे ठरले की, या भागाचा विकास करण्यासाठी शासनाकडे १०० कोटी निधी मागवायचा. या भागासाठी बजेटमध्ये तरतूद आहे. इतर निधी वापरला जाईल. तसेच या भागातून जमा झालेला निधी हा सिडकोकडे १८-२० कोटी आहे. तो निधी मिळाला तर, तेथे आणखीनच कामे होतील. दलित वस्ती सुधार योजनेच्या निधी संदर्भात मा.आयुक्तांनी मा.जिल्हाधिकारी यांचेशी चर्चा करून त्या निधीचे नियोजन चांगल्या पध्दतीने कसे होईल? व सर्वच वार्डात कामे होतील अशी कार्यवाही करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :पेपरला बातमी आली होती की, मुदतबाह्य औषधी महापालिकेच्या दवाखान्यातून प्राण्यांना दिल्या जातात. एफडीए चा काय रिपोर्ट आलेला आहे?

उपआयुक्त(आस्थापना) :अन्न व औषध प्रशासनाकडून रिपोर्ट आलेला आहे.

मा.महापौर :काय रिपोर्ट आला वाचून दाखवावे.

अति.आयुक्त :अहवाल आलेला आहे. तो संबंधीत विभागाकडे दिलेला आहे. संचिका मा.आयुक्ताकडे सादर होईल. मुदतबाह्य औषधी संबंधी आहे. त्यात स्पष्ट दिले की अशी औषधी आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :अहवाल काय आला? सभागृहासमोर ठेवावे.

मा.महापौर :अहवाल आला. स.पदाधिकारी यांना माहिती दिली नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :संबंधीत कर्मचारी अधिकारी यांना पाठीशी घालत आहे काय? अहवालानुसार कार्यवाही का केली नाही? १ तारखेला अहवाल आला, तर स.पदाधिकारी यांना का दाखविला नाही?

श्री.नंदकुमार घोडेले :डॉ.नाईकवाडे यांचे याकडे संपुर्ण दुर्लक्ष होते. मुदतबाह्य औषधी प्राण्यांना दिली असेल व अहवालात तसे आले का? श्री. नाईकवाडे यांना बडतर्फ करावे. त्यांचेवर प्राणी वधाचा गुन्हा दाखल करावा.

मा.उपमहापौर :रेणु नावाच्या वाघीणीला मुदतबाह्य औषधी दिली होती का? दहा पैकी दोन गोळ्या वापरलेल्या होत्या. या अहवालात काय दिले आहे? संबंधीतावर कार्यवाही का होत नाही?

श्री.नंदकुमार घोडेले :डॉ.नाईकवाडे यांनी मोठी चुक केली. अशा प्रकारे ५-६ प्राणी दगावले आहे. बिबट्याच्या मृत्यू प्रकरणी त्यांना निलंबीत केले. आता त्यांना बडतर्फ करावे. आपण स्वतः मा.आयुक्त यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. मुदतबाह्य औषधी आढळल्या. बडतर्फ करावे. त्यांचे प्रमुख जे असतील त्यांची चौकशी करावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :इनचार्ज त्यावेळी डॉ.नाईकवाडे यांचेकडे होता. श्री.शाहेद वर कार्यवाही का केली? त्यांचे निलंबन रद्य करावे. जेंव्हा निविदा झाली, तेव्हा तेथे नसबंदी डॉक्टर व इतर डॉक्टर होते. जे समोर असतील, त्यांचेवर कार्यवाही करणार काय?

उपआयुक्त (आस्थापना):या प्रकरणात मा.आयुक्त यांनी चार सदस्यीय समिती नियुक्त केली ज्यांचे मार्फत या सर्व प्रकरणाची चौकशी करणार आहोत.त्यात संचालक, अन्न व औषध प्रशासन,फॉरेस्ट विभागाचे अधिकारी, वॉइल्ड लाईफ जे ॲक्टीव्हीटीज पाहतात प्राण्या संदर्भात तसेच अन्न तपासणी प्रमुख, मुख्यलेखा परीक्षक असे चार समिती सदस्य असतील.तीनची नियुक्ती केली वॉइल्ड लाईफ येथे उपलब्ध नाही पुणेवरून तीन अधिकारी यांना पत्र देऊन बोलवित आहोत.

श्री.नंदकुमार घोडेले :या विषयी प्रशासन म्हणुन मा. आयुक्ताचे काय मत आहे?

मा.आयुक्त :संबंधीत डॉ.नाईकवाडे यांना निलंबीत केले आहे. आता चौकशी केली जाईल. अहवाल येईल. त्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल.

श्री.अब्दुल नाईकवाडी :नाईकवाडे यांना निलंबीत केले. तेंव्हा श्री.शाहेद कडे कोणता चार्ज होता? कुणावर अन्याय होऊ नये.

श्री.नंदकुमार घोडेले :अहवाल येईल, दोषी असेल तर कार्यवाही करावी.

मा.महापौर :मा.आयुक्तांनी चौकशी करावी. दोषी असेल कार्यवाही करावी. जे दोषी नसेल त्यांचेवर अन्याय होणार नाही. याची दखल घ्यावी.

**विषय क्रमांक ३७६:- (सर्वसाधारण सभा दिनांक १५.०३.२०१५ कार्यक्रम पत्रिका क्रमांक-१५ मधील स्थगीत विषय क्रमांक ३४४)**

**(करमुल्य निर्धारक व संकलक)**

सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक असल्याने मालमत्ता कर दर निश्चितीचा प्रस्ताव प्रशासनातर्फे दिनांक १८/०२/२०१६ रोजीच्या स्थायी समिती सभेपूढे विषय क्रमांक ५१ अन्वये सादर करण्यात आलेला होता. सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे, मालमत्ता करांचे दराबाबतच्या प्रस्तावावर सर्व समंतीने निर्णय होणे आवश्यक असल्यामुळे, सर्वसाधारण सभेमध्ये यावर सर्व स.सदस्य चर्चा करून निर्णय घेतील. करीता प्रस्तुत प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यांत आली.

**प्रशासनाचा मुळ प्रस्ताव खालीलप्रमाणे**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ९९ अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक आहे.

सन २०१६-२०१७ मध्ये कर आकारणी करणेसाठी पूर्वीप्रमाणेच खालील निवासी, निवासेत्तर, व्यावसायीक व औद्योगीक, शैक्षणिक संस्था, भारत सरकारच्या मिळकती, मोबाईल टॉवर्स असे गट करण्यात आलेले आहे. ते पुढील प्रमाणे,

**01.** **निवासी** :- राहते घर, माहिती तंत्रज्ञान वापरासाठी असलेल्या इमारती. (महाराष्ट्र शासनाचे औद्योगीक धोरण परिपत्रक क्र.शासन निर्णय आयटीपी-०३/सीआर-३९११/आयएनडी-७, दिनांक १२-७-२००३ अन्वये माहिती व माहिती तंत्रज्ञान यासाठी मिळकतींचा वापर असल्यास त्यांच्या करात सवलत देणेसाठी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, महाराष्ट्र शासन यांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.) धर्मादाय संस्था, स्वंयसेवी संस्था, सेवाभावी संस्था.

**02.** **निवासेत्तर** :- वकीलाचे कार्यालये, कर सल्लागारांचे खाजगी कार्यालये, शैक्षणिक संस्थेशी संलग्न असलेली वस्तीगृहे, स्वतंत्र वस्तीगृहे.

03. **व्यावसायीक** :- ०१. पेट्रोलपंप व त्यास संलग्न असलेली खुली जागा, व्यावसायीक दराने खुल्या जागेचे दर वेगळे आकारले जाईल. हॉटेल्स, लॉन्स (लग्न, समारंभासाठी वापरात येणारे लॉन्स) व्यावसायीक वापरासाठी मोकळया जागा, मॉल्स, सर्व प्रकारची दुकाने व शासकीय कार्यालये, डॉक्टरांचे क्लिनीक, खाजगी हॉस्पीटल्स्, कमर्शीयल पेड पार्कींगसाठी व्यावसायीक दराने कर आकारण्यात येईल. तसेच ज्या इमारती व्यावसायीक वापरासाठी भाड्याने दिल्या असतील अशा इमारतीनां सुध्दा व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल. धार्मिक स्थळाच्या जागेवर जर व्यावसायीक वापर होत असेल तर त्यास व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल.

**04.** **शैक्षणिक संस्था** :- **अ)** ज्या शैक्षणिक संस्था अनुदानित आहेत. अशा शैक्षणिक संस्थांना सामान्य कर ३० टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल.

**ब)** ज्या शैक्षणिक संस्था विनाअनुदानित आहेत, इंजिनियरींग कॉलेज, मेडीकल कॉलेज अशा शैक्षणिक संस्थांना सामान्य कर ३७.५ टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल.

**05.** **भारत सरकारच्या मिळकती** :- मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार भारत सरकार व त्यांच्या अंगीकृत असलेली कार्यालये व इतर मिळकती यांना वापरानुसार कर आकारणी करून त्यांना महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या सुविधानुसार एकूण कराच्या ७५ टक्के, ५० टक्के व ३३.३३ टक्के रक्कम सेवा शुल्क म्हणून वसूल करण्यात येईल.

**06.** **मोबाईल टॉवर्स** :- टॉवरसाठी भाडयाने घेतलेल्या इमारतीतील जागेचे प्रती माह भाडे नुसार किंवा भाडेपट्टा करारनामानुसार यापैकी जे जास्तीचे असेल त्याप्रमाणे कर आकारण्यात येईल. तसेच बी.एस.एन.एल. व इतर दूर संचार कंपनीचे स्वतःच्या जागेत मोबाईल टॉवर

असल्यास अशा मोबाईल टॉवरला तळाचे क्षेत्रफळानुसार रू.९००/- प्रती चौ.मी. प्रती महा दरानुसार कर आकारणी करण्यात येईल. तसेच अनाधिकृत टॉवर्सला मालमत्ता कराची दुप्पट शास्ती लागु राहील.

**07.** **औद्योगीक** :- एम.आय.डी.सी., औद्योगीक क्षेत्र इत्यादी.
वरील संज्ञेत मोडत असलेल्या मालमत्तेस सामान्य कराचा दर खालील प्रमाणे राहील.

08. सामान्य करा बाबतचा तक्ता :-

| सामान्य कराचा प्रकार वापराप्रमाणे | सध्याचे सामान्य कराचे दर | प्रस्तावित सामान्य कराचे दर |
|---|---|---|
| १. निवासी (उपरोक्त 'अ' प्रमाणे) | ३०% | ३०% |
| २. निवासेत्तर (उपरोक्त 'ब' प्रमाणे) | ३७.५% | ३७.५% |
| ३. व्यावसायीक(उपरोक्त 'क' प्रमाणे) | ४५% | ४५% |
| ४. औद्योगीक (उपरोक्त 'ड' प्रमाणे) | ३६% | ३६% |
| ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |
| ६. विना अनुदानित शैक्षणिक संस्था | ३७.५% | ३७.५% |

09. **उपभोक्ता कर** :-
घनकचरा व्यवस्थापणेसाठी लागणारा खर्च शहरातील सर्व मिळकत धारकांकडुन उपभोक्ता कर म्हणुन वसुल करण्यासाठी खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**०१** निवासी वापराच्या मिळकतीस रू.१००/- उपभोक्ता कर आकारण्यात येईल.

**०२** निवासेत्तर, व्यावसायीक, शैक्षणिक, औद्योगिक वापराच्या मिळकतीस रू.५००/- उपभोक्ता कर आकारण्यात येईल.

**१०.** **नामांतर शुल्क** :- खरेदी विक्री आधारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या दस्त / कागदपत्र आधारे नामांतर शुल्क कर योग्य मुल्यावर खालील प्रमाणे आकारण्यात येतील.

| निवासी व व्यावसायीक कर योग्य मुल्य | नामांतर शुल्क | |
|---|---|---|
| | (शहर, सिडको व औद्योगिक भागातील निवासी मिळकतींसाठी) | (शहर, सिडको भागातील व्यावसायीक मिळकतींसाठी) |
| रू. ०१ ते १०,०००/- | रू.१५००/- | रू.३०००/- |
| रू. १०,००१/- ते ५०,०००/- | रू.४५००/- | रू.९०००/- |
| रू. ५०,००१/- ते पुढे | रू.९०००/- | रू.१८,०००/- |
| औद्योगिक वसाहतीतील व्यावसायीक मिळकतींसाठी | | |
| रू.०१ ते ५०,०००/- | | रू.१८,०००/- |
| रू.५०,००१ ते १,००,०००/- | | रू.३०,०००/- |
| रू.१,००,०००/- च्या पुढे | | रू.७५,०००/- |

11. **अदत्त रकमेवरील शास्ती** :-
चालु मागणीचे बिल प्राप्त झाल्यानंतर अशा बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रथम सहामाही देयकाची रक्कम ३० जुन पूर्वी व द्वितीय सहामाही देयकाची रक्कम ३१ डिसेंबर पूर्वी भरणे बंधनकारक आहे. जर कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर अशा अद्त रकमेबद्दल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

१९४९ चे प्रकरण-८ कराधान नियम ४१ अन्वये प्रत्येक महिन्यासाठी कराच्या २ टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणून द्यावी लागेल.

**11.1 अवैध बांधकामावर शास्ती :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २६७ (अ) नुसार दि.१-४-२००८ पासून अवैध बांधकाम किंवा पूनर बांधकामास तथा इमारतीवर बसविण्या योग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी शास्ती ते बांधकाम जो पर्यंत अवैध म्हणून राहील तो पर्यंत वसूल करण्यात येईल.

१२. विशेष सवलती :-

१२.१ पाच वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्यास वार्षीक कराच्या सामान्य करात दोन वर्षाची सूट देण्यात येईल.

**१२.२** तीन वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्या एक वर्षातील वार्षीक कराच्या सामान्य करात ५०% सूट देण्यात येईल.

**१२.३** जे मालमत्ताधारक चालु वर्षाचा खालील महिन्यात मालमत्ता कर भरणा करतील त्यांना सन २०१६-२०१७ करीता सामान्य करात पुढील प्रमाणे सूट देय राहील.

| | |
|---|---|
| एप्रिल | १०% |
| मे | ८% |
| जुन | ६% |

जुलै ते मार्च पर्यंतच्या कालावधीत चालु आर्थिक वर्षातील मागणीवर तसेच थकबाकीवर सूट देय राहणार नाही.

**१२.४.** आजी / माजी सैनिकांना व स्वातंत्र्य सैनिकांना व त्यांच्या पत्नीच्या नांवे असलेल्या मिळकतीस मागील वर्षाप्रमाणेच सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात देखील निवासी वापर करीत असलेल्या केवळ एका मिळकतीस सामान्य करात १००% सूट दिली जाईल.

**१२.५** जे मालमत्ताधारक आपल्या मिळकतीत सोलर सिस्टीम लावतील त्यांना सामान्य करात चालु वर्षात ५% सुट दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

**१२.६** जे मालमत्ताधारक आपल्या मालमत्तेस रेन हार्वेस्टींग सिस्टीम (Rain Harvesting System) लागु करतील, अशा मालमत्ताधारकास सामान्य करात २५% सवलत दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

**१२.७** जे मिळकतधारक नेट बॅकींग, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्डव्दारे ऑन-लाईन मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना अशा मिळकतधारकांना चालु आर्थिक वर्षातील मालमत्ता कराच्या सामान्य करात १% सूट देय राहील.

१३. **कर आकारणी प्रणाली :-**

औरंगाबाद शहराचे वेगवेगळे भाग पाडुन त्याभागातील मिळकतीच्या/जागेचा मुल्यानुसार त्यांचे वाजवी भाडे आकारणी करण्यासाठी विचारात घेण्यात येते. अशा प्रकारचे भाग पाडुन मुल्यांकन हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणका मधील निवासी जागांच्या किमंती विचारात घेवुन औरंगाबाद शहराचे खालील प्रमाणे भाग करणे योग्य होईल. यामुळे औरंगाबाद शहरातील वेगवेगळया भागातील मूल्य (जागेचे) वेगवेगळे मिळवुन त्यानुसार मिळकतीचा स्तर (वर्गीकरण) होवुन त्यानुसार मालमत्ता कर आकारणीसाठी दर आकारणे योग्य राहील.

**१३.१** सन -२०१० चे महाराष्ट्र शासनाकडील सिध्द शिघ्र गणक (Ready Recknor) आधारे दिनांक ०१-०४-२०१० पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सर्व मिळकतीसाठी चार विभाग हे

मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.९८५ दि.२०-२-२०१० नुसार पूर्वी प्रमाणेच करण्यात आलेले होते. त्यानुसार सन २०१२ मध्ये देखील चार भाग करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने सन २०१६ साठी शिघ्र शिध्द गणकाचे दर अद्याप शासनातर्फे प्रसिध्द न झाल्याने सन २०१५ मधील सिध्द शिघ्र गणकातील दरानुसार अ, ब, क, व ड असे चार भाग होतात. खालील कोणत्या भागात कोणती मिळकत येते, हे तपासता येईल. तसेच दरवर्षी दर बदलले तरी कर आकारणीसाठी हे विभाग पुढील चार वर्षासाठी असेच ठेवण्यात येतील.

| अ. क्र. | विभाग | सन २०१२ च्या विभागानुसार मिळकतीचा प्रचलीत दर /चौ.मी. | सन २०१६ च्या विभागानुसार प्रस्तावित मिळकतीचा दर /चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | अ | रू.१७,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती | रू.४५,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती |
| २ | ब | रू.१३,००० ते रू.१६,९९९/- | रू.३४,९०० ते रू.४४,९९९/- |
| ३ | क | रू.११,००० ते रू.९,९९९/- | रू.३१,७९९ ते रू.३४,८९९/- |
| ४ | ड | रू.८५०० ते १०,९९९/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) | रू.२५,००० ते ३१,८००/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) |

वरील प्रस्तावित दर हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणकामधील घेण्यात आलेले आहे.

सिध्द शिघ्र गणक सन २०१५ नुसार शहरातील चार विभागांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार केला असता त्यामध्ये सरासरी १७४.६९ टक्के टक्के वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सन २०१५-१६ च्या विद्यमान दरात सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी कर आकारणीच्या दरात सरासरी २५ टक्के वाढ प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**१४.** सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामध्ये कर योग्य मुल्य निश्चित करणेकरीता खालील प्रमाणे वर्गीकरणानुसार व सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती माह प्रती चौ.मी.प्रचलीत दर आकारण्यात येत आहे. :-

**१४.१ निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- | रू.६/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.९/- | रू.८/- | रू.७/- | रू.५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.८/- | रू.३/- | रू.२/- | रू.१/- |

**१४.२ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१३.७५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.७.५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.८.७५/- | रू.६.२५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१०/- | रू.३.७५/- | रू.२.५/- | रू.१.२५/- |

**१४.३ (अ) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२२/- | रू.२०/- | रू.१८/- | रू.१७/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.७/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३/- | रू.६/- | रू.३/- | रू.२/- |

**१४.४ (अ) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२७.५/- | रू.२५/- | रू.२२.५/- | रू.१७.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२२.५/- | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.११.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८.७५/- | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.८.७५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६.२५/- | रू.७.५/- | रू.३.७५/- | रू.२.५/- |

**१४.५ (ब) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| **अ.क्र.** | **प्रकार** | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१३/- | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१२/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.११/- | रू.९/- | रू.८/- | रू.७/- |

**१४.६ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| **अ.क्र.** | **प्रकार** | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६.२५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३.७५/- | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.८.७५/- |

**(क) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| **अ.क्र.** | **प्रकार** | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७/- | रू.१५/- | रू.१४/- | रू.१३/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६/- | रू.१४/- | रू.१३/- | रू.१२/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१३/- | रू.१२/- | रू.११/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |

**१४.८ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२१.२५/- | रू.१८.७५/- | रू.१७.५/- | रू.१६.२५/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.१६.२५/- | रू.१५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८.७५/- | रू.१६.२५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- |
| ४ | सिर्मेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- |

**१४.०९ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२८/- | रू.२६/- | रू.२४/- | रू.२२/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२४/- | रू.२२/- | रू.१९/- | रू.१७/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२०/- | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ४ | सिर्मेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.१०/- |

**१४.१० सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| **अ.क्र.** | **प्रकार** | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.३५/- | रू.३२.५/- | रू.३०/- | रू.२७.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.३०/- | रू.२७.५/- | रू.२३.७५/- | रू.२१.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२५/- | रू.२२.५/- | रू.२०/- | रू.१७.५/- |
| ४ | सिर्मेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१२.५/- |

**१४.११ औद्योगिक क्षेत्रासाठी दर :-**

| **अ.क्र.** | **बांधकामाचा वर्ग** | **सन २०१५-१६ साठी प्रचलीत दर** | **सन २०१६-१७ साठी प्रस्तावित दर** |
|---|---|---|---|
| | | चौ.मी. | चौ.मी. |
| १ | कारखाना कार्यालय (आर.सी.सी.) | १४.६४ | १८.३० |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | १०.३२ | १२.९ |
| | कारखाना कार्यशाळा (आर.सी.सी.) | ११.६२ | १४.५३ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | ९.०४ | ११.३० |
| २ | कारखाना परिसरातील कॅन्टीन | २४.०० | ३० |
| ३ | गोदाम (आर.सी.सी.) | ९.६८ | १२.१ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ९.६८ | १२.१ |
| | अर्ध पक्के | ५.८२ | ७.२८ |
| | कच्चे आणि विना छताचे | ३.२२ | ४.०३ |
| ४ | शेड | २.५८ | ३.२३ |
| ५ | सायकल स्टॅन्ड | ३.८६ | ४.८३ |
| ६ | मशिनरी प्लॅन्ट (आर.सी.सी.) | ११.४० | १४.२५ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ८.८२ | ११.०३ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ७.१० | ८.८८ |
| | कच्चे बांधकाम | ३.१० | ३.८८ |
| ७ | निवासी क्षेत्र (आर.सी.सी.) | १६.१४ | २०.१८ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | १२.९२ | १६.५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | अर्धे पक्के बांधकाम | ११.४० | १४.२५ |
| | कच्चे बांधकाम | ६.४४ | ८.०५ |
| ८ | सहान जागा | | |
| | कारखाना वापर | १२.०४ | १५.०५ |
| | रिकामे | ९.०३ | ११.२९ |

**१४.१२ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.००/- | रू.२.५०/- | रू.२.००/- | रू.२/- |

**१४.१३ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.७५/- | रू.३.१३/- | रू.२.५/- | रू.२.५/- |

**१४.१४ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर / व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१२.५०/- | रू.१०.५०/- | रू.९.००/- | रू.७/- |

**१४.१५ सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर / व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१५.६३/- | रू.१३.१३/- | रू.११.२५/- | रू.८.७५/- |

**टिप :-** मोकळ्या जागेची आकारणी करतांना फक्त सामान्य कर आकारण्यात येईल.

**१५. मालमत्ता कर आकारणी करणेसाठी सन २०१५-२०१६ साठी प्रचलीत दर व सन २०१६-१७ चे प्रस्तावित दर पुढील प्रमाणे**

| अ.क्र. | कराचे नांव | कर योग्य मुल्य रूपये | सन २०१५-१६ साठी प्रचलीत दर | सन २०१६-१७ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १. निवासी वापरासाठी | ३० % | ३० % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | ३७.५% | ३७.५% |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | ४५% | ४५% |
| | | ४. औद्योगिक वापर | ३६% | ३६% |
| | | ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |
| | | ६. विना अनुदानित शै.संस्था | ३७.५% | ३७.५% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | साफसफाई कर | १. निवासी वापरासाठी | ३ % | ३ % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | १० % | १० % |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | १० % | १० % |
| | | ४. औद्योगिक वापरासाठी | १०% | १०% |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १ % | १% |
| ४ | अग्निशमन कर | | १.५% | १.५% |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २% | २ % |
| ६ | पथकर | | २ % | २ % |
| ७ | जललाभ कर | | १.५ % | १.५ % |
| ८ | जलनिःसारण कर | | १.५ % | १.५ % |
| ९ | सेवरेज कर | १. निवासी वापरासाठी | १० % | १० % |
| | | २. निवासेत्तर व व्यावसायीक वापरासाठी | १५ % | १५ % |
| | | ३. औद्योगिक वापरासाठी | ५ % | ५% |
| | | ४. औद्योगिक वसाहतीतील निवासी वापर | १० % | १० % |
| १० | उपभोक्ता कर | निवासी वापरासाठी | १०० प्रती वर्ष | १०० प्रती वर्ष |
| | | निवासेतर / व्यावसायीक वापरासाठी | ५०० प्रती वर्ष---- | ५०० प्रती वर्ष---- |

१६ शासनाचे कर :- तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

करिता, सन २०१६-१७ साठी मालमत्ता कर आकारणी व वसूलीचे दराचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.रेणुकादास वैद्य :२५-३० टक्के लोक टॅक्स भरणारे आहे वाढ करून जे भरणारे त्यांचेवरच बोजा टाकतो आहे. अगोदर पुर्ण शहराचा सर्वे करावा. प्रत्येक मिळकतीला टॅक्स लावावा. थकबाकी आहे. वसुल करावी. पाणी, लाईट, रस्ते सुविधा न देता करवाढ करू नये. मागच्या वर्षीचे जे दर होते. ते लावावे.

श्री.राजू शिंदे :निवासी मिळकती किती आहे?

कर निर्धा. व संकलक :१,९७,८७० निवासी आहे. त्यापैकी १८,२६० मालमत्ता कमर्शियल आहे.

श्री.राजू शिंदे :शाळा, हॉस्पीटल, कंपनी,मंगलकार्यालय व इतर कमर्शियल मालमत्ता वेगवेगळी यादी करून देण्यात यावी. एमएसईबीकडे सर्व मिळकतीची आकडेवारी आहे. घ.नं.सहित मिळेल. घरगुती कनेक्शन २.४० लक्ष, व्यावसायीक २८९००, औद्योगिक ५११०, वाणिज्य ७३०, इतर ४९ हजार १.८० घरगुती कनेक्शन आहे. काही भागात २० घरे असतील, एकच मिटर आहे. अशा सर्व मालमत्तांचा शोध घेतला, तर ३.५० ते ४ लक्ष मालमत्ता असतील. एमएसईबीकडे १.४१ कमर्शियल नोंद आहे. काही मीटर बंद असतील असे ग्राहय धरले. तरी १.१० लक्ष

कमर्शियल मालमत्ता असतील. २०११ नंतर कमर्शियला निवासी टॅक्स लागला आहे. सन-२०११ मध्ये रिॲसेसमेंन्टची मंजूरी दिली. अद्याप अंमलबजावणी केली नाही. इमारतीत बदल झाला, तरी पुर्वीचाच टॅक्स आकारतो. स्पेकचा सर्वेचा विचार करू नये. नव्याने सर्वे करावा. सर्व मालमत्ताचे ॲसीसमेन्ट करावे. एनआव्ही निश्चित करण्यासाठी ज्यांना माहिती आहे त्यांचीच नियुक्ती करावी ज्या इमारतीला टॅक्स टॅक्स लागला नाही तेथे आकारणी करावी प्रत्येक मिळकतीला टॅक्स असावा तो वसुल करावा वसुलीसाठी कर्मचारी पुरेसा आहे नियोजन करावे.

कर निर्धा. व संकलक :प्रत्येक मुद्दा बरोबर आहे. सर्वे केला. ४० टक्के मालमत्तांना कर लागलेला नाही. बऱ्याच वर्षापासून रि-ॲसेसमेंन्ट नाही. मोठया इमारती झाल्या. ४-४ मजली इमारती झाल्या. जुनाच टॅक्स आहे. नियोजन करणे चालू आहे.

श्री.राजू शिंदे :सिडको हडको, औद्योगिक, म्हाडा असेल एनओसी असल्याशिवाय कोणती मिळकत ट्रान्सफर होऊ नये. तसे त्या विभागासही कळवावे. एमएसईबीनेही मनपाची एनओसी घेतल्या शिवाय मीटर देऊ नये. तसे एमएसईबीला कळवावे.

मा.महापौर :सन २०१५-१६ या आर्थीक वर्षाचेच प्रचलित दराने सन २०१६-१७ या वर्षासाठी कर आकारणी करण्यात यावे.

श्री.भगवान घडमोडे :कर प्रणालीत दुरूस्ती केल्याशिवाय उत्पन्न वाढणार नाही.

श्री.जहागीर खान :नवीन घरांना टॅक्स लावावा.

मा.महापौर :४०-५० टक्के घरांना टॅक्सच लागला नाही सर्वे करून सर्व मिळकतींना टॅक्स लावावा या संबंधीत चार दिवसात बैठक होईल.

श्री मनोज गांगवे :माझ्या वार्डात किराणा दुकान आहे. तेथे गुलमंडीचे रेट प्रमाणे कर आकारला आहे.

मा.महापौर :वर्गवारी ठरवून त्यानुसार कर आकारावा. दोन भागाचा एकच टॅक्स असू नये. या बाबत नियोजन करावे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :१०० टक्के मिळकतीना टॅक्स लावला तर आता दर वाढ करण्याची गरज नाही.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावानुसार सन २०१५-१६ या आर्थीक वर्षाचेच प्रचलित दराने सन २०१६-१७ या वर्षासाठी कर आकारणी करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३७७:-** **(शहर अभियंता)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे बाबत.

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशातील सर्व शहरे हागंदारी मुक्त करुन शहरातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान (नागरी) दिनांक ०२ ऑक्टोबर-२०१४ पासुन राबविण्यास सुरुवात केली आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी सुरु केली आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामध्ये अंतर्गत जे नागरिक उघडयावर शौचास जाण्याची पध्दत वापरतात व ज्या नागरिकांकडे

वैयक्तिक शौचालय नाही फक्त अशाच नागरीकांना सदर योजनेतुन वैयक्तिक शौचालय नाही फक्त अशाच नागरीकांना सदर योजनेतुन वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामासाठी शासनामार्फत रक्कम रुपये १२०००/- प्रति शौचालय एवढे अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर अनुदानामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा रक्कम रु.४०००/- व राज्य शासनाचा हिस्सा रक्कम रु.८०००/- इतका आहे. या संदर्भाने सदरील अभियाना अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे कार्यवाही करण्यात येत असून आतापर्यंत झालेल्या कामाचा प्रगती अहवाल खालील प्रमाणे आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अनुदानास पात्र लाभार्थ्यांची निवड करण्याची कार्यवाही सुरु असुन आजपर्यंत ६५१ लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यापैकी सुमारे ४४५ लाभार्थ्यास अनुदाना पहिला हप्ता रक्कम रु.६०००/- प्रति लाभार्थी इतका यांच्या बँकेच्या खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करण्यात आलेला आहे. उर्वरीत २०६ पात्र लाभार्थी यांना पहिल्या हफ्त्याची रक्कम RTGS करणेची कार्यवाही सुरु आहे. आतापर्यंत लाभार्थ्यास पहिल्या हफ्त्याच्या अनुदान पोटी एकुण रक्कम रु.२६,७०,०००/- इतकी वितरीत करण्यात आलेली आहे. तसेच प्राप्त अर्जाचे सर्वेक्षण करण्यासाठी विशेष मोहिम (Special - Drive) राबविण्यात येत असुन त्याकरीता महानगरपालिकेतील ६१ तांत्रिक कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्यामार्फत पात्र लाभार्थ्यांची निवड करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच शहरातील ज्या भागात उघडयावर शौचास जाण्याचे (Open defection) प्रमाण जास्त आढळून आले आहे. त्या भागात सर्व्हेक्षण करुन चार स्थळे अनुक्रमे १) आंबेडकरनगर, २) मिसरवाडी ३) हर्षनगर फाजलपुरा, ४) शताब्दीनगर भागात सार्वजनिक वापरासाठी शौचालय बांधणेची निविदा काढण्यात आली आहे. प्रक्रिये अंतर्गत कार्यवाही अंतिम करुन, कार्यादेश झाल्यानंतर कामे हाती घेण्यात येतील. करीता अहवाल मा.सर्वसाधारण सभे समोर माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

मा.महापौर :मंजूर

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीसाठी महानगरपालिकेमार्फत वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी जे की, शहरातील ज्या भागात उघडयावर शौचास जाण्याचे (Open defection) प्रमाण जास्त आढळून आले त्या भागात सर्व्हेक्षण करुन चार स्थळे अनुक्रमे १) आंबेडकरनगर, २) मिसरवाडी ३) हर्षनगर फाजलपुरा, ४) शताब्दीनगर भागात सार्वजनिक वापरासाठी शौचालय बांधणेची निविदा काढण्यात आली आहे. प्रक्रिये अंतर्गत कार्यवाही अंतिम करुन, कार्यादेश झाल्यानंतर कामे हाती घेण्यात येतील याबाबतच्या दिलेल्या अहवालास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३७८:-</u>** **<u>(शहर अभियंता)</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरामधील मुख्य रस्त्यांवरील दुभाजके व वाहतुक बेटे नियमित देखभाल दुरूस्तीसह विकसित होणेसाठी शहरातील उद्योजक, बँकेचे प्रतिनिधी, बिल्डर्स असोसिएशन, संस्था यांची प्रायोजक म्हणुन नेमणूक करणेस तसेच दुभाजके व वाहतुक बेटांची त्यामधील विविध संकल्पनेवर आधरित म्युरल्स, पुतळे यांची तसेच हिरवळींची नियमित देखभाल व संवर्धन करणेस व सदरील कामाकरीता प्रायोजकाची नेमणूक ही अटी/शर्तीसह प्रथम पाच वर्षाकरीता काम देण्यात येऊन व कामाची प्रगती पाहून पुढील पाच वर्षाचे नुतनीकरण करण्याचे अधिकार

महानगरपालिकेकडे ठेवण्यास दिनांक २०.०६.२०१२ रोजी आयोजित मा.सर्वसाधारण सभेने विषय क्रमांक ७९७ अन्वये ठराव पारित केला आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिकेकडे, महानगरपालिकेच्या ताब्यातील क्रांतीचौक येथील झांशीची राणी उद्यानाचा विकास व देखभाल करणेचा प्रस्ताव विकासकाकडून प्राप्त झाला आहे. तसेच महानगरपालिकेने मंजुर केलेल्या रेखांकनातील विकास नियंत्रण नियमावलीनुसार महानगरपालिकेस हस्तांतरित खुली जागा विकसित करणे करीता प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

उक्त दोन्ही बाबी दिनांक २०.०६.२०१२ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने विषय क्रमांक-७९७ अन्वये पारित केलेल्या ठरावामध्ये अंतर्भुत नाहीत. करीता प्रस्तावीत करण्यात येते की, शहरामधील महानगरपालिकेच्या तब्यामधील व भागश: विकसित/देखभाल दुरूस्ती आवश्यक असलेले उद्याने तसेच महानगरपालिकेस मंजुर रेखांकनातील हस्तांतरीत खुल्या जागा विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकसीत करणेकरीता प्रायोजकास देणे बाबत प्रस्ताव पुर्वीच्या पारीत ठरावातील अटी/शर्तीस अधिन राहून खालील अतिरिक्त अटीसह विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

१. उद्यान व रेखांकनातील खुली जागेचा विकास हा मंजुर विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदी व विकास योजनेत नमुद वापरानुसारच करण्यात यावा.
२. सदर ठिकाणी प्रायोजकास कोणतेही शुल्क महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय आकारता येणार नाही.
३. उद्यानाकरीता महानगरपालिकेचे नागरीकांसाठी असलेले प्रचलित धोरण कायम राहील.
४. रेखांकनातील खुल्या जागेबाबत तसेच उद्यानाबाबत विकासक कोणताही मालकी हक्क मागणार नाही तसेच ती जागा सार्वजनिक खुली जागा म्हणुन कायम स्वरुपी राहील.
५. रेखांकनाच्या खुल्या जागेत विकासकामा व्यतिरिक्त महानगरपालिकेस कोणतेही नियोजन करण्याचा तसेच विकसित केलेल्या कामामध्ये बदल करण्याचा अधिकार कायमस्वरुपी राहील.
६. आवश्यकता भासल्यास रेखांकनातील खुली जागा तसेच उद्यान विकसित करणेचा करार कोणतेही कारणे न देता रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील. महानगरपालिकेने करार रद्द करणे विषयी घेतलेल्या निर्णयाबाबत प्रायोजकाचा कोणताही आक्षेप राहणार नाही.
७. उद्यान व रेखांकनातील खुल्या जागांवर प्रायोजकास त्याचे नावाशिवाय इतर कोणत्याही प्रकारची जाहिरात, जाहिरीतीचे फलक, झेंडे, बॅनर तसेच कोणत्याही प्रकारचे कार्यक्रम त्या ठिकाणी करता येणार नाही.

तरी उक्त प्रमाणे महानगरपालिकेच्या ताब्यातील उद्यानांचा विकास व देखभाल करणे आणि महानगरपालिकेने मंजुर केलेल्या रेखांकनातील विकास नियंत्रण नियमावलीनुसार महानगरपालिकेस हस्तांतरीत खुली जागा विकसित करणे करीता उद्योजक, बँकेचे प्रतिनिधी, बिल्डर्स असोसिएशन, संस्था यांची प्रायोजक म्हणुन नेमणूक करणेस पुर्वीच्या ठरावातील अटी/शर्तीसह वरील अटींवर मान्यता होणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

श्री.रेणुकादास वैद्य :हा विषय बाजूला ठेवून या जागेचे ऐतिहासीक महत्व आहे. उर्वरीत खुल्या जागा आहे. या जागा वापरण्यास द्याव्यात, अर्ज आले, आपण पैसे घेत नाही ते वापरत आहे.

मा.महापौर :असे विषय येतांना स.पदाधिकारी स.सदस्य असेल यांचे पर्यंत माहिती यायला पाहिजे. तेथील जनतेला विश्वासात घेणे आवश्यक आहे. कशा प्रकारे विकास करणार आहे क्रांती चौकचा वेगळा इतिहास आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :स्वातंत्र्य सैनिक तेथे जयंती व पुण्यतिथी निमित्ताने तेथे येतात. त्या ऐतिहासिक जागेचे कायम महत्व सांगत असते. हा विषय रद्द करून बाकीच्या ओपनस्पेस विकासासाठी द्याव्यात. रितसर प्रस्ताव यावा.

श्री.भगवान घडमोडे :सर्व सदस्य स.पदाधिकारी यांना विश्वासात घेऊन असे विषय यावे.

मा.महापौर :इतर अशा किती जागा आहे. त्याची सविस्तर माहिती घ्यावी. पुढील सभेत सविस्तर प्रस्ताव यावेत. हा विषय स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत इतर अशा किती जागा आहेत. त्याची सविस्तर माहिती घ्यावी पुढील सभेत सविस्तर प्रस्ताव यावेत. हा विषय तुर्त स्थगित ठेवण्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्रमांक ३७९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्रजनन व बाल आरोग्य सेवा टप्पा-२ राबविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा दिनांक ११.०१.२००७ विषय क्रं.६५५/४ नुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. सदरील कार्यक्रम २००७ ते २०१२ या कालावधीकरिता होता. प्रकल्पाचा कालावधी संपल्यानंतर मनपातर्फे प्रकल्पाचा भार सोसण्यास व कार्यक्रम नियमित स्वरुपात राबविण्यास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार मंजूरी देण्यात आलेली आहे. मा. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचे पत्र जा.क्रं.राकुकका/अर्बनआरसीएच/कक्ष-१७/२०१७२-४४/०७, दिनांक २६.०३.२००७ प्रकल्प राबविण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे.

वाढती लोकसंख्या, मातामृत्यू व बालमृत्यु एकूण प्रजनन दर कमी करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. याचप्रमाणे गरोदर माता, बालके, किशोरवयीन मुले व मुली यांच्याकरिता विविध आरोग्य सेवा सुविधा देण्यासाठी निरनिराळे आरोग्य विषयक कार्यक्रम राबविले जातात. मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०.११.२०१५ ठराव क्रमांक २२१ अन्वये आरसीएच-२ अंतर्गत कार्यरत एकूण वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक १७.०७.२०१५ ते ३१.०१.२०१६ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरील मुदतवाढ दिनांक ३१.०१.२०१६ रोजी संपुष्टात आलेली आहे. खालील सर्व पदे नियमित स्वरुपात न ठेवल्यास आरोग्य सेवा विस्कळीत होईल. यामुळे सर्व पदांची आवश्यकता आहे. सध्या कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या ठराविक वेतनाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | नांव | पदनाम | ठराविक वेतन |
|---|---|---|---|
| १. | डॉ.वैशाली मुदगडकर | महिला वैद्यकीय अधिकारी | रु.१८०००/- |
| २. | डॉ.ऋता आनंदगांवकर | महिला वैद्यकीय अधिकारी | रु.१८०००/- |
| ३. | श्रीमती जया उघडे | स्टाफ नर्स | रु.९०००/- |
| ४. | श्रीमती सुनिता नरवडे | स्टाफ नर्स | रु.९०००/- |
| ५. | श्रीमती विद्या शर्मा | स्टाफ नर्स | रु.९०००/- |
| ६. | श्रीमती ज्योती बनकर | स्टाफ नर्स | रु.९०००/- |
| ७. | श्रीमती मेरी पाखरे | स्टाफ नर्स | रु.९०००/- |
| ८. | श्रीमती ज्योती चव्हाण | एएनएम | रु.७५००/- |
| ९. | श्रीमती द्रौपदी डक | एएनएम | रु.७५००/- |
| १०. | श्रीमती लक्ष्मी पाटील | एएनएम | रु.७५००/- |
| ११. | श्रीमती मिनाक्षी डोंगरे | एएनएम | रु.७५००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | श्रीमती रेखा नायमाने | एएनएम | रु.७५००/- |
| १३. | श्रीमती शिला राठोड | एएनएम | रु.७५००/- |
| १४. | श्रीमती सोनाली भिसे | एएनएम | रु.७५००/- |
| १५. | श्रीमती वर्षा जाधव | एएनएम | रु.७५००/- |
| १६. | श्रीमती वर्षा महादू सोनवणे | एएनएम | रु.७५००/- |
| १७. | श्रीमती सुनंदा चव्हाण | एएनएम | रु.७५००/- |
| १८. | श्रीमती सारिका इंगळे | एएनएम | रु.७५००/- |
| १९. | श्रीमती कविता चव्हाण | एएनएम | रु.७५००/- |
| २०. | श्रीमती वैशाली बि-हारे | एएनएम | रु.७५००/- |
| २१. | श्रीमती स्वाती भागवत जिरीमाळी | एएनएम | रु.७५००/- |
| २२. | श्रीमती सिमा अरुण गुरव | एएनएम | रु.७५००/- |
| २३. | श्रीमती समिनाबेगम शेख सलीम | एएनएम | रु.७५००/- |
| २४. | श्रीमती वर्षा हरिभाऊ फुले | एएनएम | रु.७५००/- |
| २५. | श्रीमती आरती एकनाथ वाघमारे | एएनएम | रु.७५००/- |
| २६. | श्रीमती अश्विनी रमेशराव परळकर | एएनएम | रु.७५००/- |
| २७. | श्रीमती प्रियंका मगरे | एएनएम | रु.७५००/- |
| २८. | श्रीमती ए.जे.मकासरे | एएनएम | रु.७५००/- |

सध्या कार्यरत २८ अधिकारी व कर्मचारी यांना वेतनाकरीता रु.२३८५००/- व वार्षिक रु.२८,६२,०००/- खर्च अपेक्षित आहे. सदरील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च मनपा अर्थसंकल्प माता व बाल संगोपन (आरसीएच) या घटकामध्ये करण्यात आलेली आहे. आरसीएच-२ अंतर्गत सध्या कार्यरत २ अधिकारी व २६ कर्मचारी यांना प्रस्तावित केल्यानुसार २ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन म्हणजे दिनाक ०३.०२.२०१६ ते ३१.०७.२०१६ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास व वेतनावरील खर्च मनपा फंडातून देण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव व मंजुरीस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल :आशा सुपरवायझर यांना कमी पगार आहे त्यांनाही या कर्मचा-या प्रमाणेच वेतन दयावे तसा प्रस्ताव मी सादर केलेला आहे.कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरसीएच-२ प्रकल्पा अंतर्गत सध्या कार्यरत असलेले २ अधिकारी व २६ कर्मचारी यांना २ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन म्हणजे दिनांक ०३.०२.२०१६ ते ३१.०७.२०१६ या कालावधीकरीता नियमाप्रमाणे मुदतवाढ देण्यास तसेच त्यांच्या वेतनावरील खर्च महानगरपालिकेच्या फंडातून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३८०:-** **(आरोग्य विभाग)**

मा.मुख्यमंत्री यांचे सचिवालय/वैद्यकीय सहाय्यता कक्ष/१०/जा.क्र.८२/२०१५ दिनांक ०३ डिसेंबर-२०१५ रोजीचे पत्रानुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री सुधाकर ओंकार पवार, शाखा अभियंता, वॉर्ड ‘ फ’ महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वत:च्या Decompensated Chronic Liver Disease with Grade I Oesophageal Varices with Partal HT (Liver Transplant) या आजारावर शासन मान्य नसलेल्या Asian Institute of Gastroenterology, Hydrabad. येथे

उपचार करण्यात आले असुन त्या उपचारावर एकुण रक्कम रु.२५,५१,१०१/- इतक्या वैद्यकीय खर्च परताव्याची मागणी केली आहे.

संबंधीताने उपचार Asian Institute of Gastroenterology, Hydrabad. हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.२०११/प्र.क्र.३३३/११/राकावि-२/मंत्रालय-३२ दिनांक १६.११.२०११ व शासन परिपत्रक क्र.पैखप्र-२०१३/प्र.क्र.२९१/१३/राकावि-२ दिनांक ११.१०.२०१३ व Government of Andhara Pradesh Health and Family Welfare (K1) Department G.O.Ms.No.54 Dated the 2nd March 2006 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालया प्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयाच्या अद्यावत यादीत सदरच्या रुग्णालयाचे नांव समाविष्ट आहे.

तथापी, मा.आरोग्य कक्ष प्रमुख, मा.मुख्यमंत्री वैद्यकीय सेवा कक्ष, सचिवालय, मुंबई यांचा जा.क्र.८२/२०१५ च्या पत्राअन्वये श्री सुधाकर ओंकार पवार, शाखा अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांचा वैद्यकीय परतावा मा.मुख्यमंत्री महोदयांचे अभिप्राय “विशेष बाबत म्हणून मान्यता द्यावी” असे पत्रात नमुद करुन वैद्यकीय खर्चाची देयके योग्य त्या कार्यवाही करणेस्तव आदेशित केले आहे.

त्यानुसार **नियमाप्रमाणे सर्व बाबींची पुर्तता करुन प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.सुधाकर ओंकार पवार, शाखा अभियंता, वॉर्ड ‘ फ ’** यांनी त्यांच्या स्वतःच्या Decompensated Chronic Liver Disease with Grade I Oesophageal Varices with Portal Hypertension (Liver Transplant) उपचार करण्यात आले असून शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३, दिनांक १९ मार्च, २००५ नुसार खालील तक्त्यात रक्कम नमुद करण्यात येते.

**एकूण खर्च रूपये २५,५१,१०१/-**

(अ) औषोधोपचारावरील खर्च रक्कम रूपये २३,८९,९१८/-
औषोधोपचारावरील प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के रक्कम रूपये २१,५०,९२६/- इतकी होते.
(ब) वातानुकूलित कक्ष खर्च रक्कम रूपये १,२९,४७७/-
वातानुकूलित कक्षाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या ७५ टक्के रक्कम रूपये ९७,१०८/- इतकी होते.
(क) अतिदक्षता कक्ष खर्च रक्कम रूपये ३१,७०६/-
अतिदक्षता कक्षाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या १०० टक्के रक्कम रूपये ३१,७०६/- इतकी होते.
शिल्लक (१,२, व ३) रक्कम रूपये २२,७९,७४०/-
एकूण खर्चाच्या ५ टक्के रक्कम **रूपये १,२७,५५५/-** मनपा फंडात जमा करणे योग्य राहील.

**शिल्लक रक्कम रूपये २२,७९,७४०/-**
**(-) वजा मनपा फंडात ५ टक्के जमा रक्कम रू १,२७,५५५/-**
**(एकूण खर्चाच्या रक्कमेपैकी)**
**एकूण निव्वळ देय रक्कम रूपये २१,५२,१८५/-**

संबंधिताने कार्यालयाकडून सदरील गंभीर आजारावर उपचार करण्याकरिता रक्कम रूपये १०,००,०००/- अग्रीम घेतलेले आहे.

**एकूण निव्वळ देयक रक्कम : रूपये २१,५२,१८५/-**
**(-) अग्रीम रक्कम : रूपये १०,००,०००/-**
**एकूण शिल्लक रक्कम : रूपये ११,५२,१८५/-**
**एकूण समायोजन करणे करिता रक्कम रूपये : २१,५२,१८५/-**

करिता, संबंधितास **रुपये २१,५२,१८५**/- वैद्यकीय देयकातून अग्रीम रक्कम **रुपये १०,००,०००**/- वजा जाता शिल्लक **रक्कम ११,५२,१८५**/- एवढी रक्कम वैद्यकीय परताव्याचे मंजुरीसह **समायोजन** करणे आहे.

वरील शासन निर्णयमधील परिच्छेद १ अन्वये प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकारांबाबत महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधीन राहून रुपये १,००,०००/- (एक लाख रुपये) पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजुरीचे अधिकारी संबंधित विभागाच्या **विभाग प्रमुखांना** (जिल्हा /नगर परिषदेत, महानगरपालिकेत/नगरपालिकेत आरोग्य अधिकारी यांना) प्रदान करण्यात आले तसेच रुपये १,००,०००/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस मंजुरीचे अधिकार **आयुक्त** यांना असुन रुपये २,००,०००/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस **मा. स्थायी समितीची** मंजुरी घेणे आवश्यक असुन सदरील प्रकरणात **"विशेष बाब म्हणून"** मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

करिता, संबंधितास वैद्यकीय देयक परतावा एकूण रक्कम **रु. २१,५२,१८५/- मधून अग्रीम रक्कम रुपये १०,००,०००/- वजा जाता शिल्लक रक्कम रुपये ११,५२,१८५/-(अकरा लक्ष बावन्न हजार एकशे पंच्याऐंशी रुपये फक्त)** एवढी रक्कम श्री.सुधाकर ओंकार पवार, शाखा अभियंता, यांना अदा करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल :विशेष बाब म्हणुन मंजूरी दयावी.
मा.महापौर :यात मा.मुख्यमंत्री महोदय यांनी विशेष बाब म्हणून मान्यता दयावी असा अभिप्राय दिलेला आहे त्यानुसार विशेष बाब म्हणून मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री सुधाकर ओंकार पवार, शाखा अभियंता, वॉर्ड 'फ' महानगरपालिका औरंगाबाद यांना त्यांच्या स्वतःच्या Decompensated Chronic Liver Disease with Grade I Oesophageal Varices with Partal HT (Liver Transplant) या आजारावर करण्यात आलेल्या वैद्यकीय खर्च देयक परतावा एकुण रक्कम रु.२१,५२,१८५/- मधून अग्रीम रक्कम रुपये १०,००,०००/- वजा जाता शिल्लक रक्कम रुपये ११,५२,१८५/- (अकरा लक्ष बावन्न हजार एकशे पंच्याऐंशी रुपये फक्त) एवढी रक्कम अदा करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३८१:- (सर्वसाधारण सभा दिनांक २०.०२.२०१६ का.प.क्र.१४ मधील स्थगित विषय क्रमांक ३१३)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बीड बायपास रोडवरील समृध्दी पार्क सेल्फ डेव्हलपमेंट मध्ये करण्यात आलेले आहे. तरी सदरील समृध्दी पार्क सोसायटी मधील नागरीकांना नागरी सुविधा वेळेवर उपलब्ध व्हाव्यात यासाठी या सोसायटींचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करणे जरुरी आहे. या परिसरातील रहिवाशी नागरीकांनी या सोसायटीचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करून घेणे बाबत विनंती केलेली आहे.

सेल्फ डेव्हलपमेंट मधील सोसायटींना यापुर्वी महानगरपालिकेतर्फे सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे समृध्दी पार्क या सोसायटीचे योग्य ती कार्यालयीन कार्यवाही करून महानगरपालिकेकडे तात्काळ हस्तांतरीत करून घेण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे **अनुमोदक:-**श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले

श्रीमती स्मीता घोगरे :१० वर्षापासून ही सोसायटी विकसीत केली आहे तेथील नागरीक कर वेळेवर भरतात सुविधा मिळत नाही.महापालिकेकडे ही सोसायटी हस्तांतर करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :तेथील नागरीकांना सुविधा मिळत नाही बिल्डरवर कार्यवाही करावी.त्या बिल्डरला बेटरमेंन्ट मध्ये सवलत दिली असेल.ते बेटरमेंन्ट नागरीकाकडून भरून घ्यावे व सुविधा देता येत असेल तर असा मार्ग काढावा.बिल्डरवर गुन्हा दाखल करावा.

श्री.अफसर खान :बिल्डरने विकसीत केले त्यांनी सुविधा दयायला पाहिजे.

मा.आयुक्त :सोसायटीमध्ये इन्टरनल रोड असेल तर ते करता येत नाही.परवानगी कशी दिली ते पहावे लागेल संबधीत बिल्डरवर कार्यवाही होईल.

श्री.भगवान घडमोडे :बिल्डर परवानगी घेतात सुविधा देत नाही नागरीकांना त्रास होतो नागरीक आमच्याकडे येतात. परवानगी कशी आहे.सवलत घेतली असेल तर बिल्डरवर कार्यवाही करावी

श्रीमती माधुरी देशमुख :अशा बिल्डरांची यादी तयार करावी ब्लॅकलिस्ट करावे त्यांना पुन्हा परवानगी देऊ नये.

मा.आयुक्त :परवानगी देतांना अटी शर्ती काय होत्या पहावे लागेल.बेसीक सुविधा नागरीकांना दिल्या पाहिजे बिल्डरची जबाबदारी आहे. त्या दिल्या नसेल तर कार्यवाही होईल.त्याच बिल्डरचे इतरत्र कुठे बांधकाम चालू असेल तर थांबविता येईल.

मा.महापौर :बिल्डर तेथे सुविधा का देत नाही बेटरमेंन्ट चार्जेसमध्ये सुट दिली आहे का? परवानगी कोणत्या अटी शर्ती प्रमाणे दिली प्रशासनाने सर्व माहिती घेऊन कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत संबंधीत बिल्डर तेथे सुविधा का देत नाही बेटरमेंन्ट चार्जेसमध्ये सुट दिली आहे काय? परवानगी कोणत्या अटी शर्ती प्रमाणे दिली प्रशासनाने सर्व माहिती घेऊन कार्यवाही करावी. प्रस्ताव तुर्त स्थगित करण्यात येतो.

**विषय क्रमांक ३८२:- (सर्वसाधारण सभा दिनांक १५.०३.२०१६ का.प.क्र.१५ मधील स्थगित विषय क्रमांक ३६२)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७१ येथील उस्मानपुरा येथे पोलिस चौकी समोरील सभागृह अनेक वर्षापासून बंद आहे. तसेच महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाने दिनांक ०५.०७.२०१५ रोजी सभागृह भाडेतत्वावर देणे आहे. अशी जाहिरात वर्तमान पत्रात दिलेली आहे.

त्यानुसार सदरील सभागृहासाठी पटेल एज्युकेशन वेलफेअर सोसायटी यांनी अर्ज केलेले आहे. त्यानुसार व मनपाच्या अटी व शर्तीनुसार एकच अर्ज आलेले आहे. त्यामुळे पटेल एज्युकेशन वेलफेअर सोसायटी सदरील सभागृह भाडेतत्वावर देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरी देऊन संबंधीताला तात्काळ सभागृह भाडेतत्वावर देणेची कार्यवाही मालमत्ता विभागाने तात्काळ करावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सरीता अरुण बोर्डे **अनुमोदक:-** श्री.विकास प्रकाश एडके

श्री.गजानन बारवाल :जेवढे हॉल व जागा असतील त्या भाडे तत्वावर देण्यासाठी जाहीर प्रगटन देऊन कार्यवाहीचा निर्णय घेतला त्याचाही विचार व्हावा.

श्री.रेणुकादास वैद्य :एखादा असा प्रस्ताव येऊन निर्णय घेता येणार नाही मालमत्ता विभागाकडे असे हजारो प्रस्ताव आले. पॉलीसी ठरवली. सर्वसाधारण सभेने मंजूरी दिली. स्थायी समितीनेही मंजूरी दिली की, लाईट बील व मेंन्टनन्स त्यांनी करावे. हजार रूपये घ्यावे. १२ हजार डिपॉजीट ठेवावे असा प्रस्ताव केला. या बाबत सर्व पदाधिकारी मा.आयुक्त यांनी एकत्रित बसून योग्य निर्णय घ्यावा.

श्री.दिलीप थोरात :या बाबत जाहिरातीच्या माध्यमातून प्रस्ताव मागवायचे असे ठरले होते. एकही प्रस्ताव स्थायी समितीकडे आलेला नाही. अनेक लोक चकरा मारतात पैसे भरण्यास तयार आहे. कार्यवाही होत नाही. वारंवार सुचना केल्या होत्या. ज्या सामाजिक संस्था व त्या भागातील नागरीक ज्यांना आवश्यकता आहे, अशी जाहिरात मागविली होती. त्याना देणे आवश्यक आहे. तातडीने कार्यवाही होणे आवश्यक आहे.

श्री.भगवान घडमोडे :अनेक सामाजिक सभागृह आहेत. तेथे पत्ते खेळतात, खिडक्या काढल्या गेल्या. जनावरे बसतात. यात लक्ष देऊन उत्पन्न वाढवावे. हजारो रूपये खर्च केले. रेडीरेकनर रेट प्रमाणे कुणीही घेणार नाही. अनेक वास्तू  पडून आहे. जे सोशल ॲक्टीव्हिटीज करणारे नागरीक किंवा संस्था असेल त्यांना दिले पाहिजे. ठोस निर्णय घेऊन निर्णय घ्यावा.

मा.महापौर :महापालिकेचे अनेक हॉल, दुकाने आहे. स्थायी समितीने निर्णय घेतला. या सभेतही निर्णय घेतला की, उत्पन्न वाढले पाहिजे. पुन्हा पुन्हा तोच विषय समोर येतो. रेडीरेकणरचे रेट येण्याची मागणी होते. कुणीही पुढे येत नाही. जास्तीत जास्त भाडे मिळावे अशी अपेक्षा असते. काही चांगल्या वसाहतीत हॉल दुकाने असतील तेथील रेट जास्त येऊ शकतात. परंतु जेथे स्लम भाग झोपडपट्टी आहे. तेथे मा.आमदार,मा.खासदार निधीतून हॉल सामाजिक सभागृह महापालिकेने बनविलेले. त्या त्या भागातील नागरीकांनी मागणी केली.  ११००, १२०० रू प्रमाणे भाडयाने देता येईल का? असा विचार करावा असा निर्णय झालेला होता. नियमानुसार जे दर आहे. त्याप्रमाणे कुणी घेण्यास तयार नाही जालना रोड, रेल्वेस्टेशन, सिटीप्राईड मध्ये हॉल आहे. यातून लाखो रूपये उत्पन्न मिळू शकते. निर्णय घेतांना विशेष बाब म्हणून निर्णय घ्यावा लागेल. सुभेदारी विश्राम गृहाकडे जातांना नाल्यावरील शॉप हे स्लम मध्ये आहे त्यास खिडक्या शटर नाही, वार्ड-फ कार्यालय, मुथीयार कॉर्नरच्या दुकाने रिकाम्या आहेत. हे सर्व कमीत कमी भाड्याने दिल्यास नागरीक येतील व महापालिकेस उत्पन्न मिळेल व इमारतीचे नुकसान होणेही थांबेल. तेथील ज्या नागरीकांनी मागणी आहे. त्या नागरीकांना कमी दरामध्ये जे की, स्थायी समितीनेही निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार  त्या वसाहतीमधील नागरीक असेल त्यांना प्रथम प्राधान्य देऊन कार्यवाही करावी. एकनाथनगर येथील हॉलची मागणी होती. अशा वास्तुत अवैध धंदे चालत असेल तर कमीत कमी भाडे आले तरी चालेल. जास्त रेट येण्याच्या मागे न लागता, ज्या संस्थांची तेथील नागरीकांची मागणी असेल त्यांना कमीत कमी दराने उपलब्ध करून देण्यास हरकत नाही. या विषयाबाबतही तसा विचार करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावानुसारच शहरात महानगरपालिकेचे अनेक हॉल, दुकाने असुन सर्वसाधारण सभेने, स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे महापालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे ही सर्वांचीच भावना आहे. ज्या ज्या भागातील तेथील नागरीक, सामाजिक संस्था यांनी मागणी केली असेल अशांना कमी दरामध्ये प्रथम प्राधान्य देऊन कमीत कमी दराने उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाने योग्य ती नियमानुसार कार्यवाही करावी,

**विषय क्रमांक ३८३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील आर्ट ऑफ लिव्हींग यांचे तर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्ताने दिनांक १३ एप्रिल-२०१६ रोजी सांयकाळी ०६.०० वाजता संत तुकाराम नाटयगृहात सत्संग आयोजित करण्यात आलेला आहे.

संत्संग हा एक सामाजिक उपक्रम असल्याने सर्व समाजातील व सर्व स्तरातील लोक या कार्यक्रमानिमित्ताने एकत्र येणार असुन या सत्संग समारंभात सर्वधर्म समभाव, वसुधैव कुटूंबकम हा संदेश देण्यात येणार आहे. या कार्यक्रमामधुन कोणत्याही प्रकारचे उत्पन्न अपेक्षित नसुन निव्वळ सर्व समाजातील लोकांसाठी हा कार्यक्रम असल्याने संत तुकाराम महाराज नाटयगृहाच्या भाडे शुल्कात ५०% सवलत देण्यात यावी अशी संबंधीतांची मागणी आहे तरी आपण सवलत देण्यासाठी योग्य ते आदेश संबंधित विभागास द्यावेत, ही विनंती.

**सुचक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड **अनुमोदक:-** श्री.दिलीप गंगाधर थोरात

श्री.गंगाधर ढगे :या संस्थेने कार्यक्रम आयोजित केला स्वागत करतो. उत्पन्न मिळत नाही खाजगीकरण करण्याची वेळ आली. असे असतांना कुठल्याही संस्थेला ५० टक्के भाडेमध्ये सवलत देत असेल तर योग्य नाही.नुकसान होणार आहे ही संस्था भाडे भरण्या इतपत सक्षम आहे.जे भाडे आहे पुर्ण वसुल करावे.

श्री.अब्दुल नाईकवाडी : इतर संस्था कार्यक्रम घेतील त्यांनाही सवलत देणार काय ?

श्री.भगवान घडमोडे :यावर चर्चा न होता ठराव मंजूर करावा.

श्रीमती समीना शेख :ही संस्था सक्षम आहे ५० टक्के सवलत कशासाठी देत आहात.

मा.महापौर :डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती होती महापालिकेच्या वतीने चांगला कार्यक्रम आयोजित केला होता ८-१० दिवस कार्यक्रम चालू होते.यामूळे महापालिकेची प्रतिमा चांगली झाली.अधिकारी यांनी ही मेहनत घेतली चांगला भिमउत्सव साजरा केला हा विषय मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील आर्ट ऑफ लिव्हींग यांचे तर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्ताने दिनांक १३ एप्रिल-२०१६ रोजी सांयकाळी ०६.०० वाजता संत तुकाराम नाटयगृहात सत्संग आयोजित कार्यक्रमामधुन कोणत्याही प्रकारचे उत्पन्न अपेक्षित नसुन निव्वळ सर्व समाजातील लोकांसाठी हा कार्यक्रम केलेला असल्याने संत तुकाराम महाराज नाटयगृहाच्या भाडे शुल्कात ५०% सवलत देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३८४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या विविध कामाच्या बाबतीत किंवा अधिकाऱ्यांच्या बाबतीत सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा होऊन संबंधीत अधिकाऱ्यांवर चौकशी करण्याचे आश्वासन दिले गेले. परंतु या चौकशीचा अहवाल कधीच सर्वसाधारण सभेपुढे मांडला गेला नाही.

त्यामुळे, सर्वसाधारण सदस्यांना चौकशी बाबत अथवा कारवाई बाबत माहिती मिळत नाही. सर्वसाधारण सभेमध्ये सदरील चौकशीचा अहवाल सादर केल्यास त्याबाबत पारदर्शकता निर्माण होईल. एप्रिल-२०१५ पासून सर्वसाधारण सभेने ज्या चौकशीचे आदेश दिले आहे त्या चौकशीचे अहवाल सर्वसाधारण सभेपुढे सादर करावा याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे सादर.

**सुचक:-** श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ, **अनुमोदक:-** श्री.गजानन भानुदास मनगटे

श्री.राजेंद्र जंजाळ :आपण महापौर झाल्यानंतर अनेक सभामध्ये अधिकारी यांचे बाबत तसेच झालेल्या भ्रष्टाचारा बाबत चर्चा होऊन चौकशी लावली गेली आजपर्यत चौकशी अहवाल समोर आला नाही. बीएमसी सेवा बाबत डॉ.जयश्री कुलकर्णी यांनी जी पदविका प्रमाणपत्र मिळविले त्यावेळी त्या येथे कार्यरत होत्या का तसेच बायोमेडीकल वेस्ट जेथे विल्हेवाट लावली जाते त्या प्रोजेक्टची पाहणी केली तेथे नियमाची पायमल्ली दिसून आली पर्यावरण सद्य स्थिती अहवाल प्रत्येक वर्षाच्या जुलै महिण्यात देणे बंधनकारक असते तीन वर्षापासून अहवाल दिला नाही.तसेच रॉडींग मशीन खरेदी करून त्या विहीत कालावधीपर्यत वापरात न आणणे बाबत अशा व इतर ही काही प्रकरणात चौकशीचे आदेशीत केले होते अहवाल दिला नाही.सर्व प्रकरणाचा अहवाल सादर करावा.

श्री.गजानन बारवाल :अनेक प्रकरणात चौकशी नेमली अहवाल घ्यावा.

मा.महापौर :ज्या प्रकरणात चौकशीचे आदेशीत केले सर्व प्रकरणाची चौकशी करावी सभागृहासमोर अहवाल सादर करावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या विविध कामाच्या किंवा अधिकाऱ्यांच्या बाबतीत व इतर प्रकरणात सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा होऊन एप्रिल-२०१५ पासून ज्या चौकशीचे आदेश दिले आहे त्या चौकशीचे अहवाल सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३८५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपलिका हद्दीत महानगरपालिकेचे जे काही महापुरुषांचे पुतळे आहेत. जसे की, तथागत गौतमबुध्द, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संभाजी महाराज, महात्मा फुले, छत्रपती शाहु महाराज, स्वा.वि.दा.सावरकर इ.अशा पुतळ्याची रोषणाई व कारंजे हे देखभाल दुरुस्तीतुन वार्षीक पध्दतीने कामे करण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक :-** श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-** श्री.गोकुलसिंग संतपसिंग मलके

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, तथागत गौतमबुध्द, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संभाजी महाराज, महात्मा फुले, छत्रपती शाहु महाराज, स्वा.वि.दा.सावरकर इ.अशा पुतळ्याची रोषणाई व कारंजे हे देखभाल दुरुस्तीतुन वार्षीक पध्दतीने कामे करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३८६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा वॉर्ड क्र.१०५ मध्ये राहुलनगर येथे पंप हाऊसच्या बाजुला मनपाची खुली जागा असुन माझ्या वॉर्डात गोर गरीब लोकांना त्यांचे कार्यक्रम साजरे करण्यासाठी शादीखाना (मंगल कार्यालय) नसल्याने रहिवासीयांना त्यांचे कार्यक्रम खुल्यावर साजरे करावे लागतात.

सदरील खुल्या जागेत २५०० स्क्वेअर फिट जागेवर सार्वजनिक शादीखाना (मंगल कार्यालय) बांधल्यास रहिवासीयांना त्यांचे कार्यक्रम साजरे करण्यासाठी सोईचे होईल. व त्या माध्यमातुन मनपास महसुल ही प्राप्त होईल. म्हणून राहुलनगर येथील मनपाच्या खुल्या जागेत शादीखाना (मंगल कार्यालय) बांधण्यासाठी तसेच संभावित खर्चास मंजुरी मिळण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

**सुचक:-** श्री.अब्दुल नवीद अब्दुल रशीद. **अनुमोदक:-** श्री.सोहेल शकील शेख.

मा.महापौर : विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१०५ मधील राहुलनगर येथे मनपाच्या असलेल्या खुल्या जागेत नियमाप्रमाणे शादीखाना (मंगल कार्यालय) बांधण्यास तसेच या कामासाठी येणाऱ्या संभावित खर्चास मंजुरी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३८७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील माझे वॉर्ड क्र.४१ मधील मोहल्ला रहेमानियॉ कॉलनी मधील जफरनगर येथे मनपाचे सामाजिक सभागृह असुन या सभागृहाचे नांव भाडे तत्त्वावर देण्यात येणारे यादीत तसेच निवीदा प्रक्रियेत नांव समाविष्ठ आहे. परंतु सदरील सभागृह आकाराने लहान असल्याने तसेच या भागातील व शेजारी भागासाठी एक ही वाचनालय नसल्याने शेजारी ४-५ वॉर्डातील रहिवासीयांच्या मागणी प्रमाणे या ठिकाणी वाचनालय सुरु करावयाचे आहे.

करीता मनपाचे सभागृह व इतर इमारतींना भाडे तत्त्वावर देण्यात येणारे यादीतुन तसेच निविदा प्रक्रियेतुन मोहल्ला रहेमानियॉ कॉलनी मधील जफर नगर येथे मनपाचे सामाजिक सभागृहाचे नांव वगळण्यांत यावे व सदर हॉल मध्ये वाचनालय सुरु करण्यासाठी मंजुरी मिळण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत सविनय सादर.

**सुचक:-** श्री.खान इरशाद इब्राहिम

**अनुमोदक:-** श्री.खान जहाँगीर मुलानी, श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

मा.महापौर : विषय मंजुर. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४१ मधील मोहल्ला रहेमानियॉ कॉलनी मधील जफरनगर येथील मनपाचे सभागृह व इतर इमारतींना भाडे तत्त्वावर देण्यात येणाऱ्या यादीतुन सभागृहाचे नांव वगळण्यांत यावे व सदर हॉल मध्ये वाचनालय सुरु करण्यासाठी नियमानुसा कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३८८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ब्रीजवाडी पावरलुम घोषित स्लम वॉर्ड आहे. तेथील लोकांना रोज अनेक समस्यांचा तसेच आजाराचा सामना करावा लागत आहे. तेथील बायकांना धुणी भांडी करून

आपला उदरनिर्वाह करावा लागतो. येथील लोकांना खाजगी रुग्णालयातील खर्च त्यांच्या हिशोबाच्या बाहेर आहे.

तरी नारेगाव ब्रिजवाडी येथे मनपातर्फे एक मोठे शासकीय रुग्णालय उपलब्ध करून देण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप **अनुमोदक:-**श्रीमती सीमा गणपत खरात.

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ब्रीजवाडी पावरलुम घोषित या स्लम वॉर्डात नारेगाव ब्रिजवाडी येथे मनपातर्फे एक मोठे शासकीय रुग्णालय उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३८९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेतील शिक्षण विभागासाठी शिक्षणाधिकारी हे पद शासनाकडुन तीन वर्षासाठी भरण्यात येते. परंतु महानगरपालिकेत या पदावर गेल्या वर्षभरापासुन एकही अधिकारी आलेला नाही. त्यामुळे शिक्षण विभागाची विविध कामे प्रलंबित राहतात. तरी महानगरपालिका मुख्याध्यापकांमधून एखाद्या मुख्याध्यापकास अतिरिक्त कार्यभार दिल्यास विद्यार्थी गुणवत्ता वाढण्यास मदत होईल व सर्व कामे सुरळीत होतील.

करीता जोपर्यंत शासनाकडुन पूर्णवेळ शिक्षणाधिकारी येत नाही तोपर्यंत इच्छुक मुख्याध्यापकांकडुन चर्चा करुन समितीद्वारे अतिरिक्त पदभार देण्यात यावा.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.नितीन दशरथ साळवी **अनुमोदक:-** श्री.मनोज आसाराम बल्लाळ

मा.महापौर :प्रशासनाने योग्य निर्णय घ्यावा. सक्षम अधिकारी नेमावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेतील शिक्षण विभागासाठी जोपर्यंत शासनाकडुन पूर्णवेळ शिक्षणाधिकारी येत नाही तोपर्यंत इच्छुक मुख्याध्यापकांशी चर्चा करुन समितीद्वारे अतिरिक्त पदभार सक्षम अधिकारी यांच्याकडे देण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३९०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१५, मिटमिटा मध्ये तसेच आजु-बाजुच्या परिसरात मिळून जवळपास २५ हजार लोकसंख्या आहे. स्थानिक नागरीकांची परिस्थिती गरीब आहे व आजु बाजुच्या परिसरात कोणते ही शासकीय रुग्णालय नसल्याने गरीबांना औषधोपचार करण्यास फार आर्थिक त्रास होत आहे. या माझ्या वॉर्डात मनपाचे आरोग्य केंद्र सुरु केल्यास गोर गरीब व मोल मजुरी करणाऱ्या लोकांना सोईचे होऊन त्यांचे आरोग्य सुरळीत राहण्यास मदत होईल करीता वॉर्ड क्र.१५ मिटमिटा येथे मनपाचे नवीन आरोग्य केंद्र सुरु करावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.रावसाहेब राधाकिसन आमले **अनुमोदक:-** श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१५, मिटमिटा येथे नागरीकांच्या सुविधेकरीता मनपाचे नवीन आरोग्य केंद्र सुरु करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३९१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पूर्वीचे वॉर्ड क्र.४१, शहाबाजार अशोकनगर मध्ये बिस्मिल्ला भाई यांच्या घरा समोर पुल बांधण्याचे काम काढले होते. सदर ठिकाणी लोकांना राहदारीचे फार त्रास होत असल्यामुळे पुल बांधणे अत्यंत गरजेचे आहे.

बिस्मिल्ला भाई यांच्या घरा समोर पुल बांधण्याचे काम ठेकेदारांना देण्यात आले होते. दिलेले ठिकाणी ठेकेदारांनी कोणतेही पुलाचे काम न करता पुलाचे आर्धी किंमत अंदाजे ४ लक्ष रुपये अभियंतांनी खोटे बनावटी देयक तयार करुन ठेकेदारांना बेकायदेशिर देण्यात आले. या पुलाचे बनावटी देयक तयार करणारे व घेणारे अभियंता आणि ठेकेदार यांच्या विरुध्द चौकशी करुन कठोर कार्यवाही करण्यात यावी व या पावसाळ्या पूर्वी शहाबाजार अशोकनगर बिस्मिल्ला भाई यांच्या घरा समोरील पुल तयार करुन देण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी **अनुमोदकः-**श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी

मा.महापौर :या विषयात नमुद केल्यानुसार जे बील काढले गेले त्यांची चौकशी करावी पावसाळयापुर्वी पुलाचे काम करावे.

श्रीमती सरवत बेगम :बोगस कामाची यादी दिली होती चौकशी करणार होते केली नाही.

मा.अति.आयुक्त :२१ कामाची लिस्ट दिली आहे एम बी मागविले चौकशी करण्यास सुरवात केली जुनी कामे आहे.

मा.महापौर :प्रशासनाने चौकशी करावी योग्य कार्यवाही करावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४१, शहाबाजार अशोकनगर मध्ये बिस्मिल्ला भाई यांच्या घरा समोर पुल बांधण्याचे काम ठेकेदारांना देण्यात आले होते सदर काम ठेकेदारांनी कोणतेही काम न करता आर्धी किंमत अंदाजे ४ लक्ष रुपये अभियंतांनी खोटे बनावटी देयक तयार करुन ठेकेदारांना बेकायदेशिर देण्यात आले. या पुलाचे बनावटी देयक तयार करणारे व घेणारे अभियंता आणि ठेकेदार यांच्या विरुध्द चौकशी करुन कठोर कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच या पुलाचे काम पावसाळ्यापूर्वी करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३९२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपलिकेचे विविध वॉर्डातील अनेक विकासाचे कामे टेंडर मार्फत गुत्तेदार घेतात परंतु निवीदेच्या अटी व शर्ती प्रमाणे ठराविक कालावधीत ते काम करीत नसून अर्धवट कामे करुन सोडतात. आणि पुन्हा नव्या कामासाठी टेंडर भरतात. पुन्हा कामे घेतात दोन्ही कामे ते वेळेवर करीत नसल्याने विकास कामांना खिळ बसत आहे.

महानगरपालिकेचे वतीने देण्यात आलेले विकास कामाचे वर्क ऑर्डर प्रमाणे जो गुत्तेदार वेळेच्या आत काम करीत नाही त्यांना पुढील कामाचे टेंडर भरण्यास मनाई करावी व त्याचे टेंडर बाद करण्यात यावे जेणेकरुन त्यांनी पूर्वी घेतलेले कामे पूर्ण करतील.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख **अनुमोदकः-** श्री.गंगाधर नामदेव ढगे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आलेले विकास कामाचे वर्क ऑर्डर प्रमाणे जो गुत्तेदार वेळेच्या आत काम करीत नाही त्यांना पुढील कामाचे टेंडर भरण्यास मनाई करावी व त्याचे टेंडर बाद करण्यात यावे जेणेकरुन त्यांनी पूर्वी घेतलेले कामे पूर्ण करतील. यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३९३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील विविध भागात लोकांनी मुख्य रस्त्यावर अंतर्गत गल्ल्यात तसेच दुकाना समोर लहान मोठे ओटे बांधून अतिक्रमण केलेले आहे. ज्यामुळे रहिवासीयांना रहदारी तथा वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. तसेच सदरील ओटे मुळे विकास कामात बाधा निर्माण होते सदरील समस्या एका जागा नसुन सर्वत्र हिच समस्या आहे. जेणेकरुन महानगरपालिका तर्फे सर्व दैनिक वर्तमान पत्रात जाहीर प्रगटन देऊन स्वत:ओटयाचे अतिक्रमण हटविण्यास सुचित करण्यात यावे त्यानंतर प्रशासनातर्फे कार्यवाही करण्यात येऊन संबंधीत अतिक्रमण धारकास ५०० रुपये प्रति चौरसफुट दराने दंड आकारण्यात यावा.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक :-** श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम **अनुमोदक:-** श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

श्री.अब्दुल नाईकवाडी :योग्य ती कार्यवाही करावी लोकांना पायी चालता येत नाही. रूग्ण असेल तर त्या रस्त्याने जाणे कठीण होते.

मा.महापौर :प्रशासनाने दिलेल्या सुचनेनुसार,स.सदस्यांनी सांगितलेली तसेच नागरीकांच्या तक्रारी नुसार अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील विविध भागात अनधिकृत झालेले अतिक्रमणाबाबत संबंधीत विभागाने प्रशासनाने दिलेल्या सुचनेनुसार,स.सदस्यांनी सांगितलेली तसेच नागरीकांच्या तक्रारी नुसार अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३९४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय इमारत टप्पा क्रं.३ च्या पाठीमागील नुर कॉलनी वसाहतीमध्ये मागील ०३ महिन्यापूर्वी डेंग्यु आजाराची लागण झाल्याने ३३ वर्षीय युवक नामे अब्दुल जावेद अब्दुल खालेक यांचा मृत्यु झालेला होता त्यावेळीस तात्कालीन आयुक्त श्री.केंद्रेकर यांनी स्थळ पाहणी करुन तेथे विविध कामासह नाल्याचे काम पूर्ण करण्यास आदेशित केलेले होते त्यानुसार काम प्रगती पथावर आहे.

परंतु ज्या युवकांचा मृत्यु झाला त्याला दोन लहान मुले, बायको, आई असा परिवार असून त्याचे वडील मयत झालेले असतांना हातावर कमविता मुलगा गेल्याने त्यांच्यावर कुटूंबियावर उपासमारीची वेळ आलेली आहे. असे असतांना सुध्दा महानगरपालिकेतर्फे आज पर्यंत कोणती ही आर्थिक मदत करण्यात आलेली नाही.

या वसाहतीमध्ये डेंग्युची लागण झालेली होती त्या बाबतच्या बातम्या दैनिक वर्तमान पत्रामध्ये सुध्दा छापुन आलेले होते व अब्दुल जावेदच्या मृत्युपूर्वी सुध्दा या ठिकाणी डेंग्युने दोन बालके दगावली होती तरी सुध्दा मनपाने गांर्भियाने दखल घेतलेली नव्हती म्हणून महानगरपालिकेच्या वतीने मयत

अब्दुल जावेद अब्दुल खालेक यांचे कुटूंबियांना त्याचे पुढील उदारनिर्वाह व मुलांच्या शिक्षणासाठी किमान ०५ लाखाची आर्थिक मदत करावी म्हणून प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्री.विकास प्रकाश एडके

**अनुमोदकः-** श्रीमती शकीला बेगम फय्याजोद्दीन, श्रीमती शेख नरगीस सलीम

मा.महापौर :नियमानुसार कार्यवाही करावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय इमारत टप्पा क्रं.३ च्या पाठीमागील नुर कॉलनी वसाहतीमध्ये डेंग्यु आजाराने मयत झालेल्या अब्दुल जावेद अब्दुल खालेक यांचे कुटूंबियांना त्याचे पुढील उदारनिर्वाह व मुलांच्या शिक्षणासाठी किमान ०५ लाखाची आर्थिक मदत देण्याकरीता प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येत. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक-३९५ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-१७-अर्थसंकल्पीय सभेच्या विषयास हा क्रमांक दिलेला आहे.)**

**<u>विषय क्रमांक ३९६:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८४, ज्ञानेश्वर कॉलनी येथे हिंदुस्तान पेट्रोलियम या कंपनीच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाचे निवासस्थाने आहेत. सदरील निवासस्थानांच्या बाजुला सोहम् मोटर्स ते हिंदुस्थान पेट्रोलियमचे क्वॉर्टर्स तसेच हिंदुस्तान पेट्रोलियमचे क्वॉर्टर्स ते श्री राजश्री शाहु विद्यालयाच्या कंपाऊंड वॉल पर्यंतच्या रस्त्यांचे कॉँक्रीटीकरण हिंदुस्तान पेट्रोलियम या कंपनी तर्फे करण्याचा प्रस्ताव आहे.

करीता, सोहम् मोटर्स ते हिंदुस्तान पेट्रोलियमचे क्वॉर्टर्स तसेच हिंदुस्तान पेट्रोलियमचे क्वॉर्टर्स ते श्री राजश्री शाहु विद्यालयाच्या कम्पाऊंड वॉल पर्यंतच्या रस्त्याचे कॉँक्रीटीकरण हिंदुस्तान पेट्रोलियम या कंपनीतर्फे करण्याचा प्रस्तावास मंजुरीदेणेस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**सुचकः-** श्री.जगताप कमलाकर शामराव **अनुमोदकः-** श्री.राजगौरव हरिदास वानखेडे

श्री.रेणुकादास वैद्य :कंपनीचे तसेच स.सदस्यांचे अभिनंदन करावे. असे काम करण्यास अजुनही काही कंपनी उत्सुक असतील तर बोलविण्यात यावे.

मा.महापौर :संबधीत कंपनीच, स.सदस्यांचे अभिनंदन इतर ही कंपनी असेल त्या पुढे येत असेल तर तशी कार्यवाही करावी हा विषय मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, की, वॉर्ड क्र.८४, ज्ञानेश्वर कॉलनी येथील सोहम् मोटर्स ते हिंदुस्थान पेट्रोलियमचे क्वॉर्टर्स तसेच हिंदुस्तान पेट्रोलियमचे क्वॉर्टर्स ते श्री राजश्री शाहु विद्यालयाच्या कंपाऊंड वॉल पर्यंतच्या रस्त्यांचे कॉँक्रीटीकरण हिंदुस्तान पेट्रोलियम या कंपनीतर्फे करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३९७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दक्कन ऐ.जू.ॲण्ड वेलफेअर सोसायटी औरंगाबाद ही नोंदणीकृत संस्था असून शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविण्याचे उद्देशाने स्थापित केलेली आहे. या संस्थेतर्फे शहरामध्ये पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शाळा चालविण्यात येत आहे.

सर्व शाळेत अधिकतर झोपडपट्टी परिसरातील व गरीब वस्त्यातील विद्यार्थी शिक्षण घेतात. सदर विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्यात येत आहे. सदर शाळांचे विद्यार्थी मॅट्रीक बोर्ड परिक्षेत दर वर्षी चांगल्या गुणवत्तेने पात्र होतात आणि शाळेचा निकाल ९० टक्के पेक्षा जास्त असतो. गेल्या दहा वर्षात दोन वेळा शाळेचा निकाल १०० टक्के लागलेला आहे.

उपरोक्त सर्व शाळामध्ये विद्यार्थी संख्या खुप असल्याने सद्यस्थितीत शाळेची इमारत अपुरी असून त्यासाठी पुरेशी इमारत व खुली जागा गरजेची आहे.

वॉर्ड क्र.२५ आलमगीर कॉलनी येथील महानगरपालिकेची एक इमारत रिकामी पडलेली असून त्या इमारतीचा पुरेसा उपयोग होण्याकरीता व त्यातुन महानगरपालिकेला उत्पन्न मिळण्याकरीता सदर इमारत उपरोक्त संस्थेला त्यांच्या उद्देशानुसार शैक्षणिक व सामाजिक उपक्रमास उपयोगी होण्यासाठी नियमानुसार देण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन **अनुमोदक:-** श्री.सय्यद मतीन रशीद

मा.महापौर : विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२५ आलमगीर कॉलनी येथील महानगरपालिकेची एक इमारत रिकामी पडलेली असून त्या इमारतीचा पुरेसा उपयोग होण्याकरीता व त्यातुन महानगरपालिकेला उत्पन्न मिळण्याकरीता सदर इमारत नोंदणीकृत असलेल्या दक्कन ऐ.जू.ॲण्ड वेलफेअर सोसायटी औरंगाबाद संस्थेला त्यांच्या उद्देशानुसार शैक्षणिक व सामाजिक उपक्रमास उपयोगी होण्यासाठी नियमानुसार देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३९८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद दैनिक एशिया एक्सप्रेस (उर्दु) चे जेष्ठ पत्रकार श्री सलीम अहेमद यांना यंदाचा महाराष्ट्र राज्य ऊर्दु साहित्य अकॅडमी तर्फे उत्कृष्ट ऊर्दु पत्रकारिते करीता श्री.हारुन रशिद सहाफती पुरस्काराने महाराष्ट्र शासनातर्फे सन्मानित करण्यात आलेले आहे.

श्री. सलीम अहेमद हे अनेक वर्षापासुन औरंगाबाद महानगरपालिकेतील दैनिक एशिया एक्सप्रेस (ऊर्दु) चे बातमीदार म्हणून कार्य करीत असल्याने त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने सभागृहात महानगरपालिकेचे स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात यावा. करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.अफसर खान यासीन खान

**अनुमोदक:-**श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले, श्री. एडके विकास प्रकाश.

मा.महापौर :ही सभा संपल्यानंतर अभिनंदन करण्यात येइल. विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद दैनिक एशिया एक्सप्रेस (उर्दु) चे जेष्ठ पत्रकार श्री सलीम अहेमद यांना यंदाचा महाराष्ट्र राज्य ऊर्दु साहित्य अकॅडमी तर्फे उत्कृष्ट ऊर्दु पत्रकारिते करीता श्री.हारुन रशिद सहाफती पुरस्काराने महाराष्ट्र शासनातर्फे मिळालेल्या पुरस्काराबद्दल औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने सभागृहात महानगरपालिकेचे स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३९९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४६ नवाबपुरा मधील जिन्सी हा भाग जुन्या औरंगाबाद हद्दीतील असून या भागास ऐतिहासीक महत्व आहे. या भागातील स्थानिक नागरीकांची अनेक वर्षापासून मागणी आहे की, जिन्सी चौकाला “हजरत ख्वाजा गरीब नवाज” यांचे नाव देण्यात यावे.

तरी वॉर्ड क्र.४६ नवाबपुरा मधील जिन्सी चौकाला “हजरत ख्वाजा गरीब नवाज” यांचे नाव देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.फेरोज मोईनोद्दीन खान **अनुमोदक:-**श्री.जहागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४६ नवाबपुरा मधील जिन्सी चौकाला "हजरत ख्वाजा गरीब नवाज" यांचे नाव नियमानुसार देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४००:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४६ नवाबपुरा मध्ये महानगरपालिकेचे प्राथमिक आरोग्य केंद्र १९८२ पासून कार्यरत आहे. सदरील आरोग्य केंद्र भाड्याच्या इमारतीत अनेक वर्षापासून होते. इमारत मालकाच्या विनंतीने महानगरपालिकेने सदर इमारत रिकामी करून महानगरपालिका शाळा जिन्सी ह्या महानगरपालिकेच्या इमारतीत सदरील आरोग्य केंद्र स्थलांतरीत केलेले आहे.

श्रीमती अलमुख्तार बेगम बद्रोउद्दीन खान हे या वॉर्डाचे फार जुने नागरीक असून वॉर्डातील महिला व मुलींच्या कल्याणासाठी त्यांनी फार कामे केलेली आहेत. त्यांचे व्यक्तिमत्व लोकप्रिय असून वॉर्डातील नागरीकांनी श्रीमती अलमुख्तार बेगम बद्रोउद्दीन खान यांचे नाव महानगरपालिका आरोग्य केंद्र जिन्सी असे नाव देण्यात यावे अशी आग्रही विनंती केली आहे.

तरी वॉर्ड क. ४६ नवाबपुरा मधील महानगरपालिका जिन्सी आरोग्य केंद्रास श्रीमती अलमुख्तार बेगम बद्रोउद्दीन खान आरोग्य केंद्र असे नाव देण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.फेरोज मोईनोद्दीन खान **अनुमोदक:-**श्री.जहागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क. ४६ नवाबपुरा मधील जिन्सी येथील महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रास "श्रीमती अलमुख्तार बेगम बद्रोउद्दीन खान आरोग्य केंद्र" असे नाव नियमानुसार देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

मा.महापौर :ऐनवेळचे विषय यात मध्यवर्ती बसस्टॅण्ड ते रेल्वेस्टेशन या मार्गावर उड्डाणपुलास भगवान महावीर उड्डाणपुल नाव देणे स.सदस्य श्री. बारवाल गजानन यांनी दिलेला सुपरवायझर यांना मानधन वाढविणेचा विषय, घनकचरा संदर्भात विषय, टी व्ही सेन्टर शौचालय बाधंणेचा विषय, नारेगाव, ब्रीजवाडी दलित वस्ती सुधार योजनेतून निधीची मागणी करण्याचा विषय सर्व मंजूर,

**विषय क्रमांक ४०१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मध्यवर्ती बसस्टॅण्ड ते रेल्वेस्टेशन या मार्गावर उड्डाणपुलाचे काम पूर्णत्वास आले असून या उड्डाणपुलाला शांतीचे प्रतिक "भगवान महावीर उड्डाणपुल" असे नांव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.दिलीप गंगाधर थोरात, श्री.विकास रतनलाल जैन, श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले.

**अनुमोदक:-** श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत, श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे, श्री.गजानन रामकिसन बारवाल, श्री.राजु रामराव शिंदे, श्रीमती राखी प्रशांत देसरडा

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मध्यवर्ती बसस्टॅण्ड ते रेल्वेस्टेशन या मार्गावरील पूर्णत्वास आलेल्या उड्डाणपुलाला शांतीचे प्रतिक "भगवान महावीर उड्डाणपुल" असे नांव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४०२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेत केंद्र शासन पुरस्कृत कुटूंब कल्याण माता संगोपन कार्यक्रम आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येतो. या कार्यक्रमा अंतर्गत ६९ आशा वर्कर कार्यरत असून त्यांच्या राष्ट्रीय आरोग्य विषयक कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी ६ आशा सुपरवायझर यांना रुपये ३०००/- मानधन मनपा फंडातून देण्यात येत आहे. सद्यस्थितीत त्यांचे काम समाधानकारक असून शासनाच्या निर्देशानुसार एन.यु.एच.एम.आरोग्य विषयक नवीन योजना महानगरपालिका आरोग्य विभागातर्फे राबविण्यात येत आहे.

मा.सर्वसाधारण सभा दिनांक २६.१०.२००७ व मा.सर्वसाधारण सभा विषय क्रमांक ४९९ दिनांक १८.१०.२०११ अन्वये सदरील ६ आशा सुपरवायझर यांचे प्रति माह मानधन रु.२५००/- मध्ये रु.५००/- वाढ करुन असे रुपये ३०००/- मानधन देण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आलेला आहे.

मनपा आस्थापनेवरील वर्ग-३ अंतर्गत दैनिक वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रतिदिन रुपये ४३०/- प्रति माह प्रमाणे मासिक रु.११,१८०/- वेतन देण्यात येते. गेल्या १४ वर्षापासुन आशा सुपरवायझर ह्या राष्ट्रीय आरोग्य सेवा व आरोग्य विषयक सर्व राष्ट्रीय कामावर सुपरव्हिजनचे कार्य करीत आहेत. जे की, वर्ग-३ अंतर्गत कर्मचाऱ्यांचे असते. करीता, ६ आशा सुपरवायझर यांना प्रति माह मानधन रुपये ३०००/- ऐवजी रुपये ११,१८०/- प्रति माह मानधन देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.गजानन रामकिसन बारवाल, श्री.दिलीप गंगाधर थोरात, श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत, श्री.खान जहाँगीर मुलानी,

**अनुमोदक:-** श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ, श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे, श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन, श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप,श्री.गजानन भानुदास मनगटे, श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड.

मा.महापौर : ऐनवेळीचा विषय मंजुर. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या केंद्र शासन पुरस्कृत कुटूंब कल्याण माता संगोपन कार्यक्रमाअंतर्गत सुपरव्हिजनचे कार्य करीत असलेल्या ६ आशा सुपरवायझर यांना प्रति माह मानधन रुपये ३०००/- ऐवजी रुपये ११,१८०/- प्रति माह मानधन देण्यास मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४०३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशातील सर्व शहरे हागंदारी मुक्त करुन शहरातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान (नागरी) दिनांक ०२ ऑक्टोबर-२०१४ पासून राबविण्यास सुरूवात केली आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजा वणी सुरु केली आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामध्ये अंतर्गत जे नागरीक उघडयावर शौचास जाण्याची पध्दत वापरतात व ज्या नागरीकांकडे

वैयक्तिक शौचालय मार्फत रक्कम रुपये १२०००/- प्रति शौचालय एवढे अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर अनुदानामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा रक्कम रु.४०००/- व राज्य शासनाचा हिस्सा रक्कम रु.८०००/- इतका आहे. या संदर्भाने सदरील अभियानाअंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे कार्यवाही करण्यात येत असून आतापर्यंत झालेल्या कामाचा प्रगती अहवाल खालील प्रमाणे आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अनुदानास पात्र लाभार्थ्यांची निवड करण्याची कार्यवाही सुरु असून आज पर्यंत ९३८ लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यापैकी सुमारे ४५९ लाभार्थ्यांस अनुदानाचा पहिला हफ्ता रक्कम रु.६०००/- प्रति लाभार्थी इतका यांच्या बँकेच्या खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करण्यात आलेली आहे. उर्वरित ४७९ पात्र लाभार्थी यांना पहिल्या हफ्त्याची रक्कम RTGS करणेची कार्यवाही सुरु आहे. आतापर्यंत लाभार्थ्यांस पहिल्या हफ्त्याच्या अनुदाना पोटी एकूण रक्कम रू.२७,५४,०००/- इतकी वितरीत करण्यात आलेली आहे. तसेच प्राप्त अर्जाचे सर्वेक्षण करण्यासाठी विशेष मोहिम (Special - Drive) राबविण्यात येत असून त्याकरीता महानगरपालिकेतील ६१ तांत्रिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्यामार्फत पात्र लाभार्थ्यांची निवड करण्याची कार्यवाही सुरु आहे. आजपर्यंत एकूण १४६ लाभार्थ्यांनी वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम पूर्ण केले आहे.

तसेच शहरातील ज्या भागात उघडयावर शौचास जाण्याचे (Open defecation) प्रमाण जास्त आढळून आले आहे. त्या भागात सर्व्हेक्षण करून चार स्थळे अनुक्रमे १) आंबेडकरनगर २) मिसरवाडी ३) हर्षनगर फाजलपूरा व ४) शताब्दीनगर भागात सार्वजनिक वापरासाठी शौचालय बांधणेची निविदा काढण्यात आली आहे. प्रक्रिये अंतर्गत कार्यवाही अंतिम करुन, कार्यादेश झाल्यानंतर कामे हाती घेण्यात येतील. करीता अहवाल मा.सर्वसाधारण सभेसमोर माहितीस्तव सादर.

मा.महापौर : ऐनवेळीचा विषय मंजुर. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी अंतर्गत ज्या भागात उघडयावर शौचास जाण्याचे प्रमाण जास्त आढळून आले आहे. त्या भागात सर्व्हेक्षण करून चार स्थळे आंबेडकरनगर, मिसरवाडी, हर्षनगर फाजलपूरा व शताब्दीनगर भागात सार्वजनिक वापरासाठी शौचालय बांधणेची निविदा काढण्यात आली आहे. प्रक्रिये अंतर्गत कार्यवाही अंतिम करुन, कार्यादेश झाल्यानंतर कामे हाती घेण्यात येतील याबाबतच्या दिलेल्या अहवालास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४०४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे टी.व्ही.सेंटर मैदानालगत आवश्यक त्या सर्व मंजुरी घेऊन शॉपींग सेंटर बांधून आतल्या बाजुने स्टेडीयम विकसीत करण्यात येत आहे. सद्यस्थितीत काम प्रगतीपथावर असुन आतापर्यंत या कामाअंतर्गत पूर्व बाजूने सुमारे १५ दुकानांचे काम पूर्णत्वाकडे जात अहे. पूर्व नियोजनानुसार या मैदानाच्या पूर्व व उत्तर बाजुने रस्त्यालगत आवश्यक सामासीक अंतर सोडून सुमारे ५० दुकानांचे गाळे बांधण्यात येणार आहेत. तथापी, या मैदानाच्या लगत कोपऱ्यावर महानगरपालिका फंडातून सन-२००९ मध्ये सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन मुंबई या संस्थेने बांधलेले सुलभ शौचालय अडथळा ठरत आहे. त्यामुळे सदरचे शौचालय पुर्णतः पाडून टाकणे आवश्यक झाले आहे. सदरचे शौचालय पाडल्यानंतर याच मैदानाच्या ठिकाणी नव्याने “पे ॲण्ड युज” तत्वावर शौचालय या स्टेडीयमच्या उत्तर बाजुस किंवा पूर्व बाजुस उपलब्ध असलेल्या जागेवर बी.ओ.टी. तत्वावर बांधण्याचे प्रयोजन आहे. या बाबत सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन

मुंबई यांना नव्याने बी.ओ.टी. तत्वावर शौचालय बांधण्यास तयार आहे. किंवा कसे या बाबत विचारणा केली असता त्यांनी या बाबीस नकार दर्शविला आहे. सद्यस्थितीत जे स्टेडीयम शॉपींग सेंटर बांधून विकसीत करण्यात येणार आहे, त्यासाठी अंदाजपत्रकानुसार रु.४.१२ कोटी एवढा खर्च येणार आहे. तथापी, या ठिकाणी जी ५० दुकाने बांधण्यात येणार आहेत त्याची बोली पध्दतीने लिलाव केला असता त्यामधून सुमारे रु.१२.७५ कोटी एवढा महसूल महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे. त्यामुळे या शौपींग सेंटरच्याकामामध्ये अडथळा ठरत असलेले सुलभ शौचालय पाडणे रास्त आहे. तशी मंजुरी तत्कालीन आयुक्त मनपा यांनी यापूर्वीच दिनांक ०२.०३.२०१४ रोजी प्रदान केलेली आहे. या शिवाय सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन मुंबई संस्थेसमवेत वर्ष-२००७ मध्ये केलेल्या करारनाम्यातील अट क्र.२४ नुसार मनपास काही कारणास्तव साईटची आवश्यकता भासल्यास करार रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेस प्राप्त आहेत.

या व्यतिरिक्त या मैदानाच्या परिसरात उत्तर बाजुस टी.व्ही.सेंटर लगत यापूर्वी सिडको कार्यालयाने बांधलेले स्व.जवाहरलाल दर्डा खुले रंगमंच, सौ.शकुंतला लिंबा सोना यांना प्रदान करण्यात आलेले झुनका भाकर केंद्र तसेच मनपाने बऱ्याच वर्षापूर्वी बांधलेली परंतू बंद अवस्थेत असलेली पानपोई प्रस्तावी शॉपींग कॉम्प्लेक्स समोर येत असल्याने अडथळा ठरत आहे. असल्याने पाडणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे उक्त तीनही बांधकामे निष्काषित करणे आवश्यक आहे.

त्यास्तव व उक्त परिच्छेदात नमुद वस्तुस्थिती विचारात घेता जुनी बंद पडलेली पानपोई, झुनका भाकर केंद्र, स्वर्गीय जवाहरलाल दर्डा रंगमंच व कार्यरत असलेले सुलभ शौचालय पाडण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. यापैकी येथील स्थानिक गरज लक्षात घेता येथे सुलभ शौचालय बांधणे आवश्यक असल्याने व ते बी.ओ.टी. तत्वावर बांधुन देण्यास अनेक संस्था तयार असल्याने मनपाचे होणारे नुकसान भरुन निघणार आहे. त्या शिवाय पानपोई नादुरूस्त असल्याने व वापरात नसल्याने ती ही पाडणे संयुक्तीक झाले आहे. त्यामुळे उक्त नमुद प्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेता वरील तीन बांधकामापैकी स्व.जवाहरलाल दर्डा खुले रंगमंच या प्रस्तवीत शॉपींग कॉम्प्लेक्सच्या नियोजनामध्ये नमुद केल्यानुसार सदरील खुले रंगमंच पाडुन ते याच परिसरात याच कामाच्या कंत्राटदाराकडून या परिसरात निविदा मान्य दराने बांधून घेण्यात येणार आहे.

करीता वर नमुद प्रस्तावात नमुद केल्यानुसार (१) अस्तिवातील सुलभ शौचालय पूर्णतः पाडून याच परिसरात उपलब्ध एजन्सीकडून बी.ओ.टी.तत्वावर “पे ॲण्ड युज” बांधून घेणे (२) प्रस्तावित शॉपींग सेंटरला अडथळा ठरत असलेली व मनपाचे बांधलेली जुनी पानपोई पूर्णतः पाडून नष्ट करणे (३) सौ.शकुंतला लिंबा सोनार यांचे बंद असलेले झुनका भाकर केंद्र पाडणे व (४) स्व.जवाहरलाल दर्डा खुले रंगमंच चे पूर्णतः पाडकाम करून ते टी.व्ही. सेंटर स्टेडीयम विकसीत करण्याचे काम ज्या कंत्राटदाराला प्रदान करण्यात आलेले आहे. त्याच कंत्राटदाराकडून निविदा मान्य दराने कामाच्या खर्चाच्या रक्कमेच्या आत करून घेण्याच्या बाबीस मान्यता देण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर : ऐनवेळीचा विषय मंजुर. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टी.व्ही.सेंटर मैदानालगत अस्तिवातील सुलभ शौचालय पूर्णतः पाडून याच परिसरात उपलब्ध एजन्सीकडून बी.ओ.टी.तत्वावर बांधून घेणे, प्रस्तावित शॉपींग सेंटरला अडथळा ठरत असलेली व मनपाचे बांधलेली जुनी पानपोई पूर्णतः पाडून नष्ट करणे, सौ.शकुंतला लिंबा सोनार यांचे बंद असलेले झुनका भाकर केंद्र पाडणे व स्व.जवाहरलाल दर्डा खुले रंगमंच चे पूर्णतः पाडकाम

करून ते टी.व्ही. सेंटर स्टेडीयम विकसीत करण्याचे काम ज्या कंत्राटदाराला प्रदान करण्यात आलेले आहे. त्याच कंत्राटदाराकडून निविदा मान्य दराने कामाच्या खर्चाच्या रक्कमेच्या आत करून घेण्याच्या बाबीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४०५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३६, नारेगांव, ब्रिजवाडी येथील ड्रेनेज लाईन बदलणे बाबत ब्रिजवाडी हे गाव १०० टक्के दलित वस्ती आहे. दलित वस्ती योजने अंतर्गत ब्रिजवाडी गावाची ड्रेनेज लाईन बदलण्यात यावी. कारण ब्रिजवाडी ही दलित लोकवस्ती गाव आहे. तेथील लोकसंख्या १५ हजाराच्या वरती आहे. येथील ड्रेनेजची पाईपलाईन खुप जुनी म्हणजे २५ वर्षापूर्वीची आहे. ती संपूर्ण खराब झालेली आहे. त्यामुळे ती ड्रेनेज लाईन जागोजागी चोकअप होत आहे. नाले साफ नसल्यामुळे ड्रेनेजचे घाण पाणी साचत आहे. त्यामुळे नळाच्या पाण्यात सुध्दा घाण पाणी येत असल्याने कारणांने, लोकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. तरी संपूर्ण ड्रेनेज लाईन बदलण्यासाठी १ कोटी निधी मिळणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप **अनुमोदक:-** श्रीमती सिमा गणपत खरात,

मा.महापौर : ऐनवेळीचा विषय मंजुर. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३६, नारेगांव, ब्रिजवाडी येथील दलित वस्ती योजने अंतर्गत ड्रेनेजची पाईपलाईन बदलण्यासाठी १ कोटी निधी मिळण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४०६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सध्या महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर कार्यरत असणारे श्री.विठ्ठल डाके, सहा.आयुक्त (प्रतिनियुक्ती) यांचे निलंबनाचा ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५६ (१) व (ब) च्या तरतुदीनुसार महापालिका प्रशासनाने जा.क्र./मनपा/आस्था-१/२०१६/६०९ दिनांक १३.०४.२०१६ अन्वये निलंबन आदेश क्रमांक आस्था-१/२०१६/५७३ दिनांक ०७.०४.२०१६ सभागृहापुढे सादर केलेले आहे. महानगरपालिकेच्या मालमत्ता कर वसुलीच्या मोहिमेत झालेल्या भांडण व वादावादीच्या वेळी पिस्तुल काढणे, ही बाब अयोग्य आहे. अशा अधिकाऱ्यास महानगरपालिकेच्या सेवेत ठेवू नये. स.सदस्यांनी या संदर्भात व्यक्त केलेल्या भावना व कायद्यातील तरतुदीनुसार सभागृहाने श्री.विठ्ठल डाके, सहा. आयुक्त (प्रतिनियुक्ती) यांचे निलंबन कायम न करता त्यांना त्यांच्या मुळ खात्याकडे परत पाठवावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु (रेणुकादास) वैद्य **अनुमोदक:-**श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले

**चर्चा:-**

नगर सचिव :(वार्ड अधिकारी श्री.डाके यांच्या निलंबनाचे आदेश नगर सचिव वाचून दाखतात).

श्री.रेणुकादास वैद्य :श्री.डाके हे सक्षम अधिकारी आहेत. त्यांनी चांगले काम केले वसुली झाली पाहिजे त्यासाठी आपण नागरीकांकडे तगादा लावत असतो. परंतु बंदूकीचा धाक दाखवून वसुली होत असेल तर, हे निषेधार्ह आहे. अशा अधिकाऱ्यांची या महापालिकेला गरज नाही. त्यांना शासनाकडे परत पाठवून द्यावे.

श्री.गजानन बारवाल :या प्रकरणात पोलीस केस झालेली असून चौकशी सुरू आहे. त्यांचे निलंबन रद्द करून त्यांना शासनाकडे परत पाठवावे.

श्री.राजगौरव वानखेडे :चुकीच्या पध्दतीचा अवलंब करून वसुली करीत होते. त्यांचे निलंबन रद्द करून श्री.डाके यांना शासनाकडे परत पाठवावे.

श्री.कैलास गायकवाड :जाणूनबजून त्यांनी चूक केली की, अनावधानाने केली याची माहिती घ्यावी. औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये त्यांची साडेतीन वर्षे सेवा झालेली आहे. त्यांचे निलंबन रद्द करून त्यांना शासनाकडे परत पाठवावे.

श्री.नासेर सिध्दीकी :निलंबन मागे घेऊन त्यांना त्यांच्या मुळ खात्याकडे परत पाठवावे.

श्री.दिलीप थोरात :श्री.डाके हे सक्षम अधिकारी आहेत. दुर्देवाने ही घटना घडली, त्यामुळे प्रशासनाने कार्यवाही केली. त्यांची येथील चांगली सेवा विचारात घेता, त्यांचे निलंबन मागे घेऊन त्यांना शासनाकडे परत पाठवावे.

श्री.जगताप भाऊसाहेब :कर वसुली करतांना झालेल्या वादातून जी घटना घडली. त्याबद्दल प्रशासनाने त्यांना निलंबीतही केले. निलंबन मागे घेऊन त्यांना शासनाकडे परत पाठवावे.

श्रीमती ज्योती मोरे :त्यांना महापालिकेच्या सेवेत रूजू करून घ्यावे व शासनाकडे पाठविण्यात यावे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :ज्यांच्याकडे थकबाकी होती त्यांना टॅक्स भरला काय? याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. अधिकाऱ्यांनी चुक केली. समोर आले, त्यांना परत शासनाकडे पाठवावे.

श्री.गंगाधर ढगे :संबंधीत अधिकाऱ्यास बंदूक काढण्याची वेळ का आली? त्यावेळी तेथील कार्यकर्ते त्यांचेवर धावून आले. गळा दाबण्याचा प्रयत्न केला. मारहाण करीत असतील तर आपल्या अधिकाऱ्यांनी काय करायचे? शहांगज मध्ये एका विद्युत कर्मचाऱ्यास मारहाण झाली. त्यांचे डोक्याला टाके पडले होते. कर्मचाऱ्यांना मारहाण होते. तरी समोरच्या व्यक्तीवर काहीही कार्यवाही केली जात नाही. श्री.डाके, वार्ड अधिकारी यांचे बाबत योग्य निर्णय घ्यावा.

श्री.मनोज गांगवे :टॅक्सची चांगली वसुली त्यांनी केली. जो प्रकार घडला चुकीचा होता. यानंतर असा प्रकार होऊ नये. त्यांना परत शासनाकडे पाठवावे.

श्री.जहांगीर खान :चौकशी करावी. योग्य निर्णय घ्यावा. त्यांनाशासनाकडे परत पाठवावे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :स्ट्रीट लाईटच्या पोलवर केबल टाकलेली होती. ती हटविण्यासाठी आपले कर्मचारी गेले असता, त्यांना मारहाण झाली. केबल हटवू शकलो नाही. अशा वेळी प्रोटेक्शन दिले जावे. ज्यांचेकडे थकबाकी आहे त्यांनी टॅक्स भरला पाहिजे. काही वेळा कर्मचाऱ्यांकडून चुक झाली तर ताकीद दिली पाहिजे. श्री.डाके यांचे निलंबन मागे घेऊन त्यांना परत पाठवावे.

मा.उपमहापौर :कलम ५६(१) ब काय आहे नगरसचिव यांनी वाचून दाखवावे.

नगर सचिव :(कलम ५६ (१) ब वाचून दाखवितात.) आयुक्त, प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिकारी असलेला परिवहन अधिकारी वगळून, महानगरपालिकेने किंवा अन्य कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या अशा कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास, महानगरपालिकेचा आदेश होईपर्यंत निलंबीत करू शकेल व अशा प्रकारे निलंबीत करण्यात आलेला अधिकारी हा असा परिवहन व्यवस्थापक किंवा कलम ४५ अन्वये नियुक्त करण्यात आलेला अधिकारी असेल तर असे

निलंबन व त्यासंबंधीची कारणे आयुक्ताने ताबडतोब महानगरपालिकेस कळविली पाहिजेत व महानगरपालिकेने अशा निलंबनाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या मुदतीत निलंबन कायम केले नाही तर ते निलंबन संपुष्टात येईल.

श्री.अफसर खान :श्री.डाके वसुलीच्या कामासाठी गेलेले होते. महापालिकेच्या हिताचे काम करीत होते. सबधीतांनी टॅक्स भरला असता, तर अधिकारी तेथे गेले नसते. त्यांचेवर चार लोकांनी मारहाण करण्याचा प्रयत्न केला होता अशी माहिती मिळते. स्वरंक्षणासाठी श्री.डाके यांना बंदूक काढावी लागली. म्हणून त्यांचेवर ही वेळ आली. पुर्ण माहिती न घेता त्यांचेवर कार्यवाही केली. त्यांना न्याय मिळावा. निलंबन मागे घ्यावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :त्यांना मारहाण करण्याचा कुणीही प्रयत्न केला नाही. श्री.डाके यांनी डायरेक्ट बंदूक काढून संबंधीत व्यक्तीच्या डोक्याला लावली. श्री.डाके यांना पोलीस संरक्षण होते. ७-८ कर्मचारी सोबत होते, असे असतांना त्यांना बंदूक वापरण्याची गरज नव्हती. १०० टक्के त्यांचेकडून चुक झाली. त्यांना येथे राहण्याची इच्छा नाही. बोलून दाखविले होते. आजही त्यांना निलंबीत करून ५० टक्के पगार द्यावाच लागतो. येथे काम करण्याची त्यांची इच्छा नसेल, तर त्यांना शासनाकडे परत पाठवावे.

श्री.दिलीप थोरात :श्री.डाके यांचे निलंबन मागे घेऊन, त्यांना शासनाकडे परत पाठवावे.

श्री.भगवान घडमोडे :श्री.डाके यांनी वसुली चांगली केली आहे. असा प्रकार यापुर्वी घडला नाही. वसुली झाली पाहिजे याबाबत दुमत नाही. त्यांचा संयम सुटला, चुक झाली असेल माफ करावे. निलंबन मागे घेऊन त्यांना शासनाकडे परत पाठवावे.

मा.महापौर :ज्या दिवशी ही घटना घडली. त्याच दिवशी मी प्रत्यक्ष त्या ठिकाणी गेलो होतो. काही अधिकारी तेथे होते. बंदूक वापरण्याचे लायसन्स आहे का अशी चर्चा झाली. वसुलीच्या ठिकाणी बंदुक काढण्याची आवश्यकता नव्हती. मा.आयुक्तांनी कार्यवाही केली योग्य आहे. चुक केली. त्यांचे समर्थन करणार नाही. परंतु निलंबन काळात त्या अधिकाऱ्यांना ५० टक्के वेतन द्यावे लागते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५६(१) ब च्या तरतुदीनुसार हा विषय आलेला आहे. श्री.विठ्ठल डाके हे शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी आहेत. त्यांनी चांगले काम केलेले आहे. सभागृहाच्या भावना लक्षात घेता व कायद्याच्या तरतुदीनुसार त्यांचे निलंबन कायम न करता, त्यांना शासनाकडे त्यांचे मुळ विभागात परत पाठविण्याची शिफारस करीत आहे. यास मंजुरी देण्यात येते. सभेच्या नियमानप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.विठ्ठल डाके, सहा.आयुक्त (प्रतिनियुक्ती) यांचे महापालिका प्रशासनाने केलेले निलंबन कायम न करता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५६ (१) (ब) च्या तरतुदीनुसार व त्यांचा मनपातील सेवेचा कार्यकाळ पुर्ण झाला असल्याने निलंबनाच्या तारखेपासून निलंबन रद्द करून श्री.विठ्ठल डाके, सहा.आयुक्त (प्रतिनियुक्ती) यांना त्यांच्या मुळ खात्याकडे परत पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४०७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, हरसिध्दीमाता मंदिर वसाहत चेतनानगर, म्हाडा कॉलनी, रमाई सोसायटी, राजनगर या दलित वसाहतींमध्ये जलवाहिनी टाकणे व २.५० लाख लीटर क्षमतेची टाकी बांधणे आदी कामासाठी रु.९५ लाख ची तरतुद करण्यात यावी.

तसेच सुभाषनगर, अंबरहिल, दत्तनगर, हर्सुल तलाव, हरीओमनगर या परिसरातील वसाहती मध्ये जलवाहिनी टाकणे व २.५० लाख लीटर क्षमतेची पाण्याची टाकी बांधणे या कामासाठी र.रु.९५ लाखाची तरतुद करण्यात यावी.

तसेच अंबरहिल, सुभाषनगर, चेतनानगर, म्हाडा कॉलनी या भागात ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी र.रु.९० लाखाची तरतुद करण्यात यावी.

वरीलप्रमाणे माझ्या वॉर्ड क्र.०४ या प्रभागात पिण्याच्या पाण्यासाठी सुविधा, जलवाहिनी, टाकी इत्यादी नाही तसेच ड्रेनेज लाईन ही नाही. या भागातील नागरिक मुलभूत सुविधांपासून वंचित आहेत. करीता विशेष बाब म्हणुन माझ्या वॉर्डात वरील सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

उपरोक्त प्रमाणे वॉर्ड क्र.०४ चेतनानगर-राजनगर या वॉर्डात ५०% पेक्षा जास्त दलित लोकसंख्या आहे. “शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने” अंतर्गत वरीलप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग **अनुमोदक:-**श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०४ चेतनानगर-राजनगर मध्ये “शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने” अंतर्गत नागरी मुलभूत सुविधा उपलब्ध करून देणे साठी खालील विविध विकास कामांकरीता निधी उपलब्ध करून मिळणेसाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

१. हरसिध्दीमाता मंदिर वसाहत चेतनानगर, म्हाडा कॉलनी, रमाई सोसायटी, राजनगर या दलित वसाहतींमध्ये जलवाहिनी टाकणे व २.५० लाख लीटर क्षमतेची टाकी बांधणे आदी कामासाठी र.रु.९५ लाख.
२. सुभाषनगर, अंबरहिल, दत्तनगर, हर्सुल तलाव, हरीओमनगर या परिसरातील वसाहतींमध्ये जलवाहिनी टाकणे व २.५० लाख लीटर क्षमतेची पाण्याची टाकी बांधणेसाठी र.रु.९५ लाख.
३. अंबरहिल, सुभाषनगर, चेतनानगर, म्हाडा कॉलनी या भागात ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रु.९० लाख.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४०८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, माझ्या वॉर्डात अल्पसंख्यांक बहुल वसाहत आहे. त्यामुळे “शासनाच्या अल्पसंख्यांक वस्ती सुधार योजने” अंतर्गत खालील विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

करीता माझ्या प्रभागातील सईदा कॉलनी, अंबर हिल, बशीर कॉलनी, तलाव परिसर, याठिकाणी पिण्याचा पाण्यासाठी सुविधा, जलवाहिनी, टाकी इत्यादी नाही. तसेच ड्रेनेज लाईनही नाही, या भागातील नागरीक मुलभूत सुविधांपासून वंचित आहेत.

करीता वरील वसाहतीत जलवाहिनी टाकणे यासाठी रु.९० लाख रुपये तसेच पाण्याची टाकी बांधणे या कामासाठी र.रु.८० लाख, अंतर्गत गल्ल्यांमध्ये ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी रु.८० लाख, विद्युत व्यवस्था, पथदिवे, इत्यादीसाठी र.रु.५० लाखाची तरतुद करणे आवश्यक आहे.

करीता वरीलप्रमाणे वरील वसाहतीत ५० टक्केपेक्षा जास्त अल्पसंख्यांक वसाहत असल्यामुळे "शासनाच्या अल्पसंख्यांक वस्ती सुधार योजने" अंतर्गत वरीलप्रमाणे निधी उपलब्ध करून मिळणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग **अनुमोदक:-**श्रीमती भारती महेंद्र सोनवणे

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०४ येथे "शासनाच्या अल्पसंख्यांक वस्ती सुधार योजने" अंतर्गत सईदा कॉलनी, अंबर हिल, बशीर कॉलनी, तलाव परिसर, या ठिकाणी जलवाहिनी टाकणेसाठी रु.९० लाख, पाण्याची टाकी बांधणे साठी र.रु.८० लाख, अंतर्गत गल्ल्यांमध्ये ड्रेनेज लाईन टाकणेसाठी रु.८० लाख व विद्युत व्यवस्था, पथदिवे, इत्यादीसाठी र.रु.५० लाख निधी उपलब्ध करून मिळणेसाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही.

**विषय क्रमांक ४०९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती अर्चना रामचंद्र काटकर स.शि.महानगरपालिका प्रा.शा.पडेगांव या ठिकाणी कार्यरत असुन त्यांचे पती सांगली येथे असतात. पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार त्यांनी त्यांची बदली सांगली महानगरपालिकेत करण्यात यावी यासाठी औरंगाबाद महानगरपालिका प्रशासनाकडे एक वर्षापासून अर्ज दिलेला असुन श्रीमती अर्चना काटकर यांच्या जागेवर सांगली महानगरपालिकेतील श्रीमती सिमा विजय कने स.शि.सांगली महानगरपालिका या औरंगाबाद येथे येण्यास तयार असुन त्यांनी सांगली महानगरपालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र देखिल औरंगाबाद मनपास सादर केलेले आहे. तसेच श्रीमती सिमा विजय कने यांचे पती श्री.विनोद वटणे हे भावसिंगपूरा,महानगरपालिका प्रा.शा.औरंगाबाद येथे स.शि.असल्याने पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार श्रीमती अर्चना रामचंद्र काटकर यांची बदली सांगली महानगरपालिकेत करण्यात यावी. तसेच त्यांचे जागी सांगली महानगरपालिकेतील श्रीमती सीमा विजय कने यांची बदली औरंगाबाद येथे करणेस आणि श्रीमती अर्चना रामचंद्र काटकर यांना सांगली महानगरपालिकेत बदली करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कचरु छगनराव घोडके,श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

**अनुमोदक:-**श्री.दिलीप गंगाधर थोरात,श्री.गजानन रामकिसन बारवाल

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार श्रीमती अर्चना रामचंद्र काटकर, स.शि.महानगरपालिका प्रा.शा.पडेगांव यांची बदली सांगली महानगरपालिकेत करण्यास व त्यांचे जागी सांगली महानगरपालिकेतील श्रीमती सीमा विजय कने, स.शि. यांची बदली महानगरपालिका औरंगाबाद

येथे नियमानुसार करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच श्रीमती अर्चना रामचंद्र काटकर यांना सांगली महानगरपालिकेत बदलीसाठी औरंगाबाद महानगरपालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४१० :-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,

१. पैठणगेट ते गुलमंडी, गुलमंडी ते सिटीचौक (व्हाया रंगारगल्ली) व सिल्लेखाना ते पैठणगेट, बाराभाई ताजीया ते महात्मा फुले चौक या १५ मीटर व १८ मीटर रुंद रस्त्याचे डांबरीकरण व आधुनिकीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ७.१५ कोटीचे तयार करण्यात आले आहे. तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेअंती मंजुर निविदेनुसार सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.१३% जास्त दराने मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना दिनांक ३१.०५.२०१२ च्या कार्यादेशान्वये दिलेले आहे. या कामांतर्गत आज पर्यंत रक्कम रुपये ४,८१,२२,९७८/- एवढ्या रक्कमेचे काम झालेले आहे. उर्वरीत कामापैकी सिल्लेखानाचौक ते पैठणगेट ही लांबी व्हॉईट टॉपिंगच्या कामामध्ये समाविष्ठ करण्यात आलेली आहे, तर गुलमंडी ते सिटीचौक (व्हाया रंगारगल्ली) या लांबीत भूमीगत गटार स्थलांतरीत करणे काम करणे आहे, शिवाय विकास योजने प्रमाणे रस्त्याची रुंदी उपलब्ध होत नसल्याने तुर्त हे काम करणे शक्य होत नाही. यामुळे सदर कामात रक्कम रुपये १,७५,५३,९३६/- एवढी बचत होत आहे.

२. टि.व्ही.सेंटर ते सलीम अली सरोवर हा विकास योजना रस्ता शहरातील एक मोठी वर्दळ असलेला रस्ता असून, सिडको-हडको वसाहतीकडे जाणारा मुख्य रस्ता आहे. सदर रस्ता अतिशय खराब झालेला होता. मागील ४-५ वर्षांमध्ये रस्त्याची किरकोळ डागडुजीची कामे वगळता इतर कोणतेही मोठे काम करण्यात आलेले नव्हते. वाहनधारकांना होणाऱ्या त्रासामुळे सदर रस्त्याचे मजबुतीकरण/डांबरीकरण करणे बाबत सतत मागणी होत होती. मा.आयुक्त यांनी देखील वेळोवेळी रस्त्याचे काम उपरोक्त अ.क्र.१ च्या कामांतर्गत करुन घेणे बाबत सुचना केल्यानुसार या कामाचे रक्कम रुपये १,८७,१६,७०८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास मा.आयुक्त यांची मंजुरी प्राप्त आहे. तथापी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेता, प्रत्यक्ष काम हाती घेणे शक्य नव्हते. सदर बाब विचारात घेता अ.क्र.१ मध्ये नमुद रस्त्याच्या मुळ कामात होणाऱ्या बचतीच्या रकमेतुन टि.व्ही.सेंटर ते सलीम अली सरोवर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम करणे शक्य होते. याबाबत मा.आयुक्त यांनी वारंवार सुचीत केले होते. त्यामुळे या कामाचे ठेकेदार मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना दिलेल्या कार्यादेशाद्वारे अ.क्र.१ मध्ये नमुद कामाच्या मुळ मंजुर निविदा दरानुसार त्यांचेकडून टि.व्ही.सेंटर ते सलीम अली सरोवर रस्त्याचे मजबुतीकरण/डांबरीकरणाचे काम करुन घेणे बाबत विचारणा केली असता, ते काम करण्यास तयार झाले. त्यानुसार त्यांचेकडून काम करुन घेतले आहे. अ.क्र.१ मध्ये दर्शविलेल्या कामाचे स्वरुप आणि टि.व्ही.सेंटर ते सलीम अली सरोवर या रस्त्याच्या कामाचे स्वरुप सारखेच आहे, दोन्ही कामांच्या सर्व बाबी सारख्याच आहेत.

करीता उक्त प्रमाणे अ.क्र.१ च्या कामात बचत होणाऱ्या रक्कमेतुन टि.व्ही.सेंटर ते सलीम अली सरोवर रस्त्याचे मजबुतीकरण/डांबरीकरणाचे काम मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचेकडुन मुळ मंजुर निविदा दराने करुन घेतले असल्याने या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,८७,१६,७०८/- ला आणि सदर काम करुन घेतले असल्याने कामास कार्योत्तर मंजुरी, स्थळ बदलासह देणेसाठी प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात सविस्तर नमुद केल्याप्रमाणे मंजुर निविदेद्वारे मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना कार्यादेशाद्वारे दिलेले पैठणगेट ते गुलमंडी, गुलमंडी ते सिटीचौक (व्हाया रंगारगल्ली) व सिल्लेखाना ते पैठणगेट, बाराभाई ताजीया ते महात्मा फुले चौक या १५ मीटर व १८ मीटर रुंद रस्त्याचे डांबरीकरण व आधुनिकीकरण करण्याच्या रक्कम रुपये ७.१५ कोटीच्या कामांतर्गत सिल्लेखानाचौक ते पैठणगेट व गुलमंडी ते सिटीचौक (व्हाया रंगारगल्ली) या न होऊ शकलेल्या कामापोटी रक्कम रुपये १,७५,५३,९३६/- ची बचत झाली आहे.

टि.व्ही.सेंटर ते सलीम अली सरोवर हा विकास योजना रस्ता अतिशय खराब झालेला असल्याने या कामासाठी तयार केलेले अंदाजपत्रक रक्कम रुपये १,८७,१६,७०८/- चे काम आर्थिक स्थितीमुळे हाती घेणे शक्य नसल्याने, उक्त प्रमाणे बचत रक्कमेतुन टि.व्ही.सेंटर ते सलीम अली सरोवर रस्त्याचे मजबुतीकरण/डांबरीकरणाचे काम मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचेकडुन मुळ मंजुर निविदा दराने करुन घेतलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,८७,१६,७०८/- च्या कामास, स्थळ बदलासह कार्योत्तर मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

(दिलीप सुर्यवंशी)
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-१६)**

**बुधवार दिनांक २०.०४.२०१६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.**

**स.पालिका सदस्य श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे (प्रभाग क्रमांक-८६)**

**प्रश्न क्रमांक ४२१ ते ४२५:-**

**उत्तर:- उपआयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्रश्न क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ४२१ | महानगरपालिकेस जाहिरात फलकाच्या माध्यमातुन आज रोजी किती उत्पन्न मिळत आहे? तसेच गेल्या पाच वर्षात जाहिरात फलकाच्या माध्यमातुन किती उत्पन्न प्राप्त झाले? त्याची वर्ष निहाय माहिती द्यावी. | महापालिकेस जाहिरात फलकाच्या माध्यमातून आज रोजी रु.८६,४९,२९४/- ऐवढे उत्पन्न मिळत असून गेल्या पाच वर्षातील मिळालेले उत्पन्न खालीलप्रमाणे<br>सन २०१०-११ रु.६७,४७,३२०/-<br>सन २०११-१२ रु.७५,९५,९१०/-<br>सन २०१२-१३ रु.७३,७५,६८७/-<br>सन २०१३-१४ दि.१.४.२०१३ ते ३०.०९.२०१३ रु.४१,०३,३०४/-<br>सन २०१४-१५ दि.१.१०.२०१३ ते ३१.३.२०१५ रु.१,११,८५,०३०/- |
| ४२२ | सन-२००३ मध्ये मनपा जागेवरील जाहिरात फलक निविदे मधील रक्कम (मनपाची अपेक्षित) किती होती? व त्या वर्षी किती रक्कम प्राप्त झाली? | सन २००३ मध्ये मनपा जगेवरील जाहिरात फलक निविदेमधील रक्कम (मनपाची अपेक्षित) ३८,८१,८५१/- ऐवढी होती त्यामधून सुरवातीस रु.१९,४०,९२६/- ची रक्कम प्राप्त झाली. व संबंधिताची रु.७,७६,३२६/- ची बँक गॅरंटी जमा करुन घेण्यात आली तसेच मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रस्त्यावरील होर्डींग काढणे बाबतची कार्यवाही करुन त्यांनी लावलेले होर्डींगचे मुल्यांकन करुन रु.११,५३,२५०/- संबंधीताकडे असलेल्या थकबाकी मधून वजा करण्यात आले. अशी एकूण रु.३८,७०,४९०/- प्राप्त झालेले आहे. |
| ४२३ | महानगरपालिकेतर्फे खाजगी मालमत्तावरील होर्डींग बाबत काय धोरण आखण्यात आले आहे? सर्व खाजगी जागेवर लावण्यात येणाऱ्या होर्डींग संबंधी निविदा काढण्यात येतात काय? याची माहिती द्यावी. | महापालिकेतर्फे खाजगी मालमत्ता वरिल होर्डींगबाबत मा.स्थायी समितीमध्ये ठराव पारित झाला असून त्या संबंधाने मा.सर्वसाधारण सभेत खाजगी जागेवर लावण्यात येणाऱ्या होर्डींग संबंधी अभय योजना राबविणे बाबत धोरण ठरविण्यात आलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| ४२४ | महानगरपालिकेतर्फे शहरात असलेल्या मनपाच्या मालकीच्या दिशादर्शक कमानीत कोणाला जाहिरातीसाठी करार करुन देण्यात आला आहे काय? किंवा निविदेद्वारे दिले काय? | महापालिकेतर्फे शहरात असलेल्या मनपाच्या मालकीच्या दिशा दर्शक कमानी निविदा पध्दतीने मेसर्स ऐथॉस मेडीया या एजन्सीला देण्यात आलेले आहे. |
| ४२५ | महानगरपालिकेच्या जागेवर जाहिरात फलक लावणे बाबत काही करार केले आहेत काय? किंवा निविदेद्वारे देण्यात आले आहे काय? याची माहिती द्यावी. | महापालिकेच्या जागेवर जाहिरात फलक लावणे बाबत काही करार झालेले नसून किंवा निविदेद्वारे देण्यात आलेले नाही. |

**<u>स.पालिका सदस्य श्री.राजगौरव हरिदास वानखेडे (प्रभाग क्रमांक-५)</u>**

**<u>प्रश्न क्रमांक ४२६:-</u>**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील शैक्षणिक संस्थांकडे महानगरपालिकेचा किती मालमत्ता कर थकित आहे? त्यांना कोणत्या प्रकारचा कर लावण्यात आला आहे? त्याच्या मध्ये किती प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत?

**<u>उत्तर:- उपआयुक्त तथा कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील शैक्षणिक संस्थाना ३७.५% (सामान्य कर) निवासेत्तर दराने आकारण्यात येत आहे. शहरातील २१ शैक्षणिक संस्थानी न्यायालयात धाव घेतली आहे. शहरातील शैक्षणिक संस्थाकडे एकूण रु.१४.७१ कोटी थकबाकी आहे.

**<u>स.पालिका सदस्या श्रीमती शोभा गुरुलिंगअप्पा बुरांडे (प्रभाग क्रमांक-१०९)</u>**

**<u>प्रश्न क्रमांक ४२७:-</u>**

संग्राम उड्डाणपुलाचे हस्तांतरण झाले आहे काय?

**<u>उत्तर:- कार्यकारी अभियंता (वार्ड-ब/इ/फ), महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

नाही.

**<u>प्रश्न क्रमांक ४२८:-</u>**

संग्राम उड्डाणपुलाची (देखभाल) हस्तांतरण महानगरपालिका किंवा MSRTC यापैकी कोणाकडे आहे?

**<u>उत्तर:- कार्यकारी अभियंता (वार्ड-ब/इ/फ), महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

संग्रामनगर उड्डाण पुलाची देखभाल दुरुस्ती MSRDC कडे आहे.

**<u>प्रश्न क्रमांक ४२९:-</u>**

संग्राम उड्डाणपुलावरील पथदिव्यांचे मेन्टेनन्सची जबाबदारी कोणाची आहे?

**<u>उत्तर:- अप्राप्त.</u>**

**<u>स.पालिका सदस्या श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी (प्रभाग क्रमांक-२४)</u>**

**<u>प्रश्न क्रमांक ४३०:-</u>**

वॉर्ड क्र.२४, शहाबाजार अंतर्गत येणाऱ्या टाईम्स कॉलनी चेलीपुरा ते चंपा चौक पिरगायब साहब दर्गा ते कटकट गेट रोड या ठिकाणीचे डांबरीकरण रस्त्यांचे कार्यादेश बरेच महिन्या पासुन ठेकेदारांना देण्यात आले. येत्या पावसाळ्या पूर्वी सदर ठिकाणी डांबरी करण कधी सुरु होऊन काम पूर्ण होणार?

**<u>उत्तर:- अप्राप्त.</u>**

**<u>प्रश्न क्रमांक ४३१ :-</u>**

नगर रचना विभागाकडुन रितसर बांधकाम परवानगी देण्यात आली. लोकांनी शहरात बांधकाम परवानगी घेते वेळी परपोझ नकाशे मध्ये पार्कींग साठी जागा दर्शविली आणि

परवानगी घेतल्यावर नकाशा प्रमाणे पार्कींग न करता घरे आणि दुकाने बांधले या कारणामुळे शहरात लोकांना व रहदारीवाल्यांना वाहतुकीला फार त्रास होत असल्यामुळे परपोझ नकाशाप्रमाणे पार्कींग, अंडर ग्राऊंड घरे व दुकानाचे बेकायदेशीर बांधकाम काढुन पार्कींगची जागा केंव्हा मोकळी करणार?

**उत्तरः- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

बांधकाम परवानगी देते वेळी नियमाप्रमाणे आवश्यक असलेल्या पार्किंगची तरतुद करुन बांधकाम परवानगी दिली जाते. बऱ्याच वेळी पार्किंगच्या जागेवर पार्किंग व्यतिरीक्त इतर वापर सुरु असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत प्रशासकीय विभागाच्या सहाय्याने त्वरीत कार्यवाही हाती घेण्यात येते.

**उत्तरः- उपआयुक्त (अतिक्रमण), महानगरपालिका औरंगाबाद.**

महानगरपालिका हद्दीत पार्कींग मधील अनधिकृत बांधकाम काढण्यासंदर्भात मागील तीन महिन्यात अतिक्रमण विभागामार्फत कार्यवाही प्रस्तावित केली असता खालील ठिकाणी पार्कींगची मोहिम राबविण्यात आली.

१) झमझम टॉवर, रोजाबाग येथील ४ दुकाने
२) साम कॉम्प्लेक्स, निराला बाजार ५ दुकाने
३) हायटेक आधार हॉस्पीटल, समतानगर
४) श्री.माधव पाठक, बोहरीकठडा
५) नाथ सूपर मार्केट, औरंगपूरा
६) मॅक्स हॉस्पीटल, जवाहर कॉलनी,

उक्त ठिकाणच्या पार्कींगच्या ठिकाणचे अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणे हटविण्यात आल्या असून महानगरपालिकेच्या नोटीस देण्याची कार्यवाहीनंतर ॲपेक्स हॉस्पीटल बायजीपूरा, श्रध्दा हॉस्पीटल विजयनगर, लाईफ हॉस्पीटल रामनगर एन-३ येथील पार्कींग संबंधीतांनी स्वतःहुन काढून घेण्यात आली आहे.

नगर रचना विभागामार्फत अनधिकृत पार्कींगबाबत अहवाल प्राप्त झाल्यानुसार त्यासाठी एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ५३(१) अन्वये जोडपत्र-६ ची नोटीस बजावण्यात येऊन कार्यवाही प्रस्तावित करण्यात येते. पार्कींग संदर्भात अतिक्रमण विभागाने मोहिम हाती घेतलेली आहे. लवकरात लवकर पार्कींगच्या जागा मोकळ्या करण्यात येतील.

**स.पालिका सदस्य श्री.खान इरशाद इब्राहिम (प्रभाग क्रमांक-४१)**

**प्रश्न क्रमांक ४३२ ते ४३६:-**

**उत्तरः- कार्यकारी अभियंता युआयडीएसएसएमटी-मलनिःसारण प्रकल्प, महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्र. क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ४३२ | भुमीगत गटार योजनेचे काम हे कोणत्या स्वरुपाचे आहे? सविस्तर खुलासा करण्यात यावा. तसेच भुमीगत गटार योजनेचे काम हे जुन्या मुख्य जलनिःसारण वाहिनी मध्ये करावयाची आहे किंवा नवीन ठिकाणी काम करावयाचे आहे? याचा खुलासा करण्यात यावा. | • भुमिगत गटार योजने अंतर्गत खालील नुसारची प्रमुख उपांगे आहेत.<br>१) शहरातील एकुण ५४४ कि.मी.लांबीच्या विविध व्यासाच्या मलनिःसारण वाहीन्यांपैकी आवश्यकते नुसार एकूण २७२.०० कि.मी. पर्यंतच्या विविध व्यासाच्या मलनिःसारण वाहीन्या बदलणे.<br>२) शहरातील एकूण ६०.०० कि.मी. लांबीच्या मुख्य मलनिःसारण वाहीन्या बदलणे. |

| | | |
|---|---|---|
| | | ३) शहरातील विविध भागात ४ ठिकाणी (सुधारित) एकूण २१६.०० द.ल.ली. क्षमतेचे मलप्रक्रिया केंद्राची उभारणी करणे.<br>४) मनपा हद्दीतबाहेरील सिडको प्राधीकरणाच्या अंतर्गत असलेल्या गोलवाडी येथे कांचनवाडी येथील मलप्रक्रिया केंद्र करीता पंपींग स्टेशन उभारणे.<br>५) गोलवाडी ते कांचनवाडी एसटीपी पर्यंत रायझिंग मेन टाकणे.<br>• शहरातील विविध भागात टाकण्यात येत असलेले मुख्य मलनिःसारण वाहीन्या ज्या प्रमाणात जागेची उपलब्धता असेल त्यानुसार टाकण्यात येत आहे. तसेच ज्या ठिकाणी मोठ्या इमारती आहे त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार जागेचे वळण घेवून वाहीन्या टाकण्याचे काम करण्यात येत आहे. |
| **४३३** | भुमिगत गटार योजने अंतर्गत आजपर्यंत किती किलोमिटर पर्यंत मुख्य जलनिःसारण वाहिनी टाकण्यात आलेले आहे व किती किलोमीटर पर्यंत अंतर्गत जलनिःसारण वाहिनी टाकण्यांत आलेली आहे? याचा सविस्तर खुलासा व्हावा. | • भुमीगत गटार योजने अंतर्गत दिनांक १५.४.२०१६ पर्यंत एकूण ६०.०० कि.मी.लांबीच्या मुख्य मलनिःसारण वाहीन्या पैकी ४९.०५ कि.मी. पर्यंतच्या मुख्य मलनिःसारण वाहीन्या टाकण्यात आलेल्या आहेत.<br>• एकूण २००.०० कि.मी. लांबीच्या अंतर्गत मलनिःसारण वाहीन्या टाकण्याची तजाविज आहे. या अंतर्गत ४५.०० कि.मी. लांबीच्या मुख्य अंतर्गत मलनिःसारण वाहीन्या व १५५.०० कि.मी. लांबीच्या अंतर्गत मलनिःसारण वाहीन्या टाकण्यात येणार आहे.<br>• दिनांक १५.४.२०१६ पर्यंत २३.४३ कि.मी. लांबीपर्यंतच्या अंतर्गत मुख्य मलनिःसारण वाहीन्या व ३७.४५ कि.मी. लांबी पर्यंतच्या अंतर्गत मलनिःसारण वाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत. |
| **४३४** | भुमिगत गटार योजनेचे काम मंजुर नकाशा प्रमाणे होणार किंवा ज्या प्रमाणांत निधी उपलब्ध होईल त्यानुसार होणार? याचा सविस्तर खुलासा करण्यात यावा. | • भुमीगत गटार योजनेचे काम मंजुर नकाशा प्रमाणेच करण्यात येणार आहे.<br>• परंतु केंद्र शासनाने माहे जुन-२०१५ अंतर्गत अटल नवीकरण आणि शहरी परिवर्तन मिशन (Atal Mission for Rejuvenation and Urban Transformation) (AMRUT) योजना सुरु केलेली आहे. महानगरपालिकेची मंजुर मलनिःसारण योजना ही (Transition Phase) मधील असल्याने महानगरपालिकेच्या या योजनेचा समावेश अमृत या योजने अंमर्गत केंद्र शासनाने केलेला आहे. या योजने अंतर्गत केंद्राचा मुळ हिस्सा एकुण मंजुर प्रकल्प किंमतीच्या ८० टक्के ऐवजी ५० टक्के असणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेस या योजने करीता केंद्र शासनाकडुन रु.२९२.५५११२ कोटी |

| | | |
|---|---|---|
| | | ऐवजी रु.१८२.८४३४५ कोटीचे सुधारीत अनुदान प्राप्त होणार आहे.<br>• महानगरपालिकेस सध्यस्थितीत केंद्र शासनाकडुन पहिल्या हप्त्या अंतर्गत रुपये १४६.२७५८ कोटी अनुदान या योजनेत मिळालेले आहे. म्हणजेच महानगरपालिकेच्या मलनिःसारण प्रकल्पा करीता अमृत या योजनेतुन उर्वरीत फक्त रुपये ३६.५६७६५ कोटी अनुदान (रु.१८२.८४३४५ कोटी - १४६.२७५८ कोटी) मिळणार आहे. केंद्र शासनाकडुन येणाऱ्या सुधारीत अनुदानामुळे महानगरपालिकेच्या मलनिःसारण प्रकल्प अंतर्गत रुपये १०९.७०७६७ कोटीची (रु.२९२५५११५ कोटी- रु.१८२.८४३४५ कोटी) तुट येणार आहे.<br>• तसेच मे.खिल्लारी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.आणि घारपुरे इंजिनियरिंग ॲन्ड कंन्स.प्रा.लि. (जेव्ही) यांची रुपये ३६५.६९ कोटीच्या ऐवजी रुपये ४६४.०० कोटीची निविदा मंजुर केली असल्याने महानगरपालिकेस निविदा दरामधील फरक रुपये ९८.३१ कोटीची अतिरिक्त आर्थिक तरतुद करावी लागणार आहे. महानगरपालिकेस सदरील मलनिःसारण प्रकल्प पुर्ण करणे करीता उक्त रुपये १०९.७० कोटीच्या रक्कमेचे तसेच निविदा दरामधील फरक रु.९८.३१ कोटीचे असे एकत्रित रुपये २०८.०१ कोटीच्या रक्कमेची आवश्यकता असल्याने या बाबत आर्थिक अनुदान उपलब्ध करून देणे बाबत राज्य व केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.<br>• केंद्र व राज्य शासनाकडून ज्या प्रमाणात आर्थिक निधी उपलब्ध होणार आहे त्या प्रमाणात कामे करण्यात येणार असून योजनेतील संपूर्ण कामे करण्याकरीता महानगरपालिकेस रुपये २०८.०१ कोटी उपलब्ध होणे आवश्यक आहे. |
| **४३५** | भुमिगत गटार योजने मध्ये कोणत्या कंपनीचे पाईप व ढापे/रिंग वापरणार आहे? या बाबत कोणाची मंजुरी घेण्यात आलेली आहे? याचा खुलासा व्हावा. | • भुमीगत गटार योजने अंतर्गत खालील उत्पादकांकडुन बांधकाम साहीत्य घेण्यास संबंधीत मक्तेदार मा.आयुक्त महोदय, यांचे मंजुरीन्वये परवानगी देण्यात आलेली आहे.<br>• Bharat Metal pressing ind,. Bharat spun pipe industries, shivani pipe industries pvt ltd, poona, concrete products company, medhavi prestressed pipes, patel Hume pipe, unicem vibro cst pipe ind, sagar spun pipes, alom poly extrusions ltd, rex polyextrusion pvt ltd. |

| | | |
|---|---|---|
| ४३६ | मोहल्ला कटकट गेट ते ईलियास मस्जीद पर्यंतचे काम का थांबलेले आहे? व सदरील काम कधी सुरु करणार? याचा खुलासा व्हावा. | • मोहल्ला कटकटगेट ते ईलीयास मस्जीद पर्यंतचे काम स्थानिक जमिनधारकाने हरकल घेतल्याने तुर्त थांबविण्यात आलेले होते. या संदर्भाने नगर रचना विभागाचा अभिप्राय घेण्यात आलेला असुन तदनुसार उप अभियंता क व संबंधित पीएमसी यांना सदरील ठिकाणचे काम पुनश्च सुरु करणे बाबत सुचना करण्यात आलेल्या आहेत. |

**स.पालिका सदस्य श्री.जमीर अहेमद कादरी (प्रभाग क्रमांक-१९)**

**प्रश्न क्रमांक ४३७:-**

सन-२०१४ ते सन-२०१६ या कालावधीत महानगरपालिकाने किती फिटींग व पोल काढण्यात आले ? व जुने किती फिटींग व पोल महानगरपालिका कडे जमा आहे?

**उत्तर:- प्र.उपअभियंता (विद्युत), महानगरपालिका औरंगाबाद.**

सदरील माहिती व्यापक स्वरुपाची असल्याने माहिती संकलित करण्याचे काम चालु आहे. या विभागास अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने माहिती संकलीत करण्या करीता एक महिन्याचा कालावधी लागणार आहे. आपणास विनंती पूर्वक कळविण्यात येते की, पूढील बैठकीपूर्वी माहिती देण्यात येईल.

**प्रश्न क्रमांक ४३८:-**

आपल्या कार्यालयात किती वाहने जुनी आहे? जी वापरात नाही व जुन्या वाहनांकरीता आतापर्यंत किती खर्च केले आहे?

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (अ/क/ड), महानगरपालिका औरंगाबाद.**

| वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | मॉडेल वर्ष | मागील तीन वर्षातील खर्च | | | केलेली कार्यवाही निर्लेशन झाले आहे/नाही. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 2012-13 | 2013-14 | 2014-15 | |
| MH20/E-3301 | Maruti-800 car | 1997 | 42251 | 47332 | निरंक | आहे. |
| MH20/E-3302 | Maruti-800 car | 1997 | 14686 | निरंक | निरंक | आहे. |
| MH20/E-3303 | Maruti-800 car | 1997 | 3941 | 13788 | 23591 | आहे. |
| MH20/E-3304 | Maruti-800 car | 1997 | 17371 | 6384 | निरंक | आहे. |
| MH20/E-3305 | Maruti-800 car | 1997 | निरंक | 27768 | 10430 | आहे. |
| MH20/E-3306 | Maruti-800 car | 1997 | निरंक | निरंक | निरंक | नाही |
| MH20/E-1860 | Maruti-800 car | 1995 | 16167 | निरंक | निरंक | नाही |
| MH20/E-1870 | Maruti-800 car | 1995 | 16164 | निरंक | निरंक | नाही. |
| MH20/E-2006 | Maruti Van | 1996 | निरंक | निरंक | निरंक | आहे. |
| MH20/H-3000 | Esteem car | 1996 | निरंक | निरंक | निरंक | आहे. |
| MH20/F-5336 | Loading Riksha | 1996 | निरंक | निरंक | निरंक | आहे. |
| MH20/F-5337 | Loading Riksha | 1996 | निरंक | निरंक | निरंक | आहे. |
| MH20/F-5338 | Loading Riksha | 1996 | निरंक | निरंक | निरंक | आहे. |
| MH20/F-5339 | Loading Riksha | 1996 | निरंक | निरंक | निरंक | आहे. |
| MH20/F-5340 | Loading Riksha | 1996 | निरंक | निरंक | निरंक | आहे. |
| MH20/F-5341 | Loading Riksha | 1996 | निरंक | निरंक | निरंक | आहे. |
| MH20/AG-111 | Accent Car | 2001 | 69088 | 93743 | निरंक | लिलाव करीता प्रस्तावित |
| MH20/U-5986 | Amb car | 2001 | 35350 | 71649 | 36802 | लिलाव करीता प्रस्तावित |
| MH20/U-9574 | Maruti-800 car | 2001 | 22129 | 9316 | 14593 | लिलाव करीता प्रस्तावित |
| MH20/U-9518 | Maruti-800 car | 2000 | 27583 | 8542 | 26348 | लिलाव करीता प्रस्तावित |
| MH20/U-9519 | Maruti-800 car | 2000 | 18372 | 49196 | निरंक | लिलाव करीता प्रस्तावित |
| MH20/U-5987 | Amb car | 2001 | निरंक | 82360 | 18390 | लिलाव करीता प्रस्तावित |
| MH20/E-5051 | Maruti-Jipsy | 1997 | 6403 | निरंक | निरंक | लिलाव करीता प्रस्तावित |
| MH20/U-517 | Maruti-Jipsy | 1997 | 34550 | 43925 | निरंक | लिलाव करीता प्रस्तावित |
| MH20/E-923 | Mahindra Jeep | 1997 | 68732 | 54959 | 20894 | लिलाव करीता प्रस्तावित |
| MH20/A-5600 | Bajaj | 1993 | 7172 | 6273 | 6857 | लिलाव करीता प्रस्तावित |
| MCA/2532 | Tata 1210 comp. | 1988 | 156210 | 120687 | निरंक | लिलाव करीता प्रस्तावित |
| MH04/H-74 | Fire ambulance | 1992 | 67628 | 29650 | 41478 | लिलाव करीता प्रस्तावित |
| MH20/A-5347 | Toyota Ambulance | 1992 | निरंक | निरंक | निरंक | लिलाव करीता प्रस्तावित |
| MH20/BB-3333 | Tata Safari | 2007 | 100062 | 764528 | 6767 | लिलाव करीता प्रस्तावित |
| एकुण वाहने | 30 | | | | | |

**प्रश्न क्रमांक ४३९:-**

रोड साफ-सफाई करावयाची मशीन आपण का घेतली? आपल्या शहरामध्ये रोड बरोबर नसतांना या गाडीची आवश्यकता होती का?

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (अ/क/ड), महानगरपालिका औरंगाबाद.**

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ३३४ दिनांक १८.१०.२०१३ अन्वये शहरातील प्रमुख रस्त्यांच्या साफसफाईसाठी स्वीपींग मशिन खरेदी करण्याचे आदेश मा.सर्वसाधारण सभेने दिले आहेत. त्या प्रमाणे निविदा कार्यवाही करुन स्वीपिंग मशिन खरेदी करण्यात आलेली आहे. ही मशिन झाडाई नंतरची डस्ट व्हॅक्युम सिस्टीमद्वारे खेचून घेते. दररोज प्रमुख रस्त्यांच्या झाडाईतुन सरसरी ८ ते १० टन डस्ट उचलण्यात येत आहे. त्यामुळे शहराची डस्ट लेव्हल कमी होण्यास मदत होत आहे. तसेच महागरपालिकेत असलेल्या मनुष्य बळाच्या कमतरतेची उणीव देखील काही प्रमाणात भरुन काढण्यास मदत होत आहे.

स्वीपिंग मशिन प्रामुख्याने जालना रोड, जळगांव रोड, रेल्वेस्टेशन रोड, व्हीआयपी रोड इत्यादी प्रमुख रस्त्यांच्या झाडाईसाठी वापरण्यात येत असून हे रस्ते सुस्थितीत आहेत.

**प्रश्न क्रमांक ४४०:-**

वॉर्ड क्र.१९ मध्ये कुत्र्यांचा वावर जास्त वाढला असुन आतापर्यंत तेथे गाडी आली नाही? याचे कारण काय?

**उत्तर:- मुख्य पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद.**

स.सदस्य व नागरीकांनी केलेल्या तक्रारी नुसार वेळोवेळी श्वान पथकासह गाडी प्रगती कॉलनी व आरेफ कॉलनी येथे पाठविण्यात येऊन तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | दिनांक | पकडलेल्या मोकाट कुत्र्यांची एकूण संख्या | तक्रारीच्या ठिकाणाहून पकडलेल्या कुत्र्यांची संख्या | शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या श्वानांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १६.१२.२०१५ | २५ | आरेफ कॉलनी-७, मिलकॉर्नर-८, समर्थनगर-५, मुकूंदवाडी-५ | १० | ०५ | १५ |
| २. | २५.०१.२०१६ | १९ | वर्कशॉप-एन १०-०४, पोलिस कॉलनी-०३, विदयानगर-०३,शहानुरमिया दर्गा-०४, आरेफ कॉलनी-०३, सहकार नगर-०२ | १५ | - | १५ |
| ३. | ०४.०३.२०१६ | २० | एन ८ बजरंगचौक-२, आंबेडकर नगर-४ आरेफ कॉलनी-३, विमानतळ-४, चिकलठाणा-३, सुरेवाड-२, पवननगर-२. | ०४ | ०५ | ०९ |

**प्रश्न क्रमांक ४४१:-**

जन्म मृत्यू प्रमाणपत्र याची मुळ प्रत (O.C.) आपल्याकडे उपलब्ध असतांना याची सत्यप्रत Online देण्यासाठी शपथपत्र मागवुन गरीब नागरीकांना का त्रास देण्यात येत आहे. जुनी (O.C.) बघुन प्रमाणपत्र Online सत्य प्रत देण्यात यावी. फक्त अर्जदारा कडुन विनंती अर्ज घेण्यात यावे.

**उत्तर:- आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद.**

नागरिकांना जन्म-मृत्यु प्रमाणपत्रे ही महानगरपालिकेच्या सर्व वॉर्ड कार्यालयामार्फत रितसर कागदपत्राची पुर्तता घेऊन दिली जातात. जन्म व मृत्यु शहरातील दवाखान्यात झालेल्या असल्यास व त्याची कार्यालयाकडे नोंदणीअसल्यास नागरिकांकडुन दवाखान्याकडील मुळ प्रमाणपत्र, आई वडिलांचे आधार कार्ड, मतदान कार्ड इ. कागदपत्रे घेऊन प्रथम प्रत वितरीत केली जाते.

जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील (कलम १५) व महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी नियम २००० नुसार नागरीकांकडुन शपथपत्र फक्त जन्म मृत्यु प्रमाणपत्र निर्गमित झाल्यानंतर जन्म मृत्यु प्रमाणपत्रामध्ये स्पेलिंग दुरुस्ती असल्यास संबंधिताकडुन जुने जन्म मृत्यु प्रमाणपत्रासाठी हवे असलेले कागदपत्र उपलब्ध नसल्यास व काही शंका निर्माण झाल्यास बॉन्डपेपर शपथपत्र घेतले जाते.

प्रमाणपत्राची कार्यालयीन प्रत कार्यालयाकडे उपलब्ध असल्यास परत प्रत देण्यासाठी नागरीकांकडुन शपथपत्र घेण्याची आवश्यकता नाही. कार्यालयीन प्रतीच्या आधारे नोंद बघून दुसरी प्रत देता येते.

तसेच सर्व उपनिबंधक यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

**स.पालिका सदस्य श्री.जहागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी (प्रभाग क्रमांक-६१)**

**प्रश्न क्रमांक ४४२:-**

मागील एक वर्षापासुन M&R ची कामे बंद होती. त्यानुसार वॉर्डातील अत्यावश्यक कामे नगरसेवकांनी संबंधीत अधिकाऱ्यांना सुचना देऊन कळविली होती. त्यानुसार गुत्तेदारांनी ए-वन स्वरुपाची कामे केलेली होती. सदरील कामे झाल्यानंतर फोटोसह देयके लेखाविभागास देण्यात आलेली होती. परंतु संबंधीत गुत्तेदारांना आजपर्यंत कोणत्या कारणास्तव देयके अदा करण्यात आलेली नाही?

सध्या M&R ची कामे सुरु होणार असल्याने यापूढे ए-वन स्वरुपाची कामे न केल्यास हरकत नाही. परंतु मागील वर्षात ज्या गुत्तेदारांनी कामे केलेली आहेत त्यांना केलेल्या कामाची देयके अदा करण्यात यावी व तसेच ज्या कामाच्या वर्क ऑर्डर झालेल्या आहेत ती कामे पूर्ण करण्यात यावी आणि सदरील देयके कधी पर्यंत अदा केली जाणार? या बाबत सविस्तर खुलासा करण्यात यावा.

**उत्तर:- मुख्यलेखाधिकारी , महानगरपालिका औरंगाबाद.**

फक्त २२ मक्तेदारांनी लेखा विभागात त्यांच्या देयक अदायीसाठी केलेल्या कामाचे M.B.Record केलेली छायांकित प्रत तसेच फोटोसह देयके सादर केलेली आहेत.

**स.पालिका सदस्य श्री.सय्यद मतीन रशीद (प्रभाग क्रमांक-२०)**

**प्रश्न क्रमांक ४४३:-**

मा.आयुक्त यांच्या कार्यालयात सिटी सर्व्हे नंबर ३७४२ बाबत दिनांक ०८.०२.२०१६ रोजी पत्र दिले होते. या बाबत काय कार्यवाही करण्यात आली?

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

नगर भुसंपादन कार्यालय यांचेकडील न.भू.क्र. ३७४२ चे पी.आर.कार्ड पाहता, त्यावरील नोंदीनुसार भूखंडाचे क्षेत्रफळ ५३२८.५० चौ.मी.असून सन १९७१ पासून श्री.बोमन नानाभाई याची मालकी असल्याची नोंद आहे. त्या पी.आर.कार्डाची प्रत यासोबत अवलोकनार्थ जोडण्यात आलेली आहे. तथापि, संबंधित अर्जदार यांना मा.न्यायालयात आर.सी.एस. नं.१२०/२०१२ नुसार जो पर्यंत मा.न्यायालयाचा निर्णय लगत नाही, तोपर्यंत टी.डी.आर.चे बाबतीत कार्यवाही करण्यात आलेली नाही व सदर न्यायालयीन प्रकरणाचा अंतिम निर्णय होई पर्यंत टी.डी.आर. मंजुरीच्या प्रकरणात कार्यवाही करण्यात येऊ नये असा विधिवत अभिप्राय असल्याने त्यांना अद्याप टी.डी.आर. देण्यात आलेले नाही. तथापि, आपले पत्रासोबत सादर करण्यात आलेली कागदपत्रे ही सन १९६३ व १९६७ ची असल्याने याबाबतीत नगर भुमापन कार्यालयाकडून खात्री करुन पूढील कार्यवाही करण्यात येईल.

**स.पालिका सदस्या श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी (प्रभाग क्रमांक-३३)**

**प्रश्न क्रमांक ४४४:-**

केंद्र शासनाच्या भुमिगत गटार योजनेतुन मुख्य जलनि:सारण वाहिनी किती मिटर टाकण्यात आली? व कोणकोणत्या वॉर्डातुन टाकण्यात आली?

**उत्तर:- कार्यकारी अभियंता युआयडीएसएसएमटी-मलनि:सारण प्रकल्प,महानगरपालिका औरंगाबाद.**

सदरील माहिती सोबतच्या सहपत्रान्वये देण्यात येत आहे.

**प्रश्न क्रमांक ४४५:-**

केंद्र शासनाच्या भुमिगत गटार योजनेतुन अंतर्गत जलनि:सारण वाहिनी कोणकोणत्या वॉर्डात किती मिटर टाकण्यात आली?

**उत्तर:-कार्यकारी अभियंता युआयडीएसएसएमटी-मलनि:सारण प्रकल्प, महानगरपालिका औरंगाबाद.**

सदरील माहिती सोबतच्या सहपत्रान्वये देण्यात येत आहे.

**प्रश्न क्रमांक ४४६:-**

दिनांक ०१.०४.२०१६ रोजी मा.कार्यकारी अभियंता यांना पत्र देवून घरकुल लाभार्थी श्री.प्रल्हाद येडुबा हिवराळे, रा.आंबेडकर नगर यांचा घरकुल धनादेश क्रमांक १००९६८ दिनांक १२.०१.२०१५ इंडियन ओव्हरसीज बँक रक्कम रुपये २५,०००/- हजार संबंधीत लाभार्थीस न दिल्याबाबत संबंधीत कर्मचाऱ्या विरुध्द कोणती कार्यवाही केली? या बाबत खुलासा करावा.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (ब/इ/फ), महानगरपालिका औरंगाबाद.**

श्री.प्रल्हार येडुबा विराळे, रा.आंबेडकर नगर यांचे रमाई आवास योजने अंतर्गत घरकुलाचे काम चालु असुन त्यांचे घरकुलाचे पहिल्या टप्याचे अनुदान रक्कम रुपये २५,०००/- प्रदान करण्यासाठी सहा.प्रकल्प अधिकारी (N.U.L.M.) यांचेकडे देण्यात आले आहे.

प्रकल्प विभागाकडून सदरील कामाचा रक्कम रुपये २५,०००/- चा धनादेश तयार करण्यात आलेला असून संबंधित लाभार्थी यांनी प्रकल्प विभागाकडून धनादेश हस्तगत करावा.

**स.पालिका सदस्या श्रीमती शेख समिना शेख इलियास (प्रभाग क्रमांक-५७)**

**प्रश्न क्रमांक ४४७:-**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे एकुण भुखंड किती आहेत? जे भुखंड उपलब्ध आहेत त्या भुखंडांच्या आखिव पत्रिकेवर महानगरपालिकेचे नाव लावण्यांत आलेले आहे का? तसेच खुल्या रेखांकनामधील महानगरपालिकेच्या मालकीच्या अथवा ताब्यातील जागांची सद्यस्थिती काय आहे? यादीसह सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर:- उपआयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद.**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे एकुण १४११ भुखंड आहेत. त्या भुखंडाच्या आखिव पत्रिकेचे नाव लावण्यात आले आहे. तसेच महानगरपालिकेच्या रेखांकनातील खुल्या जागेची यादी सोबत देण्यात येत आहे.

**प्रश्न क्रमांक ४४८:-**

महानगरपालिका हद्दीत सुमारे अंदाजे १४०० किलो मिटर लांबीचे रस्ते आहेत. त्यापैकी अंदाजे ७०० कि.मी. चे रस्ते डांबरीकरणाचे आहेत. रस्त्याचे पूर्न:बांधणी अथवा खड्डे बुजविण्यासाठी डांबरीकरण करण्याची गरज असते यासाठी तत्कालीन आयुक्त मा.श्री सुनील केंद्रेकर यांनी महानगरपालिकेचे डांबर प्लॉन्ट यंत्रणा चालु करण्याचे सुचविले होते. तसेच मा.सर्वसाधारण सभेने या संबंधीच्या प्रस्तावास मंजुरी सुध्दा दिलेली आहे. परंतु असे निदर्शनास आलेले आहे की, महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०१६-२०१७ मध्ये कुठल्याही प्रकारची याबाबत तरतुद करण्यात आलेली नाही. याचा सविस्तर खुलासा करण्यात यावा.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (अ/क/ड), महानगरपालिका औरंगाबाद.**

महानगरपालिकेच्या मालकीचा डांबरीकरणाचा प्लॅन्ट कार्यान्वीत करण्याच्या दृष्टीने त्या करीता आवश्यक यंत्रसामुग्री/वाहने घेण्यास मा.सभागृहाने ठराव क्रमांक २८६ अन्वये मान्यता दिली आहे. त्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेच्या आधारे प्रकल्पातील काही मुद्दयांबाबत निविदा प्रक्रिया हाती घेतली असुन या प्रकल्पा बाबतच्या उभारणी अनुषंगाने प्रशासन सकारात्मकरित्या कार्यवाही करत आहे. तसेच प्लॅन्ट उभारणी करीता सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पा मध्ये २.९१ कोटी रक्कम तरतुद ठेवण्यासाठी लेखा विभागास उपरोक्त संदर्भीय पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे. करीता आपणास वरील विषयाच्या प्रश्नाच्या अनुषंगाने कळविण्यात येते.

**प्रश्न क्रमांक ४४९:-**

महानगरपालिका हद्दीत एकुण किती मंगल कार्यालये अस्तित्वात आहेत? या बाबत प्रभाग कार्यालय निहाय यादी उपलब्ध आहे का ? असल्यास महानगरपालिकेच्या अभिलेखात किती नांवे समाविष्ठ आहेत? त्याची यादी देण्यात यावी. तसेच किती मंगल कार्यालयाची नोंदणी झालेली नाही? त्यांना महानगरपालिकेने कर आकारणी केलेली नाही याची सुध्दा प्रभाग कार्यालय निहाय माहिती देण्यात यावी.

**उत्तर:- उपअभियंता तथा कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका औरंगाबाद.**

वरील प्रमाणे माहिती वार्ड कार्यालयाकडुन संकलीत करण्यात येत आहे. तिन दिवसात आपणास माहिती पुरविण्यात येईल.

**प्रश्न क्रमांक ४५०:-**

नव्याने महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या सातारा-देवळाई या भागात असंख्य मंगल कार्यालये अस्तित्वात आहेत. त्यांची महानगरपालिकेने नोंद घेतलेली आहे का? त्यापैकी किती मंगल कार्यालयांना कर आकारणी करण्यात आलेली आहे? व किती बाकी आहे? याची सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर:- उपअभियंता तथा कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका औरंगाबाद.**

सातारा-देवळाई हा भाग महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेला आहे. महानगरपालिकेतील सर्व मालमत्ता जसे, मंगल कार्यालय, हॉस्पीटल, हॉटेल, मोबाईल टॉवर्स, पेट्रोल पंप, शैक्षणिक संस्था, निवासी घरे इ. सर्वेक्षण करुन कर आकारणी करणे करीता महानगरपालिकेतर्फे निविदा प्रसिध्द करण्यात आली असून लवकरच सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात येईल. या सर्वेक्षणाद्वारे उपरोक्त प्रमाणे माहिती प्राप्त होईल.

**प्रश्न क्रमांक ४५१:-**

समांतर योजने संदर्भात शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालाप्रमाणे संबंधित कंपनी विरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे का? त्या बाबत कोणत्या स्वरुपाची पुढील प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे? या संबंधीत सविस्तर माहिती उपलब्ध्द करुन देण्यात यावी.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), महानगरपालिका औरंगाबाद.**

समांतर जलवाहिनी योजने संदर्भाने राज्य शासन नियुक्त समितीच्या अहवालावर दिनांक २१.०३.२०१६ राजी मा.सचिव, नवि-२ यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे बैठक संपन्न झाली. बैठकीत चर्चा व प्राप्त निर्णय तसेच इतिवृत्तानुसार औरंगाबाद महानगरपालिकेने नैसर्गिक न्याय तत्वानुसार कन्सेशनरला १५ दिवसांच्या कालावधींची नोटीस देवून त्याबाबत खुलासा घेण्याची कार्यवाही करावी असे निर्देश प्राप्त असल्यामुळे प्रथम कार्यवाही म्हणून महानगरपालिकेने दिनांक ०५.०४.२०१६ रोजी कन्सेशनर यांना १५ दिवस मुदतीची कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येणार आहे. सदरील नोटीस

औरंगाबाद महानगरपालिकेच्या www.aurangabadmahapalika.org या संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात आलेली आहे.

**स.पालिका सदस्य श्री. अजीम अहेमद रफीक (प्रभाग क्रमांक-४३)**

**प्रश्न क्रमांक ४५२:-**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.४३, शरीफ कॉलनी येथे विविध भागात पिण्याच्या पाण्यामध्ये ड्रेनेजचे पाणी मिश्रीत होत असल्याचे मी मागील गेल्या एक वर्षापासुन तक्रार करीत आहे. परंतु सदरील समस्या सोडविण्यासाठी आज पर्यंत कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदरील समस्यावर कधीपर्यंत तोडगा निघणार ? या बाबत खुलासा करावा.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), महानगरपालिका औरंगाबाद.**

१. गल्ली नं.११ मध्ये परवाना नाना दुकानाच्या पाठमागे दुषित पाणी पुरवठा बंद करणे. गल्ली नं.११ मध्ये १०० मीमी.ए.सी. लाईनवर ४ ठिकाणी बोर घेवून पाणी तपासले व डमी वॉश करण्यात आली व त्या लाईनवर स्कोर व्हॉल्व टाकण्यात आले.
२. गल्ली नं.५, शरीफ कॉलनी, अरफात मस्जीदच्या गल्लीत दुषित पाणी पुरवठा बंद करणेसाठी १५० एमएम ए.सी. लाईन ही ड्रेनेज लाईनच्या बाजुला ए.सी. लाईनवर ५ ठिकाणी छिद्र होते. त्यामुळे दुषित पाणी पुरवठा होत होता. करीता १२ मीटर पाईप लाईन टाकून दुषित पाणी पुरवठा बंद करण्यात आला.
३. शरीफ कॉलनी,जलील किराणा या भागात कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने १०० एमएम डी.आय. लाईन १३० मी लाईन टाकून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला.
४. रोशन मस्जिद गल्ली नं.७ च्या पाठीमागे दुषित पाणी पुरवठा होत असल्याने ६ ठिकाणी खोदकाम करुन दुषित पाणी पुरवठा शोधून व डमी वॉश करुन दुषित पाणी पुरवठा बंद करण्यात आला.
५. रोशन मस्जिद, शरीफ कॉलनी येथील दुषित पाणी पुरवठा बंद करणेसाठी १५० एमएम ए.सी. लाईनवर २ ठिकाणी शोधून तपासणी केली. तसेच २ क्रॉस कनेक्शन शोधून तपासणी केली. परंतु १५० एमएम ए.सी. लाईन घराच्या बेसमेंट मधून असल्यामुळे दुषित पाणी पुरवठा निर्मुलनाचे काम करता येत नाही.

या ठिकाणी १५० मीमी व्यासाची डी.आय जलवाहिनी (१५० मीटर लांबीची) टाकण्यात येणार आहे. काम त्वरीत हाती घेण्यात येईल, तसेच आपल्या सोबत स्थळ पाहणी केली आहे व ही बाब आपल्या निदर्शनास आणून दिलेली आहे.

**प्रश्न क्रमांक ४५३:-**

DPDC मधून मंजुर निधीतुन कटकट गेटच्या बाजुच्या दोन्ही रस्त्याचे काम सुरु करणे संदर्भात मा.पालकमंत्री महोदयांनी आदेश व निधी सुध्दा दिलेला असतांना आजपर्यंत सदरील काम का सुरु करण्यात आलेले नाही? काम कधी सुरु होणार? याचा खुलासा व्हावा.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (ब/इ/फ),महानगरपालिका औरंगाबाद.**

ऐतिहासिक कटकट गेटच्या दोन्ही बाजुस वळण रस्ता करणेसाठी जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-२०१६ अंतर्गत रक्कम रुपये २९८.४३ लक्ष एवढा निधी प्राप्त होणेसाठी मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे दिनांक ३१.०८.२०१५ अन्वये सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

मा.जिल्हाधिकारी यांचेकडील प्रशासकीय मान्यता आदेश दिनांक २६.०२.२०१६ अन्वये केवळ रक्कम रुपये ५०.०० लक्ष एवढा निधी मंजुर झालेला आहे. तथापी सदर काम हाती घेणेसाठी ऐतिहासीक कटकटगेटच्या दोन्ही बाजुने रस्त्यात बाधीत होणाऱ्या मिळकतीचे भुसंपादनासाठी दिनांक १५.०३.२०१६, २३.०२.२०१६ व ०७.०४.२०१६ अन्वये सहा. संचालक नगर रचना, मनपा यांना कळविण्यात आले आहे. तसेच मनपा हिश्याची रक्कम रुपये ५०.०० लक्षची तरतुद करणेसाठी

देखील मुख्यलेखाधिकारी, मनपा यांना दिनांक ०७.०४.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

तसेच जिल्हा वार्षिक योजनेतील मंजुर आदेशातील निर्देशानुसार सदर कामासाठी पुरातत्व विभागाची मंजुरी आवश्यक असल्याने परवानगी मिळणेसाठी परातत्व विभागास देखील दिनांक २३.०३.२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले असून सदर काम सुरु होणेच्या दृष्टीने वरील सर्व संबंधीतांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

उपरोक्त बाबींची पुर्तता झाल्यानंतर ऐतिहासिक कटकटगेटच्या लगतच्या वळण रस्त्याचे काम करणे संभवनीय आहे.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद